CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
धाराशिव | बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २५९ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



स्वत:चा विकास करायचा असेल तर आपल्याला शिकण्याची मानसिकता ठेवावी लागेल. अभ्यास संपला असला तरी शिक्षण थांबलेले नाही. स्वत:ला विकसित करण्याची इच्छा म्हणजे दैवी शक्ती होय. ही दैवी शक्ती सर्वांमध्ये असते. फक्त ती असल्याचा विश्वास असला पाहिजे.

- मधुभाई कुलकर्णी
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

महायुतीत आपसात पक्षांतर्गत बंदी लागू



# शिवसेनेच्या बहिष्कार अस्त्रानंतर निर्णय
# फडणवीसांनी शिंदेंच्या मंत्र्यांना झापले



**मुंबई, दि. १८ नोव्हेंबर-**
तुम्ही उल्हासनगरमध्ये या प्रकाराची सुरुवात केली. तुम्ही जे केले ते आम्ही चालवून घ्यायचे आणि भाजपने केले तर ते चालणार नाही, असे अजिबात चालणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाल्याचे वृत्त आहे. यापुढे एकमेकांचे नेते, पदाधिकाऱ्यांना प्रवेश देऊ नका. दोन्ही पक्षांनी याप्रकरणी पथ्य पाळावीत. तुम्ही पथ्य पाळणार असाल तर भाजपही पथ्य पाळेल, असेही मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांना सुनावले.

हा प्रकार घडला त्यावेळी दस्तुरखुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हजर होते. आज दिवसभर मंत्रालय परिसरात याचीच चर्चा सुरु होती. यावरुन ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर राज्याचे राजकारण तापल्याचे चित्र दिसून येते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेच्या मंत्र्यांनी मंगळवारच्या मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकला. भाजपवर मित्रपक्षांचे पदाधिकारी फोडण्याचा आरोप करत शिवसेनेने ही भूमिका घेतली. राज्यात सध्या नगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. स्थानिक पातळीवर वेगवेगळे राजकीय समीकरणे अस्तित्वात येत आहेत. त्यातच भाजपकडून मित्रपक्षांचे पदाधिकारी पळवण्याचा प्रयत्न सुरु झाला आहे. त्यावरून सत्ताधारी महायुतीच्या गोटात प्रचंड धुसफूस सुरू झाली आहे. याप्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेना प्रचंड नाराज झाली आहे. या नाराजीतूनच शिवसेनेच्या मंत्र्यांनी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीवर कथितपणे बहिष्कार टाकला. आजच्या प्री-कॅबिनेटला शिवसेनेचे सर्व मंत्री उपस्थित होते. पण त्यानंतर झालेल्या कॅबिनेटला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे वगळता शिवसेनेचा एकही मंत्री उपस्थित नव्हता. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर या सर्व नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात जाऊन त्यांची भेट घेतली. त्यात त्यांनी भाजपकडून मित्रपक्षांचे पदाधिकारी फोडण्यात येत असल्याच्या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. शिंदे गटाचे मंत्री भेटीस आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शांतपणे त्यांचे म्हणणे ऐकून घेतले.

यावेळी उभय नेत्यांत काय चर्चा झालीफ? याचा तपशील समोर आला नाही. पण यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिंदे गटाच्या मंत्र्यांना मित्रपक्षांचे पदाधिकारी पळवण्याच्या मुद्यावरून चांगलेच झापल्याचा दावा सूत्रांनी केला आहे.

**एकमेकांच्या पक्षातील कोणालाही प्रवेश नाही द्यायचा :** मुख्यमंत्र्यांना भेटून आल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना शिवसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, मुख्यमंत्र्यांशी चर्चा गझाली असून यापुढे एकमेकांच्या पक्षातील कोणालाही पक्षात प्रवेश द्यायचा नाही, असे निश्चित झाले आहे. शिवसेनेचे मंत्री सजय शिरसाट यांनी मात्र या विषयावर पत्रकारांशी बोलणे टाळल्याचे दिसून आले. या सर्व घडामोडी पाहता महायुतीत आपसात पक्षांतर्गत बंदी हा अलिखित कायदा लागू झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली तर विरोधकांनी यावरून महायुतीवर टीकास्त्र सोडले.

## महत्त्वाचे

### सलग तेजीनंतर बाजाराची आपटी

**मुंबई :** सलग सहा सत्रातील तेजीनंतर देशांतर्गत शेअर बाजारात मंगळवारी पुन्हा मंदीचे सावट आले. निर्देशांक आणि निफ्टीत घसरण झाली. निर्देशांक २७८ अंकांनी खाली



येत ८४,६७३ वर बंद झाला तर, निफ्टीत १०३ अंकांची घसरण झाली. तो २५,९१० वर बंद झाला. निर्देशांकातील ३० पैकी केवळ सात कंपन्यांच्या शेअर्समध्ये तेजी दिसून आली. उर्वरित सर्व शेअर्स विक्रीच्या दबावाखाली राहिले. जागतिक बाजारातील मंदीमुळे देशांतर्गत बाजारात घसरण झाली. बाजाराची सुरुवात सकारात्मक असली तरी अवघ्या काही मिनिटांतच निर्देशांक, निफ्टी कोसळले.

# हिडमाचा खात्मा; एक कोटींचे होते बक्षीस

**●आंध्रप्रदेशातील चकमकीत सहा माओवादी ठार ●नक्षल चळवळीचे कंबरडे मोडले**

**मरेदुमिल्ली, १८ नोव्हेंबर**
आंध्रप्रदेशातील अल्लुरी सीतारामराजू जिल्ह्यात मंगळवारी सुरक्षा दलाशी झालेल्या चकमकीत छत्तीसगडमधील माओवाद्यांच्या केंद्रीय समितीतील सदस्य, बटालियन एकचा प्रमुख क्रूरकर्मा माडवी हिडमा आणि त्याच्या पत्नीचा खात्मा करण्यात आला. या चकमकीत एकूण सहा माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. माडवी हिडमा माओवाद्यांची सर्वाधिक आक्रमक आणि अत्यंत क्रूर मानली जाणारी बटालियन एकचा प्रमुख होता. त्याचा मृत्यू हा माओवादी चळवळीच्या शवपेटीवरील शेवटचा खिळा असल्याचे मानले जात आहे.



हिडमा वयाच्या सोळाव्या वर्षी माओवादी चळवळीत आला होता. मरेदुमिल्ली मंडलच्या जंगलात सकाळी साडेसहा ते सातच्या दरम्यान ही चकमक झडली, असे अल्लुरी सीताराम राजू जिल्हा पोलिस अधीक्षक अमित बर्दार यांनी सांगितले. आज सकाळी मारेदुमिल्ली मंडल परिसरात माओवादी आणि पोलिस सदलात गोळीबार झाला. या चकमकीत सहा माओवादी मारले गेले, असे पोलिसांनी निवेदनात म्हटले आहे. या चकमकीत दोन महिला आणि चार पुरुष माओवादी ठार झाले. विश्वसनीय स्रोत आणि पडताळणीच्या आधारे पोलिसांनी हिडमा त्याची पत्नी मडकम राजे, देवे, लकमल (चैतू), मल्ला (मल्लालू) आणि कमल (कमलेश) यांचा मृत्यू झाल्याच्या माहितीला दुजोरा दिला. मागील काही आठवड्यांपासून आंध्रप्रदेशछत्तीसगड-ओडिशा सीमेवर माओवाद्यांच्या हालचाली वाढल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांकडून मिळाली होती. त्यामुळे शोधमोहीम तीव्र करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले. चकमकीनंतर पोलिसांनी दोन एके-४७ रायफली, एक पिस्तूल, एक रिव्हॉल्व्हर, सिंगल बोअर रायफल, इलेक्ट्रिकल आणि नॉन-इलेक्ट्रिकल डिटोनेटर्स, फ्युज वायर, किट बॅग व इतर साहित्य जप्त केले. मुदतीपूर्वीच खात्मा माडवी हिडमाचा ३० नोव्हेंबरपर्यंत खात्मा करण्यात यावा, अशी मुदत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिली होती. मात्र, ही मुदत संपायला १२ दिवस शिल्लक असताना सुरक्षा दलांनी माडवी हिडमाला टिपले. अमित शाह यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत ही मुदत दिली होती, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# सोलापूर जिल्ह्यात नगराध्यक्षपदासाठी १४६ तर नगरसेवकपदासाठी २२६१ अर्ज

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**
सोलापूर जिल्ह्यातील ११ नगरपरिषदा आणि एक नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदासाठी १४६ उमेदवारांचे अर्ज दाखल झाले. नगरसेवकपदाच्या २८९ जागांसाठी २२६१ अर्ज दाखल झाले आहेत. अनगर नगरपंचायतीच्या नगरसेवकपदाच्या १७ च्या १७ जागा बिनविरोध झाल्या आहेत. याठिकाणी नगराध्यक्ष पदासाठी तीन अर्ज दाखल आहेत. मात्र छाननीत उज्ज्वला थिटे यांचा अर्ज बाद ठरला. त्यामुळे नगराध्यक्षपदाची निवडणूक अविरोध होण्याची शक्यता वर्तविली जात आहे



सोमवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस असल्याने यादिवशी तहसील कार्यालयांना यात्रेचे स्वरुप आले होते. रात्री उशिरापर्यंत अर्ज भरुन घेण्याची प्रक्रिया सुरू होती. दाखल अर्जांची मंगळवारी छाननी करण्यात आली. उमेदवारांना शुक्रवार, दि.२३ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहे. २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे.

**करमाळा** : नगराध्यक्षपदासाठी १५ तर नगरसेवकपदाच्या २० जागांसाठी २५४ अर्ज दाखल झाले आहेत. **अक्कलकोट** : नगराध्यक्षपदासाठी ११ तर नगरसेवकांच्या २५ जागांसाठी १७५ अर्ज दाखल झाले आहेत. **दुधनी** : नगराध्यक्षपदासाठी ७ तर नगरसेवकांच्या २० जागांसाठी ९७ अर्ज दाखल झाले आहेत. **अकलूज** : नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी ७ तर नगरसेवकपदाच्या २६ जागांसाठी १५१ अर्ज दाखल झाले आहेत. **पंढरपूर** : नगराध्यक्षपदासाठी ८ तर नगरसेवकांच्या ३६ जागांसाठी ३६६ अर्ज प्राप्त झाले आहेत. **मंगळवेढा** : नगराध्यक्षपदासाठी १७ तर नगरसेवकाच्या २० जागांसाठी १६० अर्ज दाखल झाले आहेत. **कुर्डुवाडी** : नगराध्यक्षपदासाठी १० तर नगरसेवकांच्या २० जागांसाठी १६४ अर्ज दाखल झाले आहेत. **बार्शी** : नगराध्यक्षपदासाठी १० तर नगरसेवकांच्या ४२ जागांसाठी २८४ अर्ज दाखल झाले आहेत. **मैंदर्गी** : नगराध्यक्षपदासाठी ८ तर नगरसेवकपदाच्या २० जागांसाठी ८४ अर्ज दाखल झाले आहेत. **सांगोला** : नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी सर्वाधिक ३१ अर्ज दाखल झाले आहेत. तर नगरसेवकपदाच्या २३ जागांसाठी ३३८ अर्ज दाखल झाले आहेत. **मोहोळ** : नगराध्यक्षपदासाठी १९ तर नगरसेवकपदाच्या २० जागांसाठी १७० अर्ज दाखल झाले आहेत.

### अनमोल बिश्नोईचे अमेरिकेतून प्रत्यार्पण

**नवी दिल्ली** : गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोल बिश्नोई याचे अमेरिकेतून प्रत्यार्पण करण्यात येत आहे. अनमोलवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी आणि पंजाबी गायक सिद्धू मुसेवालाच्या हत्येचा आरोप आहे. अभिनेता सलमान खानच्या घरावर झालेल्या गोळीबारातही अनमोलचे नाव समोर आले. अमेरिकेच्या डिपार्टमेंट ऑफ होमलॅण्ड सिक्युरिटीने याबाबतची माहिती झिशान सिद्दीकी यांना ई-मेलद्वारे दिली आहे. झिशान सिद्दीकी यांनी या मेलचा स्क्रीनशॉट शेअर केला. त्यात स्पष्टपणे नमूद आहे की, अनमोल बिश्नोईला १८ नोव्हेंबर रोजी अमेरिकेतून भारतात प्रत्यार्पित करण्यात आले आहे. महाराष्ट्र सरकारचे माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री ९:३० वाजता मुंबईतील वांद्रे येथील खेरवाडी सिग्नलवर हत्या करण्यात आली. लॉरेन्स टोळीने या हत्येची जबाबदारी स्वीकारली.



# अल-फलाह विद्यापीठाच्या विश्वस्तांवर ईडीचे छापे




**◆ नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**
लाल किल्ला बॉम्बस्फोटाच्या केंद्रस्थानी असलेल्या हरयाणाच्या फरिदाबाद येथील अल-फलाह विद्यापीठाच्या विश्वस्त आणि संचालकांवर ईडीने दिल्ली-एनसीआरमध्ये मंगळवारी छापेमारी केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

ईडीच्या पथकांनी पहाटे सव्वापाच वाजल्यापासून अल-फलाह ट्रस्ट आणि विद्यापीठाच्या किमान २५ ठिकाणांवर छापेमारी केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ईडीच्या पथकांनी दिल्लीतील ओखला परिसरातील विद्यापीठाच्या कार्यालयावर केलेल्या छापेमारीदरम्यान पोलिस आणि निमलष्करी दलाने या भागाला वेढा घातला होता.

ही कारवाई आर्थिक अनियमितता, बनावट कंपन्यांचा वापर, निवास संस्था आणि मनी लॉण्ड्रिंगमध्ये सुरू असलेल्या चौकशीचा एक भाग आहे. अल-फलाह ट्रस्ट आणि संबंधित संस्थांची भूमिका तपासाधीन आहे, असे ईडीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. ट्रस्ट आणि वित्त प्रशासनावर देखरेख करणारे प्रमुख कर्मचाऱ्यांवरही छापेमारी करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

*(वृत्तसंस्था)*

# समन्वयाचा अभाव हेच बालमृत्यूचे कारण

**अमरावती** : मेळघाटातील बाल व माता मृत्यू हा विषय १९९५ पासून चर्चेत आहे. या मृत्यूमागच्या कारणांमध्ये मुलींचे कमी वयात लग्न होणे, अनुवांशिक आजार, आरोग्याबद्दलची अनभिज्ञता, आहार व सुविधांची कमतरता, शिक्षण, भौगोलिक रचना यांचा समावेश होतोच. शिवाय, आरोग्य यंत्रणेतील समन्वयाचा प्रचंड अभाव हे यामागील न दिसणारे सर्वांत प्रमुख कारण आहे.

धारणी व चिखलदरा या दोन तालुक्यांचा भाग म्हणजे मेळघाट! आदिवासीबहुल असलेल्या या भागात एकूण ३२४ गावे आहेत. जवळपास ५ लाख लोकसंख्या आहे. आरोग्य व्यवस्था हाताळण्यासाठी ११ प्राथमिक आरोग्य केंद्रे, चुरणी व चिखलदरा अशी दोन ग्रामीण रुग्णालये आणि धारणीत उपजिल्हा रुग्णालय आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या आरोग्य अधिकाऱ्याच्या नियंत्रणात आहे, तर ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालयाचा कारभार राज्य शासनाच्या आरोग्य विभागांतर्गत येणाऱ्या जिल्हा शल्यचिकित्सकांच्या देखरेखीखाली आहे.




# 'आयकॉनिक' शहर विकासासाठी धोरण

## राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय


**मुंबई, १८ नोव्हेंबर**
सिडकोसह राज्यातील विविध प्राधिकरणांकडील लॅण्ड बँकेचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी संकल्पना आधारित- आयकॉनिक शहर विकासाच्या आदर्श धोरणास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

सिडको महामंडळाकडून विविध वापरांसाठी भूखंडांचे लिलाव पद्धतीने भाडेतत्त्वावर वाटप केले जातात. या भूखंडांवर संबंधितांना प्रकल्पांचे बांधकाम करता येते. म त्र, यासाठी भाडेपट्टा करारनाम्यातील अटी व शर्ती तसेच एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०२० मधील नियमांचे पालन करावे लागते. यातील काही भूखंड हे वेगवेगळ्या बांधकाम व विकास संचलनकर्त्यांच्या (सिडीओज-कन्स्ट्रक्शन अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट ऑपरेटर) ताब्यात असल्यामुळे या ठिकाणी एकसंधपणे आणि एकात्मिक वसाहत धोरणाप्रमाणे विकास प्रकल्प पूर्ण करणे शक्य नसते. यासाठी सिडकोच्या संचालक मंडळाने संकल्पना आधारित- आयकॉनिक शहर विकासाचे धोरण तयार केले असून, त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला.

या धोरणामुळे राज्यातील सिडकोसह, विविध प्राधिकरणांकडील जमिनी, भूखंडाचा सुयोग्य वापर निश्चित करण्यास प्राधान्य मिळणार आहे. संबंधित



प्राधिकरणाला बांधकाम व विकास संचलनकर्ता-सीडीओजची निविदा प्रक्रियेद्वारे नेमणूक करता येणार आहे. यामुळे सीडीओजला निवासी एकात्मिक वसाहत किंवा आंतरराष्ट्रीय व्यावसायिक क्षेत्रांची उभारणी करता येणार आहे. त्याला विकसनाचे हक्क मिळणार आहे. तसेच प्रकल्पातील सदनिका व व्यवसायिक मालमत्तेची विक्री करता येणार आहे. या धोरणात वसाहतींच्या उभारणीसाठी कालबद्धतेची अट घालण्यात आली असून सीडीओची जबाबदारी, धोरण उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी संरक्षक उपाय, आयकॉनिक विकास संकल्पनांची निवड-संक्षिप्त आराखडा, विकासक निवड प्रक्रिया, प्रकल्पासाठी विकास आराखडा, जमिनीचा ताबा हस्तांतरण, महसूल हिश्श्याचे वाटप, देयक अटी, प्रकल्प समाप्तीसंदर्भातील तरतुदी अशा बाबींचा या धोरणात समावेश आहे.



# बोर्डाने जाहीर केले नवीन परीक्षा नियम

**पुणे, १८ नोव्हेंबर**
दहावी, बारावी बोर्डाची परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि त्याहीपेक्षा पालकांना प्रचंड तणावाला सामोरे जावे लागते. आता महाराष्ट्र बोर्डाने विद्यार्थ्यांच्या अनुत्तीर्णतेचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचा ताण कमी करण्यासाठी नवीन परीक्षा नियम जाहीर केले आहेत.

बोर्डाने प्रश्नपत्रिकांचे स्वरूप इतके सोपे केले आहे की, थोडे कष्ट करून प्रत्येक विद्यार्थी सहजपणे उत्तीर्ण होऊ शकतो. यावेळी, दहावीमध्ये त्रिभाषिक सूत्र (मराठी, हिंदी आणि इंग्रजी) लागू करण्यात आले आहे. त्यानुसार, तिन्ही विषयांमध्ये एकूण १०५ गुण उत्तीर्ण होण्यासाठी पुरेसे आहेत

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सहायक धर्मादाय आयुक्तपदासाठी वकिलीचा अनुभव अनिवार्य

## महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमात सुधारणा

◆ **मुंबई, १८ नोव्हेंबर**

सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ संवर्गातील पदासाठी आता तीन वर्षे वकिलीचा अनुभव अनिवार्य असणार आहे. यासंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यास आज मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयाने एका न्यायालयीन प्रकरणात दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), प्रथम स्तर न्यायदंडाधिकारी या पदावर अनुभव नसलेल्या विधि पदवीधारकांना केवळ पदवीच्या आधारे नियुक्ती देण्यास अपात्र ठरविले आहे. त्यानुषंगाने सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ या अर्धन्यायिक पदावर नामनिर्देशाने नियुक्तीसाठी तीन वर्षे वकिलीचा अनुभव अनिवार्य करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात बदल करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सहायक धर्मादाय आयुक्तपदाच्या जबाबदाऱ्या अर्धन्यायिक स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे केवळ पुस्तकी ज्ञानातून प्रश्न हाताळण्याची गुणवत्ता व संवेदनशीलता प्राप्त होत नाही. त्यासाठी प्रत्यक्ष वकिली करून पक्षकारांशी संपर्क, न्यायदानाच्या प्रक्रियेत सहभाग आवश्यक आहे. यासाठी अनुभव अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे शासनास अनुभवी व चांगल्या दर्जाचे अधिकारी मिळतील, जे न्यायदानाच्या प्रक्रियेसाठी लाभदायक ठरतील. याचा लाभ पक्षकार, विश्वस्त व नागरिकांना होणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### भिक्षा प्रतिबंध कायद्यातील शब्दरचना बदलण्यास मान्यता

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध कायद्यातील मानहानीकारक शब्द वगळण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. एका याचिकेवरील निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व अधिनियम, नियम, नियमावली, उपविधी इत्यादीमधील मानहानीकारक, असे शब्द बदलण्याचा आदेश दिला आहे. त्यावर मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम-१९५९ मधील कलम ९ व २६ मध्ये सुधारणा करण्याची शिफारस विधी व न्याय विभागाने केली आहे. त्यानुसार या अधिनियमातील महारोगाने पीडित, कुष्ठरोगी, कुष्ठालये असे शब्द वगळण्यास व त्यानुषंगाने अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

# मनी लॉँड्रिंगप्रकरणी नवाब मलिक यांच्यावर आरोप निश्चित

**पुढच्या वर्षांपासून सुनावणी**

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १८ नोव्हेंबर -**



: अंडरवर्ल्डचा डॉन दाऊद इब्राहिमशी संबंधित आर्थिक गैरव्यवहारात राष्ट्रवादी काँग्रेस नेते व माजी मंत्री नवाब मलिक यांच्याविरुद्ध सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या मनी लॉन्ड्रीगच्या गुन्ह्याबाबत मंगळवारी विशेष न्यायालयाने आरोपाची निश्चिती केली.

मलिक यांनी आपल्यावरील आरोप अमान्य करीत निर्दोष असल्याचा दावा केला.विशेष न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी १९ डिसेंबरपर्यत पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुनावणी तहकूब करीत जानेवारी महिन्यापासून खतल्याची दैनंदिन सुनावणी जानेवारी महिन्यापासून सुरू करण्याची सूचना दिली. दाऊद इब्राहिमच्या नातेवाईकाशी जमीन खरेदी व्यवहार केल्याचा आरोप २०१९ मध्ये तत्कालीन मंत्री मलिक यांच्याविरुद्ध भाजपाने राळ उठवली होती. त्याबाबत ईडीने गुन्हा करून त्यांना अटक करून जेलमध्ये टाकले होते. त्यानंतर २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली फूट पडल्यानंतर मलिक यांनी त्यांना पाठिंबा दिला होता. त्यानंतर प्रकृतीच्या कारणास्तव त्यांना जामीन मंजूर करण्यात आला होता. याप्रकरणी दाखल केलेल्या आरोपपत्रावर आज मुंबई सत्र न्यायालयातील विशेष एमपी-एमएलए न्यायलयात सुनावणी झाली.यावेळी मलिकांनी याप्रकरणी निर्दोश असल्याचा दावा केला. त्यानंतर नवाब मालिकांविरोधात कथित मनी लाँड्रिंग प्रकरणात न्यायालयाकडून आरोपनिश्चित करण्यात आले.त्यांच्यावर पीएमएलए कायदा, २००२ मधील कलम ३, कलम ४ आणि कलम १७ अंतर्गत आरोप निश्चित करण्यात आले. विशेष न्या. सत्यनारायण नावंदर यांनी या खटल्याची दैनंदीन सुनावणी जानेवारी महिन्यापासून सुरू करू, असे आश्वासन दिले.

तत्पूर्वी मलिकांनी दाखल केलेला दोषमुक्तीचा अर्ज फेटाळल्याच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले असून त्यावर सुनावणी होणं बाकी असल्याचे कारण देत मलिकांच्यावतीने सकाळच्या सत्रात आरोपनिश्चितीची प्रक्रिया स्थगित करण्याची विनंती न्यायालयाकडे केली. त्यावर न्यायालयानं त्यांना दुपारी तीन वाजेपर्यंत उच्च न्यायालयाकडून स्पष्टीकरण आणण्याचा अवधी दिला होता.

### काय आहे मनी लॉँड्रिंगचं प्रकरण

मुनिरा प्लंबर आणि तिची आई यांची मालकी असलेल्या कुर्ल्यातील गोवावाला कंपाऊंडमधील मालमत्ता मलिक यांनी जवळपास दोन दशकांपूर्वी खरेदी केली होती. मात्र दाऊदची मुंबईतील हस्तक आणि बहिण हसीना पारकर, सलीम पटेल आणि १९९३ च्या बॉम्बस्फोटातील आरोपी सरदार खान यांनी ही जमीन मूळ मालकाला धमकावून हस्तगत केली होती. मलिकांना या संपूर्ण प्रकाराची माहिती असूनही त्यांनी जाणीवपूर्वक हा व्यवहार केला. मलिकांनी डी कंपनीसाठी हा व्यवहार करून त्यांना पैसे पुरवल्याचाही त्यांच्यावर आरोप आहे.

### कसा झाला घोटाळा

ईडीच्या आरोपानुसार, दाऊदची बहीण हसीना पारकर, सलीम पटेल, मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी सरदार खान आणि नवाब मलिक यांनी कुर्ला येथील गोवावाला कंपाउंडमधील मुनीरा प्लंबर या महिलेची तीन एकर जमीन कट रचून बेकायदेशीरपणे हडपली. या महिलेनं साल १९९९ मध्ये सलीम पटेल याच्या नावानं पॉवर ऑफ एटर्नी काढली होती. पटेलनं त्याचा दुरुपयोग करत हसीना पारकरच्या आदेशानुसार गोवावाला कंपाऊंडमधील जमीन नवाब मलिक यांच्या सॉलिडस इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला विकली. मलिक यांनी ही जागा भाडेतत्वावर देऊन त्यातून आलेल्या पैशांमधून वांद्रे, कुर्ला इथं सदनिका आणि उस्मानाबादमध्ये काही शेतजमीन खरेदी केली होती. सुमारे ३०० कोटींच्या या आर्थिक गैरव्यवहारात ही सर्व मालमत्ता ईडीनं जप्त केली आहे. या आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी फेब्रुवारी २०२२ मध्ये ईडीने मलिक यांना अटक केली होती.

## महत्त्वाचे

### अमित ठाकरेंवर गुन्हा दाखल



**मुंबई** : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांच्यावर नेरुळ येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे विनापरवाना उद्घाटन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनसेच्या कार्यकर्त्यांनी आरोप केला होता की, हा पुतळा गेल्या चार महिन्यांपासून झाकून ठेवला होता. याच पृष्ठभूमीवर रविवारी अमित ठाकरे यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यानंतर नवी मुंबईत त्यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर, या संपूर्ण प्रकरणावर त्यांच्या मातोश्री शर्मिला ठाकरे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. पत्रकारांशी बोलताना शर्मिला ठाकरे यांनी मला याचा अभिमान वाटतोय अशी प्रतिक्रिया दिली आहे.

### बंगळुरू विमानतळावर चाकू घेऊन धावला तरुण

**बंगळुरू** : बंगळुरूच्या केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका तरुणाने टॅक्सी चालकावर चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. ही घटना टर्मिनल एकच्या प्रवेशद्वारावर घडली. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी सोहेल अहमद टॅक्सी ड्रायव्हरकडे वेगाने येत असल्याचे आणि त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून आले. जवळून जाणारे लोक घाबरले आणि वेगवेगळ्या दिशेने पळू लागले. घटनास्थळी उपस्थित असलेले सीआयएसएफचे एएसआय सुनील कुमार आणि त्यांच्या पथकाने तातडीने कारवाई केली. त्यांनी हल्लेखोराकडे धाव घेतली, त्याला जमिनीवर ढकलले. चाकू हिसकावून घेतला आणि त्याला ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपीविरुद्ध शस्त्रास्त्र कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

### भाषण देताना तरुणीला हृदयविकाराचा झटका

**सुरत** : गुजरातमधील सुरत येथील एका महाविद्यालयीन कार्यक्रमात भाषण देत असताना, एक मुलगी अचानक स्टेजवर कोसळली. तिला ताबडतोब जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. वैद्यकीय अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होईल. तथापि, प्राथमिक तपासणीत हृदयविकाराचा झटका आल्याचे दिसून आले आहे. सुरतमधील धारुकावाला कॉलेजमध्ये व्यासपीठावर भाषण देत असताना अहमदाबादमधील २४ वर्षीय जिलबेन ठक्कर कोसळली. कपोदरा पोलिसांनी सांगितले की, जिलबेन एका आयटी कंपनीत काम करत होती. कंपनीने कॉलेजमध्ये एक कॅम्प आयोजित केला होता. कॅम्पबद्दल बोलताना जिलबेनचा मृत्यू झाला.

### ओडिया गायक हुमेन सागर यांचे निधन

**भुवनेश्वर** : लोकप्रिय ओडिया गायक हुमेन सागर यांचे १७ नोव्हेंबर रोजी निधन झाले. ते ३४ वर्षांचे होते. अनेक अवयवांचे कार्य बिघडल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. १४ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास हुमेन सागर यांची तब्येत अचानक बिघडल्याने त्यांना भुवनेश्वर येथील एम्समध्ये (ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस) दाखल करण्यात आले. तपासणीत असे दिसून आले की त्यांच्या शरीरातील अनेक अवयव निकामी झाले. त्यांना डायलेटेड कार्डिओमायोपॅथी आणि न्यूमोनियाचा त्रास होता. दोन दिवसांच्या उपचारानंतर, १७ नोव्हेंबर रोजी रात्री उशिरा गायकाचे निधन झाले.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| **सेन्सेक्स** | ८४,६७३.०२ (-२७७.९३) |
| **निफ्टी** | २५,९१०.०५ ( -१०३.४०) |



### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२२,२०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. १,५४,२०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.४ | १३.९ |
| अमरावती | ३०.० | ११.४ |
| भंडारा | २८.० | १०.० |
| बुलडाणा | २७.८ | १२.० |
| चंद्रपूर | २९.२ | १३.२ |
| गडचिरोली | २८.४ | १२.६ |
| गोंदिया | २७.८ | ९.६ |
| नागपूर | २८.० | १०.९ |
| वर्धा | २८.६ | ११.५ |
| वाशीम | २८.४ | १०.० |
| यवतमाळ | २९.० | ९.६ |

# आम्ही कचऱ्याकडेही लक्ष द्यावे का?

### सर्वोच्च न्यायालयाचा संताप

◆ **नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

वकिलांनी घातलेल्या रुमालांबाबत सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी एक याचिका दाखल करण्यात आली. त्यात वापरल्यानंतर या रुमालांची विल्हेवाट लावण्यासाठी एकसमान व्यवस्था निर्माण करण्याच्या सूचना मागितल्या होत्या. महत्त्वाचे म्हणजे, न्यायालयाने याचिकेवर विचार करण्यास नकार दिला. रुमाल कसे वापरले जातात, कचऱ्यात फेकले जातात का, यावरही आम्ही लक्ष ठेवायचे का, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला.



याचिकाकर्त्या साक्षी विजय यांनी या रुमालांच्या संकलन आणि विल्हेवाटीसाठी एकसमान आणि पर्यावरणपूरक व्यवस्था निर्माण करण्याची मागणी करणारी जनहित याचिका दाखल केली होती. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. विनोद चंद्रन यांचा समावेश असलेले न्यायासन याचिकेवर सुनावणी करीत होते. याचिका पाहिल्यानंतर न्यायालयाने म्हटले की, मग आमचे काम कुठे संपेल? रुमाल कसे वापरले जात आहेत यावर लक्ष ठेवणे? किंवा गावात कचरा कसा विल्हेवाट लावला जात आहे?... आपण रिट कुठे जारी करावी? याचिकाकर्ता जिंदाल ग्लोबल लॉ स्कूलमध्ये असोसिएट प्रोफेसर आहेत.

**याचिकेची मागणी काय होती?**

याचिकाकर्त्याने म्हटले आहे की, त्यांना न्यायालयाबाहेर कचऱ्याच्या डबक्याजवळ, फुटपाथजवळ कृत्रिम पट्ट्या आढळल्या आहेत. त्यात म्हटले आहे की ही परिस्थिती पर्यावरणीय चिंता आणि व्यवसायाच्या प्रतिष्ठेचे प्रतिबिंबित करते. याचिकेत पांढऱ्या पट्ट्यांची आदरपूर्वक विल्हेवाट लावण्यासाठी कोणतेही धोरण नाही यावर भर देण्यात आला आहे. पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून सध्याच्या परिस्थितीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

**...तर २०० वर्षांहून अधिक काळ लागेल**

याचिकेत म्हटले आहे की पूर्वी वकील कापडाच्या पट्ट्या वापरत असत, ज्या धुवून पुन्हा वापरता येत होत्या. तथापि, सध्याचे पट्टे कृत्रिम आणि जैवविघटनशील नाहीत. त्यांची किंमत १० रुपये आहे आणि अनेक वकील एका वापरानंतर ते फेकून देतात. ◂(वृत्तसंस्था)

# सुकमात दहशतीचे दुसरे नाव होते हिडमा

◆ **सुकमा, १८ नोव्हेंबर**

आंध्रप्रदेशातील चकमकीत ठार झालेला माडवी हिडमा हा एक कुख्यात माओवादी होता. छत्तीसगडमधील सुकमात दहशतीचे दुसरे नाव हिडमा होते, असे स्थानिकांनी सांगितले.

छत्तीसगड, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या जंगलात लपून राहत त्याने सुरक्षा दलांवर असंख्य हल्ले केले. यामध्ये १२ पेक्षा अधिक पोलिसांचा मृत्यू झाला. हिडमा माओवाद्यांच्या एका बटालियनचे नेतृत्व करत होता. सुरक्षा दलांनी त्याच्यावर ४५ लाख रुपयांचे बक्षीस ठेवले होते. २५ मे २०१३ रोजी झालेल्या झिरम व्हॅली घटनेसाठीही हिडमा जबाबदार होता. या घटनेत, माओवाद्यांनी बस्तरच्या झिरम खोऱ्यात छत्तीसगड काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वासह ३३ जणांची हत्या केली. तेव्हापासून छत्तीसगड पोलिसांसह अनेक यंत्रणा त्याचा शोध घेत आहेत. हिडमावर ६० जवानांच्या हत्येचाही आरोप आहे.

हिडमाचा शोध घेण्यासाठी १२५ हून अधिक गावांचे तांत्रिक मॅपिंग केले जात होते. सुरक्षा दल छत्तीसगड, ओडिशा आणि आंध्रप्रदेशच्या सीमेवर असलेल्या अंदाजे १२५ गावांचे थर्मल इमेजिंग करीत होते. ◂(वृत्तसंस्था)

# लघु-मध्यम उद्योग क्षेत्र प्रगतीचे आधारस्तंभ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन ● महाराष्ट्र शासन-युनिडात हेतुपत्र वाटप

◆ **मुंबई, १८ नोव्हेंबर**

उद्योजक स्वतःच्या कष्टातून उद्योग उभारतात, तंत्रज्ञानाची जोड, विकासाला चालना, आधुनिक साधने यांची उपलब्धता करून दिल्यास हे उद्योजक चमत्कार घडवू शकतात. महाष्ट्रात देशातील सर्वाधिक लघु आणि मध्यम उद्योग असून, हे क्षेत्र राज्याच्या प्रगतीचे आधारस्तंभ असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासन आणि युनायटेड नेशन्स इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (युनिडो) यांच्यात डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन आणि इनोव्हेशन क्षेत्रातील सहकार्यासाठी हेतुपत्र (लेटर ऑफ इंटेंट) वाटप करण्यात आले. या करारामुळे राज्यातील औद्योगिक क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या स्वीकाराला गती मिळणार असून, विशेषतः एमएसएमई उद्योगांना जागतिक स्पर्धात्मकतेकडे नेण्यास मोठी मदत होणार आहे. युनिडो ही जागतिक स्तरावर टिकाऊ आणि समावेशक औद्योगिक विकासाला पाठबळ देणारी प्रमुख संस्था आहे. तर इंडिया एसएमई फोरम (आयएसएफ) सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे प्रशिक्षण, आउटरीच आणि उद्योग स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी कार्यरत आहे. दोन्ही संस्थांच्या अनुभवाचा लाभ राज्याला तंत्रज्ञान-आधारित औद्योगिक वाढीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. राज्यातील औद्योगिक क्षेत्र कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, एव्ही, व्हीआर, ऑटोमेशन आणि इंडस्ट्री ४.० सारख्या नव्या तंत्रज्ञानामुळे झपाट्याने बदलत आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### भारतीय दूतावासाचे मदिना येथे मदत केंद्र

**दुबई** : सौदी अरेबियातील हज यात्रेकरूंच्या बस अपघातात मृत्युमुखी पडलेल्या भारतीयांच्या कुटुंबियांना मदत करण्यासाठी जेद्दाह येथील भारतीय वाणिज्य दूतावासाने मदिना येथे एक केंद्र सुरू केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. महावाणिज्य दूत फहाद अहमद खान सूरी यांनी अपघातातील एकमेव वाचलेले अब्दुल शोएब मोहम्मद यांची भेट घेतली. ते सध्या मदिना येथील रुग्णालयात उपचार घेत आहेत.

# राष्ट्रवादीच्या मुंबई प्रतिनिधीपदी वजाळे; उपाध्यक्षपदी माने-देशमुख





**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १८ नोव्हेंबर-**

श्रीपूर (ता.माळशिरस) येथील राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस समिर वजाळे यांची मुंबई प्रतिनिधीपदीही नियुक्ती करण्यात आली आहे. तर बोरगांव (ता. माळशिरस) येथील उदयसिंह माने-देशमुख यांची वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे व जिल्हाध्यक्ष यांच्या आदेशाने या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. सद्य स्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी चालु झाली असून सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे कॉग्रेसचे (अप) बडे नेते पक्ष सोडून गेले आहेत. त्या पार्श्वभूमीवर पक्षाने सोलापूर जिल्ह्यावर लक्ष केंद्रीत केलेले दिसून येत आहे. निवडीनंतर समिर वजाळे व उदयसिंह माने-देशमुख यांनी पक्ष श्रेष्ठींनी जी जबाबदारी सोपवली आहे ती आम्ही प्रामाणिक पणे पार पाडून पक्षाची ताकद वाढविणे तसेच पक्षाची भूमिका प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवण्याची पराकाष्ठा करू असे सांगितले. दोघांच्या निवडीचे श्रीपूर, बोरगाव परिसरातून स्वागत होत आहे.

# सहायक व्यवस्थापकानेच केली कॅनरा बँकेत लूट

### पोलिसांनी ठोकल्या बेड्या

◆ **गर्रा/बघेडा, १८ नोव्हेंबर**

तुमसर तालुक्यातील गोबरवाही पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या सीतासावंगी येथील कॅनरा बँकेच्या शाखेत अज्ञातांनी कुलूप तोडून प्रवेश करीत दीड कोटींहून अधिक रोकड व अन्य साहित्य लंपास केले होते. या घटनेचा तपास जलद गतीने करीत पोलिसांनी बँकेच्या सहायक व्यवस्थापक मयूर नेपाळे याला अटक केली.

कॅनरा बँकेच्या शाखेतून १७ ते १८ नोव्हेंबरच्या रात्री सामानासह १ कोटी ५८ लाख ४७ हजार ९४४ रुपयांचा माल चोरट्यांनी लंपास केला होता. बँकेच्या दाराचे कुलूप तोडून २७ हजार रुपये किमतीचे ९ सीसीटीव्ही कॅमेरे, स्ट्राँग रूममधून १ कोटी ५८ लक्ष १२ हजार ९४४ रुपये रोख चोरून नेली. सकाळी बँकेचे कामकाज सुरू करण्यासाठी कर्मचारी गेले असता, चोरीची घटना उघड झाली. शाखा प्रबंधक सातपुते यांच्या तक्रारीवरून गोबरवाही पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक नुरूल हसन आपल्या सहकारी अधिकाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले. त्यांनी वस्तुस्थिती पाहून चोरीच्या घटनेत बँकेतील कर्मचारी सहभागी असल्याचा संशय व्यक्त करून त्या दिशेने तपास सुरू केला. कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन माहिती घेतली असता, १७ रोजी बँकेचे सहायक प्रबंधक मयूर नेपाळे यांची वागणूक संशयास्पद असल्याचे सांगण्यात आले. याचवेळी नेपाळे बँकेच्या प्रशिक्षणासाठी नागपूरला गेल्याचे सांगितले गेले. पोलिसांचा संशय बळावल्याने सहायक पोलिस निरीक्षक विवेक सोनवणे यांच्या नेतृत्वात एक पथक नागपूरला रवाना झाले. नेपाळे यांना ते राहत असलेल्या ठिकाणी पकडण्यात आले.

सुरुवातीला विचारपूस केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, पोलिसांनी हिसका दाखविताच नेपाळे यांनी चोरीची कबुली दिली. नेपाळेकडून पोलिसांनी रोख रक्कम, दुचाकी, सीसीटीव्ही कॅमेरे आणि अन्य साहित्य जप्त करीत त्यांना अटक केली. या कारवाईत पोलिस अधीक्षक हसन, अतिरिक्त पोलिस अधीक्षक निलेश मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिवम विसापुरे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक चिंचोलकर, गोबरवाहीचे पोलिस निरीक्षक शरद शेवाळे यांनी सहभागी होत गुन्हा उघडकीस आणला. ◂(तभा वृत्तसेवा)

# बिहारमध्ये सरकार स्थापण्याच्या हालचालींना वेग

◆ **नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

बिहारमध्ये नितीशकुमार यांच्या नेतृत्वात रालोआचे सरकार स्थापण्याच्या हालचालींना वेग आला आहे. नितीशकुमार २० नोव्हेंबरला दहाव्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत.

रालोआ विधिमंडळ पक्षाची बैठक १९ नोव्हेंबरला पाटण्यात होणार असून, त्यात नितीशकुमार यांची नेतेपदी निवड केली जाईल. या बैठकीला जदयू, भाजपा, लोजपा रामविलास, हम आणि रालोसपा या पक्षाचे नवनिर्वाचित आमदार उपस्थित राहील. त्याआधी जदयू आणि भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठकही होणार आहे. जदयू विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत नेतेपदी नितीशकुमार यांची निवड केली जाईल. भाजपा विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत भाजपा विधिमंडळ पक्षनेत्याची निवड केली जाईल.



हम पक्षाचे प्रमुख आणि केंद्रीय मंत्री जितन राम मांझी यांनी मंगळवारी बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांची भेट घेऊन चर्चा केली

चिराग पासवान, जितनराम मांझी आणि उपेंद्र कुशवाह यांनी नितीशकुमार यांच्या मुख्यमंत्रिपदाला आधीच पाठिंबा जाहीर केला आहे. दरम्यान, जदयूचे कार्यकारी अध्यक्ष संजय झा आणि केंद्रीय मंत्री जदयूचे ललनसिंह यांनी मंगळवारी दिल्लीत गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांची भेट घेत त्यांच्यासाबेत सरकार स्थापनेबाबत चर्चा केली.

भाजपाचे निवडणूक प्रभारी धर्मेंद्र प्रधान पाटण्यात पोहोचले असून, ते चिराग पासवान, जितनराम मांझी आणि उपेंद्र कुशवाह या मित्रपक्षांच्या नेत्यांना भेटणार आहे.

दरम्यान, २० नोव्हेंबरला पाटण्यातील गांधी मैदानावर होणाऱ्या नितीशकुमार यांच्या शपथविधी समारंभाची जोरदार तयारी सुरू आहे. नितीशकुमार यांच्यासोबत उपमुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्याचाही शपथविधी होणार आहे. नितीशकुमार यांच्यासोबत भाजपाचे दोन उपमुख्यमंत्रीही शपथ घेतील, असे समजते. भाजपा उपमुख्यमंत्री म्हणून सम्राट चौधरी आणि विजयकुमार सिन्हा यांना कायम ठेवते की, नव्या चेहऱ्यांना संधी देते, याकडे भाजपा गोटात उत्सुकता आहे. विधानसभेचे अध्यक्षपद भाजप स्वत:कडे ठेवणार असल्याचे समजते. ◂(तभा वृत्तसेवा)

# प्रशांतकिशोर यांच्या जनसुराजची दाणादाण

## २३८ पैकी २३६ उमेदवारांची जमानत जप्त

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

अन्य राजकीय पक्षांना आणि नेत्यांना निवडणूक जिंकून देण्याचा दावा करणारे निवडणूक व्यूहरचनाकार प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाची बिहारमध्ये दाणादाण उडाली, त्यांना एकही जागा जिंकता आली नाही.

नितीशकुमार यांनी विधानसभा निवडणुकी २५ पेक्षा जास्त जागा जिंकल्या तर, राजकारण संन्यास घेण्याची घोषणा प्रशांत किशोर यांनी केली होती. जदयूने या निवडणुकीत ८५ जागा जिंकल्या आहेत, त्यामुळे आता प्रशांत किशोर राजकारण संन्यास घेतात काय याकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते.



पत्रपरिषदेत बोलताना जनसुराज पार्टीचे सर्वेसर्वा प्रशांत किशोर

पाटण्यात आयोजित एका पत्रपरिषदेत प्रशांत कशोर यांनी जनसुराज पक्षाच्या पराभवाची जबाबदारी स्वीकारली आणि राजकारण संन्यासाचा स्पष्टपणे इन्कार केला. पक्षाच्या पराभवाचे प्रायश्चित्य म्हणून एकदिवसाचे मौन उपोषण करण्याची घोषणाही त्यांनी केली.

मी बिहार सोडणार नाही, बिहारमध्येच राहणार आणि बिहारच्या जनतेसाठी आवाज उठवणार, बिहार सोडणार असे मी कधीच म्हटले नव्हते, असे ते म्हणाले. माझ्याजवळ कोणतीही पद नाही, त्यामुळे मी राजीनामा कशाचा देऊ, अशी विचारणाही त्यांनी केली. राजकारणसंन्यास म्हणजे मी राजकारण करणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रशांतकिशोर यांनी आपल्या जनसुराज पक्षाबाबत मोठमोठे दावे केले होते, माझ्या पक्ष १५० जागा जिंकेल, पक्षाला १२५ ते १३० जागा मिळाल्या तरी तो मी माझ्या पक्षाचा पराभव समजेल, अशी दर्पोक्तीही त्यांनी केली होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पाकिस्तानात टीटीपीचे १५ दहशतवादी ठार

◆ **इस्लामाबाद, १८ नोव्हेंबर**

पाकिस्तानी लष्कर गोपनीय माहितीच्या आधारे खैबर पख्तुनख्वाच्या डेरा इस्माईल खान आणि उत्तर वझिरीस्तानमध्ये केलेल्या कारवाईत टीटीपीच्या १५ दहशतवाद्यांचा खात्मा केला. मारलेल्या गेलेल्यांमध्ये आलम मेहसूद नावाचा एक प्रमुख दहशतवादीही ठार झाला.

पाकिस्तानी लष्कराने मंगळवारी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, खैबर पख्तुनख्वा भागात टीटीपीचे दहशतवादी हल्ला करण्याची योजना आखत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानंतर अतिरिक्त सुरक्षा दल पाठवून डेरा इस्माईल खान आणि उत्तर वझिरीस्तानमध्ये व्यापक शोधमोहीम राबवण्यात आली.

यावेळी मोहिमेत सहभागी असलेल्या सुरक्षा दलावर गोळीबार झाला. त्याला जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले. डेरा इस्माईल खानच्या कुलाची भागात दहा, तर वजिरिस्तानमध्ये पाच दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात यश आले. मारले गेलेले सर्व जण विदेशी पुरस्कृत नेटवर्कशी संबंधित होते आणि त्यांचा यापूर्वी झालेल्या अनेक हल्ल्यात समावेश होता, असा दावा पाकिस्तानने केला. *(वृत्तसंस्था)*

# बांगलादेश न्यायाधीकरणाचा निर्णय न्यायसंगत नाही

## शेख हसीना यांच्या शिक्षेवर संयुक्त राष्ट्र-मानवाधिकार संघटनेचा निषेध

### निष्पक्ष खटला चालविण्याचा सल्ला

UNITED NATIONS

◆ **न्यू यॉर्क, १८ नोव्हेंबर**

बांगलादेशातील हिंसक आंदोलनात नागरिकांची हत्या केल्याच्या आरोपाखाली माजी पंतप्रधान शेख हसीना यांना तेथील आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधीकरणाने सुनावलेली मृत्युदंडाची शिक्षा न्यायसंगत नाही तसेच ती अन्यायकारक आहे. प्रकरणाचा निष्पक्ष तपास न करता आणि आरोपींची बाजू ऐकून न घेता सुनावलेली शिक्षा आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन करणारी आहे. आम्ही या निकालाचा निषेध करीत असल्याचे संयुक्त राष्ट्र संघ आणि आंतराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने म्हटले आहे.

मानवाधिकार संघटना ॲम्नेस्टी इंटरनॅशनलनेही हसीना यांना मृत्युदंड देण्याच्या निर्णयाचा निषेध केला आणि म्हटले की, हसीना आणि त्यांच्या कार्यकाळात गृहमंत्री असलेले असदुज्जमान खान यांना ठोठावलेली शिक्षा निष्पक्ष आणि न्यायाच्या आधारावर नाही. त्यांनी या प्रकरणाचा निष्पक्ष तपास करून खटला पुन्हा चालवण्याचा सल्ला न्यायाधीकरणाला दिला आहे.

संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस ॲग्नेस कॅलामार्ड यांनी बुधवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, शेख हसीना आणि असदुज्जमान खान यांना सुनावलेली मृत्युदंडाची शिक्षा आंतरराष्ट्रीय मानकांच्या आधारावर नाही. निष्पक्ष चौकशी न करता घाईत आणि दबावाखाली दिलेला हा निर्णय आहे. शिक्षेमुळे पीडितांना न्याय मिळणार नाही. याशिवाय आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या प्रवक्त्या प्रवक्त्या रवीना शामदासानी यांनी निवेदनात म्हटले की, जुलै आणि ऑगस्ट २०२४ मध्ये विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील झालेल्या हिंसक निदर्शनांध्ये मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांसाठी वैयक्तिकरीत्या जबाबदार असलेल्यांची निष्पक्ष चौकशी व्हायला हवी. एखाद्या अधिकाऱ्याच्या जबाबाच्या आधारे मृत्युदंडाचा आदेश देणे मानवी अधिकारांचे उल्लंघन आहे. *(वृत्तसंस्था)*



### बचाव पक्षाच्या वकिलाचे मुद्दे डावलले

मानवाधिकार संघटनेने शेख हसीनाच्या खटल्यातील अनुपस्थितीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि म्हटले की, न्यायाधीकरणाच्या निर्णयावर शंका उपस्थित होत आहे. बचाव पक्षाच्या वकिलाला पुराव्याच्या उलटतपासणीची परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे संशय बळावला आहे. आम्हाला मृत्युदंडाची शिक्षा सुनावल्याबद्दलही खेद आहे. त्याचा आम्ही सर्व परिस्थितीत विरोध करतो. ■

### भारत हसीनांचे प्रत्यार्पण करणार नाही

न्यायाधीकरणाच्या निर्णयानंतर बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने शेख हसीनांच्या प्रत्यार्पणाची केलेली मागणी भारताने फेटाळून लावली. २०१३ चा प्रत्यार्पण करार आणि २०१६ मध्ये त्यात केलेल्या सुधारणेनुसार दोन्ही देशांना गुन्हा मान्य असला तरच, गुन्हेगाराचे प्रत्यार्पण करण्याची तरतूद आहे. मात्र, या प्रकरणात न्यायाधिकरणाने दोषी ठरवलेल्यांना भारताने अद्याप गुन्हेगार असल्याचे मान्य केलेले नाही, त्यामुळे प्रत्यार्पणाची मागणी फेटाळत आहोत, असे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. ■



नवी दिल्ली येथे मंगळवारी झालेल्या भारत आंतरराष्ट्रीय अंतराळ परिषदेत केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी अंतराळवीर आणि भारतीय वायुदलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला




दिल्लीतील न्यायालये आणि शाळांना मंगळवारी बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी मिळाली. त्यानंतर पतियाळा न्यायालयात सुरक्षा वाढवण्यात आली. यावेळी शीघ्र कृती दलाचे तैनात केलेले जवान

# रुग्णवाहिकेला आग; डॉक्टरसह चार ठार

◆ **अहमदाबाद, १८ नोव्हेंबर**

गुजरातमधील अरावली जिल्ह्यातील मोडासा भागात मंगळवारी पहाटे एका भरधाव रुग्णवाहिकेला अचानक आग लागली, या अपघातात एक डॉक्टर, परिचारिका, नवजात बाळ आणि त्याच्या वडिलाचा होरपळून मृत्यू झाला. रुग्णवाहिका चालक आणि एका नातेवाईकाला वाचवण्यात आले.

मोडासा नगरपालिकेचे अग्निशमन दलाचे अधिकारी हेमराज वाघेला यांनी सांगितले की, महिसागर जिल्ह्यातील लुणावाडा येथील रहिवासी जिग्नेश मोची यांच्या नवजात बाळाची प्रकृती बिघडल्याने त्याला मोडासा येथील एका रुग्णालयातून अहमदाबादमधील शासकीय रुग्णालयात नेत असताना टायर फुटला आणि रस्त्याच्या कडेला उलटलेल्या भरधाव रुग्णवाहिकेला आग लागली. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि अग्निशमन दल अपघातस्थळी पोहोचले. *(वृत्तसंस्था)*

# 'डीजीसीए' तयार करणार निवृत्त अधिकाऱ्यांचा समूह

◆ **नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

विमान वाहतूक नियामक डीजीसीए निवृत्त तांत्रिक अधिकाऱ्यांचा समूह तयार करण्याची योजना आखत आहे. या योजनेअंतर्गत निवृत्त अधिकारी विविध प्रमाणन प्रक्रियांमध्ये संस्थांना मदत करतील. यात एअर ऑपरेटर प्रमाणपत्रे जारी करणे आणि उड्डाण प्रशिक्षण शाळांचा परवाना देण्याचा समावेश आहे.




नुकत्याच जारी केलेल्या परिपत्रकानुसार, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) प्रमाणन प्रक्रियेवर सल्ला देण्यासाठी निवृत्त अधिकाऱ्यांचा समूह तयार करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वेही तयार केली आहेत.

नियामक पाच-टप्प्यांच्या प्रमाणन प्रक्रिया अनुसरण करतो. अनेकदा असे आढळून आले आहे की अर्जदार आणि संस्थांना संपूर्ण प्रक्रिया समजून घेण्यात अडचणी येतात, ज्यामुळे विलंब होतो आणि अनुपालन आव्हाने निर्माण होतात. या समस्येचे निराकरण करण्यासाठी, डीजीसीएने व्यापक संस्थात्मक ज्ञान आणि व्यावहारिक अनुभव असलेल्या निवृत्त अधिकाऱ्यांचा समूह तयार करण्याचा प्रस्ताव दिला आहे. *(वृत्तसंस्था)*

### निवृत्त कर्मचाऱ्यांची जबाबदारी

या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन प्रदान करण्यासाठी, प्रमाणन प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि सर्व आवश्यक पायऱ्या वेळेवर आणि कार्यक्षमतेने पूर्ण करण्यासाठी सल्लागार म्हणून नियुक्त केले जाऊ शकते. हे निवृत्त तांत्रिक अधिकारी/(एअर ऑपरेटर सर्टिफिकेट/एअर ऑपरेटर परमिट), फ्लाईंग ट्रेनिंग ऑर्गनायझेशनला लायसन्स देणे आणि इतर नियामक कार्यांमध्ये सल्लागार सहाय्य म्हणून करतील. हे सल्लागार पारदर्शकता, तांत्रिक अचूकता आणि (आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटना) मानकांनुसार काम करतील आणि निर्णयांवर प्रभाव टाकणार नाहीत. वाढत्या हवाई वाहतुकीच्या मागणीला पूर्ण करण्यासाठी विमान कंपन्या त्यांच्या ताफ्यांचा विस्तार करीत आहेत हे लक्षात घेण्यासारखे आहे. भारत हा जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या विमान वाहतूक बाजारपेठांपैकी एक आहे. ■

## केंद्र, सीबीआय, ईडी, अनिल अंबानींना नोटीस

◆ **नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

रिलायन्स कम्युनिकेशन्स (आरकॉम,) त्यांच्या समूह कंपन्या, प्रवर्तकांशी संबंधित कथित मोठ्या बँकिंग आणि कॉर्पोरेट फसवणुकीची न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केंद्र, सीबीआय, ईडी, अनिल अंबानी आणि इतरांना नोटीस बजावली.


सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. के. विनोद चंद्रन यांचा समावेश असलेल्या न्यायासनाने जनहित याचिकाकर्ता आणि माजी केंद्रीय सचिव ईएएस शर्मा यांच्यावतीने उपस्थित असलेले वकील प्रशांत भूषण यांच्या युक्तिवादाची दखल घेतली आणि तीन आठवड्यांत उत्तर मागितले. न्यायासनाने आता या जनहित याचिकेवर तीन आठवड्यांनी पुढील सुनावणी ठेवली आहे. मोठ्या बँकिंग फसवणुकीत तपास संस्था बँका आणि त्यांच्या अधिकाऱ्यांच्या कथित सहभागाची चौकशी करीत नाहीत, असा आरोप भूषण यांनी केला. *(वृत्तसंस्था)*

# जागतिक स्थैर्यासाठी भारत-रशिया संबंध महत्त्वाचे

● **जयशंकर यांचे प्रतिपादन** ● **नवीन करार, प्रकल्प अंतिम टप्प्यात**

◆ **मॉस्को, १८ नोव्हेंबर**

भारत-रशियाचे संबंध केवळ दोन्ही देशांच्या विकासासाठीच नव्हे, तर जागतिक स्थिरतेसाठी महत्त्वाचे आहे. दोन्ही देशांमधील अनेक द्विपक्षीय करार, प्रकल्प आणि नवीन उपक्रम अंतिम टप्प्यात आहेत. यामुळे धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत होणार असल्याचे भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटले.



रशियाच्या दोन दिवसीय दौऱ्यावर असलेल्या जयशंकर यांनी मंगळवारी रशियाचे मंत्री सर्गेई लाव्हरोव्ह यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांनी जागतिक विषयासह द्विपक्षीय संबंध बळकट करण्यासंदर्भात चर्चा केली. बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना जयशंकर म्हणाले, भारत आणि रशियाचा विकास केवळ दोन्ही देशांच्या परस्पर हिताचा नव्हे, तर जगाच्या हिताचा आहे.

दोन्ही देशांत लवकरच ऊर्जा, व्यापार, गुंतवणूक, अवकाश, विज्ञान आणि संरक्षण क्षेत्रात द्विपक्षीय करार होणार आहे. याशिवाय काही प्रकल्प भागीदारीने सुरू करण्यावर आमचे एकमत झाले. युक्रेन संघर्ष, पश्चिम आशियातील परिस्थिती आणि अफगाणिस्तान यासारख्या जटिल जागतिक मुद्यांवर आम्ही चर्चा केली. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन भारताच्या दौऱ्यावर येणार असून ते २३ व्या वार्षिक भारत-रशिया शिखर परिषदेत सहभागी होणार आहे. त्यावेळी दोन्ही देशात महत्त्वाचे करार होणार असून, त्यासंदर्भात आम्ही चर्चा केली, असे जयशंकर यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

# अमेरिका सौदी अरबला देणार एफ-३५ विमाने

## ट्रम्प यांची माहिती, लवकरच होणार करार



◆ **वॉशिंग्टन, १८ नोव्हेंबर**

जगातील सर्वांत प्रगत मानली जाणारी एफ-३५ लढाऊ विमाने सौदी अरबला देणार असल्याची माहिती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी व्हाईट हाऊसमध्ये प्रसार माध्यमांना दिली. यासंदर्भात दोन्ही देशांत लवकरच करार होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

सौदीचे क्राऊन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान मंगळवारी अमेरिकेच्या दौऱ्यावर आले आणि त्यांची बुधवारी ट्रम्प यांच्यासोबत बैठक होणार आहे. त्यावेळी एफ-३५ लढाऊ विमानासंदर्भात कराराची घोषणा होणार आहे. ट्रम्प म्हणाले, सौदी अरेबिया अमेरिकेचा सर्वांत महत्त्वाचा भागीदार आहे. दोन्ही देशांची अनेक क्षेत्रांत भागीदारी आहे आणि द्विपक्षीय संबंध अधिक बळकट करण्यासाठी संरक्षण कराराचा निर्णय घेण्यात आला. सलमान यांच्यासोबत व्यापार आणि संरक्षण क्षेत्राशी संबंधित अनेक मुद्यांवर चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, सध्या मध्यपूर्वेत केवळ इस्रायलकडेच एफ-३५ विमाने आहेत. एफ-३५ हे अमेरिकेचे पाचव्या पिढीतील लढाऊ विमान आहे आणि ते लॉकहीड मार्टिन कंपनीने २००६ मध्ये विकसित केले. पेंटॅगॉनच्या इतिहासातील सर्वांत महागडे विमान तीन प्रकारांमध्ये येते. याची किंमत ७०० कोटी ते ९४४ कोटीदरम्यान आहे. याशिवाय एफ-३५ चालवण्यासाठी प्रति तास अतिरिक्त ३१.२० लाख खर्च येतो. *(वृत्तसंस्था)*

## चित्रपट वार्ता

### 'धुरंधर'चा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित





**मुंबई :** रणवीरसिंहचा बहुप्रतीक्षित चित्रपट 'धुरंधर'चा ट्रेलर मंगळवारी प्रदर्शित झाला. ४ मिनिट ७ सेकंदांचा हा धमाकेदार ट्रेलर ॲक्शन सीन्स, संवाद आणि रक्तपाताने भरलेला आहे. ट्रेलरमध्ये अर्जुन रामपालचा इंटेन्स लूक स्पष्ट दिसतो. ट्रेलरची सुरुवात अर्जुन रामपालच्या संवादाने होते, मेजर इकबाल जिस पर मेहरबान हो जाएं, उनका मुस्तकबिल बदल जाता है.. अर्जुन रामपालचा कधीही न पाहिलेला लूक चित्रपटात पाहायला मिळणार आहे. ट्रेलरमधील पुढची ओळख रणवीरसिंहची आहे, जो चित्रपटात एका गुप्तहेराची भूमिका साकारतो आहे. या कलाकारांव्यतिरिक्त आर. माधवन, संजय दत्त, अक्षय खन्ना अशीही दमदार मंडळी यात आहेत. 'धुरंधर' हा चित्रपट आदित्य धर यांनी दिग्दर्शित केला आहे, ज्यांनी यापूर्वी 'उरी: द सर्जिकल स्ट्राईक' हा चित्रपट दिग्दर्शित केला होता. जिओ स्टुडिओजच्या बॅनरखाली निर्मित हा चित्रपट ५ डिसेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. ■

### वयाच्या ७१ व्या वर्षी रेखाचे पुनरागमन



**मुंबई :** हिंदी सिनेसृष्टीतील अभिनेत्री रेखा पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर दिसणार, अशा चर्चा रंगत आहेत. यासंदर्भातील माहिती तिचा जवळचा मित्र डिझायनर मनीष मल्होत्राने दिली आहे. त्याने सांगितले की, वयाच्या ७१ व्या वर्षीही रेखाला काम करण्याची इच्छा आहे. 'गुस्ताख इश्क' या चित्रपटात रेखा यांना घेण्याचा विचार होता. मात्र, यापुढील चित्रपटात त्या नक्की असणार आहेत. त्यांच्या अभिनय क्षमतेला साजीशी भूमिका मिळाल्याशिवाय त्यांनी काम करणेही योग्य नाही. चांगली कथा मिळताच त्यांना नवीन प्रोजेक्टमध्ये नक्कीच स्थान मिळेल. मी स्वत:देखील त्यांच्या पुनरागमनासाठी उत्सुक आहे, असे मनीष मल्होत्रा म्हणाला. ■

### पुन्हा येणार दबंग चुलबुल पांडे



**मुंबई :** सलमान खानच्या 'दबंग' सीरिजमधील सर्व चित्रपट सुपरहिट ठरले. आतापर्यंत याचे तीन भाग आले आहेत. आता चौथा भाग येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. अभिनेता-निर्माता अरबाज खानने 'दबंग-४'ची अधिकृतपणे पुष्टी केली आहे. याचा अर्थ पुन्हा एकदा चुलबुल पांडे दबंग अवतारात प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी अवतरणार आहे. याविषयी अरबाज म्हणाला, चित्रपट आम्ही करणार हे निश्चित, पण चित्रीकरण कधी सुरू होणार, हे अद्याप सांगता येणार नाही. सध्या याच्या कथानकावर काम सुरू आहे. ■

# 'गेमझक्राफ्ट'वर ईडीची छापेमारी

◆ **नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

अंमलबजावणी संचालनालय अर्थात् विन्झो आणि गेमझक्राफ्टच्या कार्यालयांवर छापे टाकले आहेत. फसवणूक, हेराफेरी आणि संभाव्य मनी लॉण्ड्रिंगच्या आरोपांप्रकरणी ईडीच्या बंगळुरू येथील प्रादेशिक कार्यालयाने मंगळवारी दोन ऑनलाईन गेमिंग कंपन्यांविरुद्ध छापे टाकले. अधिकाऱ्यांनी सांगितले की एकूण ११ ठिकाणी छापे टाकले जात आहेत त्यात बंगळुरूमध्ये पाच, दिल्लीमध्ये चार आणि गुरुग्राममधील दोन ठिकाणांचा समावेश आहे.

मनी लॉण्ड्रिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) टाकण्यात आलेल्या या छाप्यांमध्ये कंपन्यांच्या कॉर्पोरेट कार्यालये तसेच त्यांच्या प्रमुख व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचा समावेश आहे, ज्यात त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मुख्य वित्तीय अधिकारी यांचा समावेश आहे.

**गेमिंग अल्गोरिदममध्ये हेराफेरीचे आरोप**

ही कारवाई अनेक पीडितांनी दाखल केलेल्या एफआयआरनंतर झाली आहे ज्यात आरोप करण्यात आला आहे की, या प्लॅटफॉर्मने त्यांच्या गेमिंग अल्गोरिदममध्ये फेरफार करून खेळाडूंना अन्याय्यपणे नुकसान पोहोचवले आहे, ज्यामुळे कंपन्यांना बेकायदेशीरपणे नफा मिळू शकला आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, चालू असलेल्या शोधमोहिमेदरम्यान, असे आढळून आले की प्रवर्तकांकडे क्रिप्टो वॉलेट आहेत, जे क्रिप्टोकरन्सीद्वारे मनी लॉण्ड्रिंग दर्शवितात. हे डिजिटल मालमत्तेद्वारे मनी लाँड्रिंगचे संभाव्य मार्ग दर्शवते. मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याचे (पीएमएलए) संभाव्य उल्लघन मूल्यांकन करण्यासाठी एजन्सी तपासणी करत आहे. *(वृत्तसंस्था)*

# आता येणार पर्यावरण पूरक प्रवासी विमान


### भाडेही स्वस्त राहणार

◆ **नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

सध्या विमान प्रवास सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर आहे. मात्र, येत्या पाच वर्षांत हे चित्र बदलणार आहे. पुढील पाच वर्षांत आकाशात उडण्यासाठी सज्ज असलेले एक पूर्णपणे नवीन प्रवासी विमान विकसित केले जात आहे. त्याचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची 'ब्लेंडेड विंग' डिझाईन, म्हणजे विमानाचे पंख आणि मुख्य भाग एकाच, गुळगुळीत आकारात जोडलेले आहेत.

या नवीन तंत्रज्ञानामुळे इंधनाचा वापर निम्म्याने कमी होईल आणि विमानतळांभोवतीचा आवाज लक्षणीयरीत्या कमी होईल. हे विमान केवळ स्वस्तात उड्डाण करणार नाही तर, पर्यावरणाचे नुकसान देखील लक्षणीयरीत्या कमी करेल.

या डिझाईनची कल्पना प्रत्यक्षात १०० वर्षांहून अधिक जुनी आहे. रशियन पायलट निकोलाई व्होएवोडस्की यांनी प्रथम १९२० च्या दशकात मिश्रित विंग संकल्पना मांडली. आतापर्यंत, हे तंत्रज्ञान बहुतेक लष्करी विमानांमध्ये वापरले जात होते, परंतु आता पहिल्यांदाच ते सामान्य प्रवासी विमानात सादर केले जात आहे.



सामान्य विमानांमध्ये लांब, नळीच्या आकाराचे शरीर असते ज्याचे पंख बाजूंना जोडलेले असतात. तथापि, या नवीन डिझाइनमध्ये पंख आणि शरीर एकाच, सपाट, रुंद संरचनेत एकत्र केले जाते. यामुळे विमानाचे वजन कमी होते, हवेचा प्रतिकार (ड्रॅग) कमी होतो आणि उड्डाण करणे सोपे आणि अधिक किफायतशीर होते.

**अमेरिकन कंपनी जेटझिरोचे प्रयत्न**

हे क्रांतिकारी विमान अमेरिकन कंपनी जेटझिरो विकसित करीत आहे. कंपनीचा दावा आहे की, त्यांचे विमान एका वेळी २५० प्रवासी वाहून नेण्यास सक्षम असेल आणि ९,२५० किलोमीटरपर्यंत उड्डाण करू शकेल. याचा अर्थ दिल्ली ते लंडन किंवा मुंबई ते सिंगापूर असे लांब मार्ग सहजपणे पार करता येतील. *(वृत्तसंस्था)*

### हायड्रोजनवरही उड्डाण शक्य

**सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, हे विमान पारंपरिक जेट इंधन आणि शाश्वत विमान इंधन दोन्हीवर चालवता येते. भविष्यात, ते हायड्रोजनवरही चालवता येईल, ज्यामुळे कार्बन उत्सर्जन शून्यावर येईल.** ■

### पर्यावरणासाठी वरदान

हे विमान पर्यावरणासाठी वरदान आहे. आजच्या विमानांच्या तुलनेत, ते अर्धे इंधन जाळेल, म्हणजेच कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन निम्म्याने कमी होईल. शिवाय नवीन डिझाईन आणि लहान इंजिन उड्डाण, लँडिंग आणि टेकऑफ दरम्यान आवाज लक्षणीयरीत्या कमी करतील. यामुळे विमानतळाजवळ राहणाऱ्यांना दिलासा मिळेल. प्रवाशांनाही फायदा होईल. यात तिकिटांच्या किमती कमी होण्याची शक्यता आहे, कारण इंधन हा विमान कंपन्यांसाठी सर्वात मोठा खर्च आहे. ■

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# शेख हसीना, भारत आणि दक्षिण आशिया

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना आंतरराष्ट्रीय गुन्हे लवादाने मृत्युदंड ठोठावल्याची घटना ही केवळ एका व्यक्तीच्या किंवा देशाच्या भविष्यापुरती नव्हे तर संपूर्ण दक्षिण आशियाच्या भविष्याशीही संबंधित आहे. अफगाणिस्तानातील तालिबान्यांचे शासन, पाकिस्तानात लष्कराच्या तालावर चालत असलेले सरकार, नेपाळ-श्रीलंकेतील अनागोंदी या पृष्ठभूमीवर लवादाच्या या निर्णयाकडे पाहावे लागते. चीनचा दांडगेपणाही लक्षात घ्यावा लागतो. गेल्या वर्षी जुलै महिन्यात बांगलादेशमध्ये सरकारी नोकऱ्यांतील आरक्षणावरून विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. हे आंदोलन फार तीव्र झाले तेव्हा शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी उफाळून आली. शेख हसीना यांचा अवामी लीग पक्ष, सुरक्षा यंत्रणा आणि विद्यार्थी-आंदोलक असे संघर्ष झडले. आंदोलकांवर सुरक्षा यंत्रणांनी कारवाई केली आणि त्यात शेकडो लोक मारले गेले. त्यानंतर परिस्थिती इतकी चिघळली की, शेख हसीना यांना देश सोडून पळून जावे लागले आणि भारतात आश्रय घ्यावा लागला. त्यानंतर बांगलादेशात नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस यांच्या मार्गदर्शनाखाली अंतरिम सरकार आले. त्या सरकारने लवादाची पुन:स्थापना केली आणि १७ नोव्हेंबरला त्या लवादाने शेख हसीना यांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली. हत्या, हत्येचा प्रयत्न, घातक शस्त्रांच्या वापराची परवानगी इत्यादी प्रकारचे आरोप शेख हसीना यांच्यावर आहेत. त्यांनी अर्थातच हे आरोप फेटाळले आहेत आणि ही शिक्षा अनिवार्चित सरकारच्या पुढाकाराने राजकीय हेतूने ठोठावली गेली असल्याचे म्हटले आहे. मूलतत्त्ववादी विचारसरणीचे प्राबल्य असलेल्या देशांचे काय होते, याचे हे आणखी एक उदाहरण म्हटले पाहिजे. पाकिस्तानसारखा बांगलादेशचाही इतिहास रक्तरंजितच आहे. भारतासोबत स्वतंत्र झालेल्या पाकिस्तानची स्थिती आपण पाहतोच आहोत. बांगलादेशची निर्मिती पाकिस्तानच्या विभाजनातून झाली होती, हा इतिहास आहे. परंतु, एकसंघ वा विभाजित पाकिस्तानी प्रदेश हा मुस्लिमबहुल आणि इस्लामी मूलतत्त्ववाद्यांचा प्रभाव असलेला प्रदेश आहे, हे नाकारता येत नाही. शेख हसीना यांचे पिताश्री आणि बांगलादेशचे संस्थापक राष्ट्राध्यक्ष शेख मुजीबूर रहमान यांनी बांगलादेशला प्रगतिशील चेहरा देण्याचा प्रयत्न केला. त्या देशाच्या राज्यघटनेत 'सेक्युलर' शब्दाचा समावेश केला. पण, मूलतत्त्ववाद्यांनी त्यांना सतत त्रास दिला. अखेर शेख मुजीबूर रहमान यांची १९७५ साली त्यांच्या कुटुंबीयांसह हत्या झाली. शेख हसीना म्हणजे त्या शेख मुजीबूर रहमान यांच्या कन्या. त्यांच्या विरोधक आहेत बेगम खालिदा झिया. बेगम खालिदा या माजी राष्ट्राध्यक्ष झिया ऊर रहमान यांच्या पत्नी. खालिदा झिया ज्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या प्रमुख आहेत, त्या पक्षाची स्थापना झिया ऊर रहमान यांनी केली होती. हा पक्ष तितकासा प्रगतिशील विचारसरणीचा नाही. उलट तो मूलतत्त्ववाद्यांच्या जवळचा आहे. शेख मुजीबूर रहमान यांची हत्या झाली तशी झिया ऊर रहमान यांचीही हत्या झाली. झिया ऊर रहमान हे लष्करी अधिकारी होते. त्यांचा जीव लष्करानेच घेतला. एकुणात हा इतिहास फार मोठा आहे. या इतिहासाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य असे आहे की, तो रक्तरंजित आहे, कौटुंबिक वैराचा आहे आणि देशाचे भविष्य पणाला लावण्याचाही आहे. गेली किमान चार दशके बांगलादेश प्रगतिपथावर होता. गारमेंट उद्योगात तर त्याचे जगात नाव झाले होते. जगाच्या कोणत्याही भागात जाऊन रेडिमेड कपडे घेतले तरी ते प्रामुख्याने मेड इन बांगलादेश असायचे, इतका हा व्यवसाय तेजीत होता. इतरही क्षेत्रांत प्रगती होत होती. शिक्षणात चांगले काम होत होते. आरोग्याच्या सोयी वाढत होत्या. गतवर्षी अचानक उफाळलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनामागे असलेल्या शक्तींनी या विकासाला खीळ घातली. काही दोष शेख हसीना यांचाही होताच. पण, त्यातून उद्भवलेल्या संघर्षात बांगलादेशचे फार मोठे नुकसान झाले. प्रगतीच कुंठित झाली. अजूनही बांगलादेशातील लोकांना नेमके काय चालले आहे आणि उपाय म्हणून काय करायचे, हे लक्षात आलेले नाही. नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस हे बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख सल्लागार असले तरी त्यांना या संकटातून देशाला कसे तारायचे याचे भान आलेले दिसत नाही. त्यामुळेच त्यांनी शेख हसीना यांना झालेल्या मृत्युदंडाचे उठवळपणे स्वागत करून टाकले. एकप्रकारे त्यांनी खालिदा झिया यांच्या सुरात सूर मिळविला. बांगलादेशात पुढच्या वर्षी फेब्रुवारीत निवडणुका व्हायच्या आहेत. त्या होतात की नाही, हे आताच सांगता येत नाही.

गतवर्षीपासून सारेच अनिश्चित बनले आहे. आता शेख हसीना यांना ठोठावलेल्या शिक्षेमुळे ही अनिश्चितता वाढलेली आहे. आताच्या स्थितीत भारताची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरणार आहे. शेख हसीना यांना बांगलादेशला परत पाठवावे अर्थात त्यांचे प्रत्यार्पण करावे, अशी मागणी अंतरिम सरकारच्या वतीने भारत सरकारला करण्यात आली आहे. आम्ही स्थितीवर लक्ष ठेवून आहोत आणि सर्व संबंधितांशी बोलत आहोत, असे भारताने म्हटले आहे. मात्र, शेख हसीना यांचे प्रत्यार्पण करणार किंवा करणार नाही, यातले काहीही अद्याप भारताने म्हटलेले नाही. यासंबंधीचा निर्णय इतका सोपाही नाही. भारताचा बांगलादेशशी प्रत्यार्पणाचा करार आहे. या करारानुसार प्रत्यार्पण बंधनकारक असले तरी आरोप किंवा गुन्हा हा राजकीय पृष्ठभूमीचा असेल तर प्रत्यार्पण नाकारले जाऊ शकते, ही बाब शेख हसीना यांच्या पथ्यावर पडणारी आहे. ती सध्या भारताच्याही सोयीची आहे. तरीही भारताला या किंवा त्या टोकाचा निर्णय लगेच घेता येणारा नाही. बांगलादेशातीलच नव्हे तर दक्षिण आशियातील गुंतागुंत आणि आंतरराष्ट्रीय घटकांच्या या नाट्यातील भूमिकाही विचारात घ्याव्या लागणार आहेत. शेख हसीना यांना बांगलादेशच्या सरकारच्या स्वाधीन करण्यास सरसकट नकार दिला तर प्रत्यार्पण कराराचा भंग केला असा आरोप होऊ शकतो. सरसकट होकार भरला तर मूलतत्त्ववाद्यांपुढे भारताचे सरकार नमले, असा अर्थ काढला जाऊ शकतो. शेख हसीना यांना या निकालाविरुद्ध भारतात राहून अपील करण्याची सोय नाही. त्यांना अपील करायचे असेल तर बांगलादेशात परत जावे लागेल. पण, त्या तिकडे गेल्या तर जिवंत राहतील की नाही, याची खात्री नाही. त्यांच्या पक्षाला अर्थात अवामी लीगला निवडणूक लढविण्याची मनाई आहे. त्यामुळे गुंता आणखीनच वाढलेला आहे. शेख हसीना यांनी देश सोडल्यावर बांगलादेशात अल्पसंख्यकांवर अनन्वित अत्याचार झाले. ते रोखावेत यासाठी भारत सरकारने अंतरिम सरकारकडे किती तरी वेळा विनंती केली. पण, मोहम्मद युनूस यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असलेल्या अंतरिम सरकारने अल्पसंख्यकांच्या संरक्षणासाठी काहीही केले नाही. उलट, गेल्या वर्षभरात बांगलादेशचे वर्तमान सत्ताधारी लोक हे पाकिस्तानशी जवळिक साधताना दिसत आहेत.

ज्या पाकिस्तानचे आपल्यावरील वर्चस्व बांगला भूमीतील लोकांना खपत नव्हते, त्यांचेच विद्यमान राज्यकर्ते पाकिस्तानच्या मांडीला मांडी लावून चर्चेची गुऱ्हाळे भरत आहेत. थोडक्यात, शेख हसीना यांना परत पाठवण्यातला धोका आणि त्यांना आश्रय देण्यामुळे निर्माण होऊ शकणारी गुंतागुंत याचा अंदाज घेऊनच भारताला पावले उचलावी लागणार आहेत. या निर्णयाला भू-राजकीय आयाम आहेत. वरकरणी एका व्यक्तीला ठोठावलेल्या मृत्युदंडाचा विषय दिसत असला तरी त्याची रक्तरंजित पृष्ठभूमी पाहिली तर बांगलादेशला मूलतत्त्ववाद्यांच्या हातात सोपवण्यास मदत होईल, अशी भूमिका घ्यायची की हा विषय हाताळण्यासाठी वेगळे कौशल्य पणाला लावायचे, हे भारताला ठरवावे लागणार आहे. भारताचे सरकार समर्थ आहे. अशी गुंतागुंत हाताळण्यासाठीही ते सक्षम आहे. भारताकडे दक्षिण आशियातील राष्ट्रे आणि आंतरराष्ट्रीय समुदाय देखील आशेने पाहतो. अशा वेळी जसे काही अधिकार येतात, तशा अनेक जबाबदाऱ्याही वाढतात. भारताने सदैव आपल्या जबाबदाऱ्यांचे निर्वहन निगुतीने केलेले आहे. त्यामुळे भारत यावेळीही आपल्या देशाचा, दक्षिण आशियाचा आणि एकूण जगाच्या भविष्याचा विचार करूनच निर्णय घेईल, यात शंका नाही. ▮

## विशेष

# विमानतळाजवळ रिअल इस्टेटचे चांगभले

**प्रा. सुखदेव बखळे**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे आजूबाजूच्या परिसरात जमीन आणि घरांची मागणी वाढली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या विमानतळाचे उद्घाटन झाले. त्यानंतर या विमानतळाच्या बाकी राहिलेल्या कामांना गती आली. सध्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. अजून काही टप्पे पूर्ण होणे बाकी आहे. हे विमानतळ मुंबईच्या दोन्ही जुन्या विमानतळांशी जोडले जाणार आहे. नवी मुंबई विमानतळावरून पुण्याच्या दिशेने येणारा साडेतीन हजार कोटी रुपयांचा आणखी एक रस्ता तयार होत आहे. याशिवाय विमानतळाला जोडणारे कल्याणसह अन्य ठिकाणचे रस्ते तयार करण्यात येणार आहेत. बुलेट ट्रेन विमानतळाजवळील परिसरातून जात आहे. त्यामुळे एकात्मिक गतिमान वाहतुकीचा कॉरिडॉर नव्या मुंबईत तयार होत आहे. या सर्वांचा परिणाम नवी मुंबई परिसराच्या विकासावर होत आहे. त्यामुळे रिअल इस्टेटलाही चांगले दिवस आले आहेत. पहिल्या व्यावसायिक उड्डाणापूर्वीच रिअल इस्टेटच्या किमती गगनाला भिडत आहेत. 'ॲनारॉक रिसर्च' या संस्थेच्या अभ्यासानुसार उळवे, पनवेल, तळोजा आणि खारघरमधील जमिनीच्या किमती गेल्या काही काळात ५०-६० टक्क्यांनी वाढल्या आहेत, तर घरांच्या किमती २०-४० टक्क्यांनी वाढल्या आहेत. विमानतळाची उभारणी सुरू असल्यापासून निवासी आणि व्यावसायिक जागांच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. विमानतळ असलेल्या उळवेमध्ये निवासी किमतींमध्ये सर्वाधिक ४० टक्के वाढ झाली आहे, तर खारघरमध्ये या कालावधीत २० टक्के वाढ झाली आहे.

ॲनारॉक प्रॉपर्टी कन्सल्टंट्सचे अध्यक्ष अनुज पुरी यांच्या म्हणण्यानुसार, पुढील दोन वर्षांमध्ये जमिनीच्या किमतीमध्ये ३० ते ४० टक्के अतिरिक्त वाढ होण्याची शक्यता आहे. बहुतेक कॉर्पोरेट कंपन्यांनी नवी मुंबई विमानतळाजवळील जमिनी आधीच विकत घेतल्या असल्याने जमिनीच्या किमतीत आणखी वाढ झाल्यास विमानतळाच्या प्रभावक्षेत्रातील एकूण मालमत्तेच्या किमतींवर दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे. 'स्क्वेअर यार्ड्स' या रिअल इस्टेट कंपनीचे प्रमुख भागीदार आणि मुख्य विक्री अधिकारी दीपक खंडेलवाल यांनी या परिसरातील किमतीत वाढ आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. राज्य सरकारने नवी मुंबई परिसरात तिसरी मुंबई विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. तिसरी मुंबई नवी मुंबईनजीक असल्याने अगोदर नवी मुंबई परिसरात विकासाचा वेग वाढला आहे. राज्य सरकारबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थांनी या परिसराच्या विकासाचा नियोजनबद्ध आराखडा तयार करून व्यवस्थित अंमलबजावणी केल्यामुळे शहराच्या अंतर्गत भागात वाहतुकीच्या



कोंडीसह अन्य समस्या येत नाहीत. आर्थिक वर्ष २०२१ ते आर्थिक वर्ष २०२५ दरम्यान पनवेल परिसरातील घरांच्या किमती सुमारे ७४ टक्क्यांनी वाढून दहा ते बारा हजार रुपये प्रति चौरस फूट झाल्या आहेत, तर नवी मुंबईतील उर्वरित भागात घरांच्या किमतीत ४५ टक्के वाढ झाली आहे. या भागात मालमत्तेची किंमत १९ ते वीस हजार रुपये प्रति चौरस फूटपर्यंत गेली आहे. नवी मुंबईबरोबरच विकसित झालेल्या अन्य उपनगरांच्या आणि मालमत्तांच्या किमतीपेक्षा या किमती जास्त आहेत. पनवेल भागाचे उदाहरण घेतल्यास भूखंडाचे दर सरासरी ऐंशी हजार ते ८५ हजार रुपये प्रति चौरस यार्डपर्यंत पोहोचले आहेत. त्यात झालेली ९३ टक्के वाढ ही सर्वाधिक आहे. नवी मुंबईच्या इतर भागांमधील दरांमध्ये ५८ टक्के वाढ झाली आहे. तिथे किमती जास्त आहेत. पूर्णपणे कार्यरत झाल्यावर देशातील सर्वांत मोठे विमानतळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन जवळ येताच प्रॉपर्टी डेव्हलपर्सनी अनेक प्रकल्प सुरू केले. गेल्या तीन वर्षांमध्ये नवी मुंबईत सुमारे ४५ दशलक्ष चौरस फूट निवासी जागा सुरू करण्यात आल्या. त्यापैकी सुमारे ६७ टक्के जागा फक्त चार प्रमुख सूक्ष्म बाजारपेठांनी दिल्याचे ॲनारॉकने म्हटले आहे. या कालावधीत मुंबईत २८२ दशलक्ष चौरस फूट जागेवरील नव्या प्रकल्पांना सुरुवात झाली आहे. 'अनेक मोठे विकासक या भागात महत्त्वाकांक्षी निवासी प्रकल्प सुरू करत आहेत. त्यामुळे खारघर, पनवेल, उळवे आणि तळोजा ही प्रमुख निवासी केंद्र बनली आहेत', असे पुरी यांनी सांगितले. द गार्डियन्स रिअल इस्टेट ॲडव्हायझरीचे सह-संस्थापक आणि सीईओ राम नाईक यांना उळवेसारख्या प्रमुख सूक्ष्म बाजारपेठांमध्ये मालमत्तेच्या मागणीत अनेक पटींनी वाढ होण्याची अपेक्षा असल्याचे म्हटले आहे. पूर्वी संभाव्य विकसनशील क्षेत्र म्हणून गणला जाणारा हा परिसर आता उच्च-मागणीच्या कॉरिडॉरमध्ये रूपांतरित होईल. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, आगामी मेट्रो लाईन्स आणि सायन-पनवेल महामार्ग विस्ताराद्वारे सुधारित कनेक्टिव्हिटीमुळे संपूर्ण पट्ट्याला दक्षिण मुंबई आणि ठाणे या दोन्ही ठिकाणी जलद प्रवेशाचा फायदा होईल. गुंतवणुकीच्या दृष्टिकोनातून, नवी मुंबई त्याच्या सुवर्ण टप्प्यात प्रवेश करत आहे, असे ते म्हणाले.

पुढील काही वर्षांमध्ये रिअल इस्टेट क्षेत्रात निवडक ठिकाणी २० ते ३० टक्के भांडवलवाढ होऊ शकते. दर्जेदार प्रकल्प आणि वेळेवर अंमलबजावणीची क्षमता असलेले विकासक त्याचा सर्वाधिक फायदा घेऊ शकतात, तर खरेदीदारांना मुंबईतील संतृप्त बाजारपेठांच्या तुलनेत दीर्घकालीन मूल्य जास्त मिळेल. सीबीआरईचे भारत, आग्नेय आशिया, मध्य पूर्व आणि आफ्रिकाचे अध्यक्ष आणि सीईओ अंशुमन मॅगझिन यांच्या माहितीनुसार नवी मुंबई विमानतळाचा शहराच्या रिअल इस्टेटवर, विशेषतः विमानतळाच्या आसपासच्या भागात, परिवर्तनकारी परिणाम होईल. विमानतळ कर्मचारी, कार्यरत व्यावसायिक आणि विमान वाहतूक कर्मचाऱ्यांच्या गरजांमुळे विमानतळाभोवती निवासी जागांची मागणी वाढण्याची शक्यता आहे, तर लॉजिस्टिक्स पार्क, कार्यालये आणि हॉटेल्सच्या विकासामुळे व्यावसायिक मागणी वाढण्याची शक्यता आहे. मालमत्ता विकासक किमती वाढण्याबाबत तितकेच उत्साही आहेत. किमती स्थिर होण्यापूर्वी नजीकच्या भविष्यात त्या आणखी २०-२५ टक्के वाढतील. नवी मुंबई परिसरात ज्या भागात किमती वाढल्या नाहीत, त्या आता वाढतील. वाधवा ग्रुपचे एमेरिटस अध्यक्ष विजय वाधवा म्हणाले की, खारघरसारखी ठिकाणे आता महाग झाली आहेत. अलिकडेच अदानी एअरपोर्ट होल्डिंग्जद्वारे संचालित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने पनवेलमधील वाधवा वाईज सिटी या टाऊनशिप प्रकल्पात वाधवा ग्रुपकडून ४०५ 'रेडी टू मूव्ह इन' फ्लॅट्स भाड्याने घेतले आहेत. नवी मुंबईचे ऑफिस मार्केट म्हणून असलेले धोरणात्मक स्थान, विमानतळाद्वारे वाढलेली कनेक्टिव्हिटी आणि जागतिक प्रवेश यामुळे पुढील काही वर्षांमध्ये या भागात ऑफिस भाडेपट्ट्याने देण्याचा व्यवसाय आणि भाडीही वाढण्याची शक्यता आहे. विमानतळाशेजारी प्रस्तावित ६६७ एकर नवी मुंबई एरोसिटी कारकीर्दीच्या संधी आणि जीवनशैलीचे मिश्रण करणारी एक नवी शहरी परिसंस्था वाढवेल. नवी मुंबई विमानतळ या परिसरातील पाच-दहा किलोमीटर भागाच्याच विकासाला हातभार लावेल असे नाही, तर शेजारच्या रायगड जिल्ह्यातील काही भागांच्या आणि प्रामुख्याने तिसऱ्या मुंबईच्या विकासात महत्त्वाचे योगदान देईल. ▮

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

# अमरावतीत स्वबळाची व बंडखोरीची भाषा

**गिरीश शेरेकर**

अमरावती जिल्ह्यात १० नगरपरिषद व २ नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरू झालेली आहे. नामांकन अर्ज दाखल करण्याच्या सोमवार १७ नोव्हेंबर या शेवटच्या दिवसापर्यंत अध्यक्षपदासाठी १२७ तर सदस्यपदासाठी १८२१ नामांकन अर्ज दाखल झाले होते. महायुती व महाविकास आघाडीतल्या घटकपक्षांनी बहुतांश ठिकाणी स्वबाळाचा नारा दिला आहे. सध्याच्या स्थितीत अन्य पक्षांच्या तुलनेत भाजपात सर्वाधिक बंडाखोरी दिसत आहे. भाजपाच्या अनेक नाराज मंडळींनी दुसऱ्या म्हणजे महायुतीत घटक पक्ष असलेल्या पक्षाचीच वाट धरली आहे. जवळपास सर्वच ठिकाणी उमेदवारी देताना निष्ठावंतांना डावलल्याची भावना तयार झाली आहे. भाजपात त्याचे प्रमाण जास्त असल्याने नाराजी व असंतोष जास्त आहे. त्याचे एक प्रमुख कारण भाजपाची उमेदवारी मागणाऱ्यांची संख्याही भरपूर होती आणि मलाच उमेदवारी मिळणार हा विश्वास अनेकांना होता. पण, उमेदवार याद्या जाहीर झाल्यानंतर त्यांच्या तोंडातून खदखद शब्दरूपाने वेगाने बाहेर पडत आहे.

जिल्ह्यात ९ वर्षांपूर्वी जेव्हा नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुका झाल्या होत्या तेव्हा भाजपाचे वरूड, मोर्शी, शेंदूरजना घाट, चांदूर बाजार, दर्यापूर, धामणगाव रेल्वे, अंजनगाव सुर्जी, नांदगाव खंडेश्वर येथे अध्यक्षपदाचे उमेदवार विजयी झाले होते. विजयी सदस्यांची संख्या भाजपाचीच जास्त होती. या कार्यकाळ नैसर्गिक न्यायाने सत्ताधाऱ्यांच्या विरोधात नाराजी वाढली होती. नव्या निवडणुकांची चाहूल लागत असतानाच कोरोना महामारीमुळे जिल्ह्यासह राज्यातल्या सर्वच नगरपरिषद व नगरपंचयातींवर प्रशासक राज आले. तेव्हापासून जिल्ह्याच्या राजकारणाच्या नदीतून बरेच पाणी वाहून गेले. काही ठिकाणी राजकीय पूर आले. दरम्यानच्याच काळात लोकसभा व विधानसभा निवडणुका झाल्या. वातावरण स्थिरसावर झाल्यावर या निवडणुका होत आहे. नेहमीप्रमाणे निवडणुका होतील, ही अपेक्षा बाळगून असलेल्यांना धक्का देत निवडणूक आयोगाने अत्यंत कमी वेळेतली निवडणूक प्रक्रिया जाहीर केली. त्यात काहींचे जमले तर काही हिरमुसले. त्यात आता जिल्ह्यातल्या राजकीय घराण्यातल्या काही व्यक्तींना उमेदवारी मिळाल्या आहे. अकोट मतदारसंघाचे भाजपाचे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या पत्नीला दर्यापूर नगरपरिषद अध्यक्षपदाची उमेदवारी मिळाली आहे. नलिनी भारसाकळे असे त्यांचे नाव आहे. त्याच प्रमाणे भाजपाचे धामणगाव रेल्वे मतदारसंघाचे आमदार प्रताप अडसड यांच्या भगिनी डॉ. अर्चना रोठे - अडसड यांना धामणगाव रेल्वे नगरपरिषद अध्यक्षपदाची उमेदवारी मिळाली आहे. दर्यापूर मतदारसंघाचे शिवसेना उबाठाचे आमदार गजानन लवटे यांनी पुत्र यश लवटे यांच्यासाठी अंजनगाव सुर्जी नगरपरिषद अध्यक्षपदाची उमेदवारी खेचून आणली आहे. आल्हाद कलोती यांनी चिखलदरा नगरपरिषदेच्या निवडणुकीत भाजपातून नामांकन दाखल केल्याने त्याकडे अनेकांचे लक्ष आहे. या उमेदवारींची चर्चा तर होतच आहे आणि संपूर्ण निवडणूक काळात होत राहील. इतर पक्षांतून आलेल्यांना भाजपाने काही ठिकाणी अध्यक्ष व सदस्यपदाची उमेदवारी दिल्याने नाराजी आहे. काही ठिकाणी तर नवख्या उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. काँग्रेसने स्वपक्षातल्याच उमेदवारांना संधी देताना मुस्लिम समाजाला प्राधान्य दिले आहे. इतर पक्षांमध्ये स्वत:चे व आयातीत उमेदवार आहेत. असंतोष दोन्ही बाजूने आहेच, फक्त प्रमाण कमी जास्त आहे. आता जिल्ह्यात राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. महायुती व महाविकास आघाडीचे घटक पक्ष स्वबळावर निवडणूक जिंकण्याच्या तोऱ्यात आहे. त्यात त्यांना किती फायदा होईल, हे सांगता येत नाही. भाजपा फायद्यात राहू शकते पण, त्यासाठी ठिकठिकाणी उफाळलेला असंतोष त्यांना शमवावा लागेल. इतर पक्ष भाजपातील कार्यकर्त्यांच्या खदखदीवरच अवलंबून आहे. ती शेवटपर्यंत कायम राहिली तर आपले नशीब उजळू शकते, असे काहींना वाटते. त्यात काही प्रमाणात का होईना सत्यता निश्चित आहे. हा सर्व अंदाज घेऊनच भाजपाला निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे. काही ठिकाणी भाजपाविरुद्ध इतर सर्व असेही प्रयत्न होत आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्यापर्यंत बरीच उलथापालथ होऊ शकते. भाजपाने त्यावर काम सुरू केले असेलच. त्यात त्यांना किती यश मिळते यावरच अपेक्षित निकालाचे गणित आहे. मागच्या निवडणुकीपेक्षाही भाजपाला चांगली कामगिरी करायची असेल तर चक्रव्यूह भेदावा लागेल. ▮

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता - मोक्षसंन्यास योग

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्भगवद्गीतेचा १८ वा अध्याय मोक्षसंन्यास योग आहे. श्रीगीतेचा हा अंतिम अध्याय आहे. या अध्यायाला कळसाध्याय असेही म्हणतात. हा अध्याय म्हणजे संपूर्ण गीतेचा अर्क आहे. एका अर्थाने ही अवतरणिकाच आहे. या अध्यायात गीतेचे सर्व अध्याय समाविक्ती आहेत. 'ज्ञानदेवा सार चोजविले' असा हा अध्याय. सिंहावलोकन करणारा हा अध्याय आहे. या अध्यायात मोक्षप्राप्तीचे गुह्यज्ञान सांगितले आहे. संपूर्ण गीतेमध्ये आपण वारंवार कर्मसंन्यास आणि कर्मफलत्याग हे दोन शब्द वाचले आहेत. त्यांना यथार्थ जाणण्याच्या दृष्टीनेच अर्जुनाने प्रश्न केला-

अर्जुन उवाच - 'सन्न्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् ।<br>
त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥'

हे महाबाहो, हे हृषीकेश, संन्यास आणि त्याग या शब्दांचे सांगोपांग चिंतन ऐकण्याची इच्छा आहे. भगवंत सांगतात की, अर्जुना! काही विद्वान सर्वकर्म त्यागाला संन्यास म्हणतात तर काही सर्वकर्म त्यागालाच त्याग म्हणतात. काही विद्वान म्हणतात की, कर्म दोषयुक्त असल्यामुळे त्याचा त्याग करणे योग्य आहे तर काही म्हणतात की यज्ञ, दान आणि तप या कर्मांचा अजिबात त्याग करू नये. भगवंत म्हणतात, अर्जुना! विद्वान काय म्हणतात ते जाऊ दे. मी काय म्हणतो ते नीट ऐक-

'यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।<br>
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥'

यज्ञ, दान आणि तप या कर्मांचा त्याग करणे योग्य नाही; उलट या तिन्ही कर्माचे अनुष्ठान करावे. कारण ते चित्तशुद्धीचे साधन आहेत, पण हे तिन्ही कर्म आसक्तीने नकोत.

'एतान्यपि तु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा फलानि च ।<br>
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥'

यज्ञ, दान आणि तप कर्मफळाचा त्याग करून करावीत, असे माझे स्पष्ट मत आहे. त्यागही तीन प्रकारचा आहे. सात्त्विक, राजसिक आणि तामसिक.

'नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ।<br>
मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ॥'

मोहाने केलेला त्याग तामसिक त्याग आहे.

'कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ।<br>
सङ्गं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः ॥'

आसक्ती न ठेवता कर्मफळाचा त्याग करून केलेला त्याग हा सात्त्विक त्याग होय. खरं तर आपण देहधारी आहोत. त्यामुळे आपल्याकडून संपूर्ण कर्मांचा त्याग केवळ अशक्य आहे. जो फळाची अपेक्षा ठेवतो त्याला इष्ट, अनिष्ट किंवा संमिश्र फळ मृत्यूनंतर प्राप्त होईल. म्हणजे देवलोक, नरक किंवा पुन्हा मनुष्य लोक प्राप्त होईल; परंतु फळाची अपेक्षा न ठेवणाऱ्या पुरुषाला यातील काहीही न मिळता फक्त मोक्ष मिळतो. कर्माच्या सिद्धीसाठी भगवंतांनी वेदांतात पाच घटक सांगितले आहेत-

'अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।<br>
विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ॥'

अधिष्ठान, कर्ता, इंद्रिये, इंद्रिय व्यापार आणि दैव हे ते पाच घटक आहेत. आपण जेव्हा शास्त्राला धरून किंवा शास्त्राविरुद्ध कर्म करतो त्यालाही हेच पाच घटक कारणीभूत आहेत. अजून एक सांगतो-

'यस्य नाहङ्कृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।<br>
हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ॥'

अर्जुना! जो पुरुष 'मी कर्ता' नसून 'कर्ता करविता परमेश्वर' असा शुद्ध भाव ठेवतो तो पुरुष बद्ध होत नाही. तू युद्धात सर्वांना मारले तरीही त्यांना तू मारले नाही तर त्यांना मारणारा किंवा तारणाराही मीच आहे, याची आठवण सहज भगवंत देतात. यासाठी कर्ता, कर्म आणि करण हा कर्मसंग्रह आणि ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान हे कर्मप्रेरक यावर प्रतिपादन करतात. यामध्ये ज्ञान, कर्म आणि कर्ता यांचे सात्त्विक, राजसिक आणि तामसिक असे तीन प्रकार भगवंत सांगतात.

'सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।<br>
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् ॥'

ज्या ज्ञानाने मनुष्य चराचरात भगवंत पाहतो ते ज्ञान म्हणजे सात्त्विक ज्ञान.

'पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ।<br>
वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ॥'

ज्या ज्ञानाने माणूस भूतमात्रामध्ये भेद करतो ते ज्ञान राजसिक ज्ञान.

'यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम् ।<br>
अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥'

कर्माचेही भेद भगवंत सांगतात- जे कर्म शास्त्राला धरून, फळाची अपेक्षा न ठेवता केले जाते ते सात्त्विक कर्म आहे. जे कर्म ऐहिक सुखासाठी फळाची अपेक्षा ठेवीन परिश्रमपूर्वक केले जाते ते राजसिक कर्म. जे कर्म परिणाम, हानी, हिंसा, आपल्या सामर्थ्याचा विचार न करता अविचाराने केले जाते ते तामसिक कर्म होय. भगवंत कर्त्याचे प्रकार स्पष्ट करतात-

'मुक्तसङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।<br>
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥'

आसक्तीरहित धैर्य आणि उत्साहाने युक्त, हर्ष किंवा शोकात निर्विकार असणारा कर्ता सात्त्विक कर्ता असतो.

'रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ।<br>
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ॥'

आसक्ती ठेवणारा, दुसऱ्यांना पीडा देणारा, अशुद्ध, हर्ष आणि शोकाने परिणाम होणारा कर्ता राजसिक कर्ता आहे.

'अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ।<br>
विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते ॥'

संस्कारशून्य, उद्धट, कपटी, विध्वंसक, आळशी असा कर्ता तामसिक कर्ता असतो. यापुढे भगवंत बुद्धी आणि धृतीचेही याच तीन प्रकारात वर्णन करतात. सात्त्विक बुद्धी ती की जिला प्रवृत्ती आणि निवृत्ती, कर्तव्य आणि अकर्तव्य, भय आणि अभय किंवा बंध आणि मोक्ष यांच्या स्वरूपाची जाण असते. ज्या बुद्धीला वरील बाबींची जाणीव नसते ती राजसिक बुद्धी. जी बुद्धी अधर्माला धर्म मानते ती तामसिक बुद्धी होय. आता धृतीसंबंधात विचार मांडला आहे. धृती म्हणजे धैर्य. धृती ही बुद्धीची प्रवृत्ती आहे. ज्या धृतीने मन, प्राण आणि इंद्रिय धारणा संयमित केल्या जातात ती सात्त्विक धृती होय. ज्या धृतीने धर्म, अर्थ आणि काम यांना धारण करून मनुष्य फळाची आकांक्षा ठेवतो ती राजस धृती होय. ज्या धृतीत निष्ठा, भय, शोक, विषाद आणि उन्माद असतो ती तामस धृती होय. भगवंताने याच अध्यायात सुखाचे तीन प्रकार सांगितले आहेत. जे सुख सुरुवातीला विषासारखे वाटते, पण त्याचा परिणाम अमृतासम असतो, ते सात्त्विक सुख आहे. जे सुख विषयभोगामुळे अमृतासमान वाटते, पण त्याचा परिणाम विषासारखा दुःखद असतो ते राजसिक सुख आहे. जे सुख झोप, आळस, प्रमाद यामुळे वाटते ते तामसिक सुख आहे.

'न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ।<br>
सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिःस्यात्त्रिभिर्गुणैः ॥'

हे अर्जुना, या त्रिलोकात एकही जीव असा नाही की, जो प्रकृतीच्या त्रिगुणातून (सत्त्व-रज-तम) मुक्त आहे. या अध्यायाच्या प्रथम लेखात एकूण ४० श्लोकांचा विचार केला असून त्यात संपूर्ण कर्माचा त्याग किंवा संन्यास योग्य किंवा हितकारक नाही. वेदप्रतिपाद्य यज्ञ, दान, तप इत्यादी कर्म, त्याचे अनुष्ठान करणे आपले इष्ट कर्तव्य आहे. अध्यायाचा दुसरा भाग पुढील भागात... ▮

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### वातावरणातील बदल

दिवाळी, तुळशीचे लग्न झाले तरी बाजारपेठेतील उत्सवी वातावरण काही कमी झाले नाही. आता लग्नसराईचे दिवस सुरू झाले आहेत त्यामुळे सगळीकडे लगबग दिसू लागली आहे. आजकाल दिवाळीत थंडीची हजेरी न लागता थोडी उशिराने म्हणजे आताशी जाणवायला लागली आहे. त्यामुळे सकाळी सगळीकडे आल्हाददायक वातावरण आहे. सकाळी फिरायला गेल्यावर गरम आल्याच्या चहाचा, बुचीच्या फुलांचा दरवळ आसमंतात दरवळतो. सगळीकडे थंडीच्या कपड्यांचे सेल सुरू झाले आहेत. तिबेटीयन मार्केटमध्ये विविधरंगी ऊबदार कपड्यांचे प्रदर्शन लागले आहे. आपण नुसता फेरफटका मारला असता अनेकविध स्टायलिश तसेच पारंपरिक वूलन कपड्यांचे दर्शन होते.

आहाराची विविधता तर याच दिवसांत अनुभवण्यास मिळते. याच दिवसात अनेक समारंभाचे आयोजन केले जाते. त्यातील चटकदार गरम खाद्यपदार्थांवर जास्त भर दिला जातो. या दिवसात बाजारात फेरफटका मारणे हा अनुभव नेत्रसुखद असतो. भाज्यांच्या किमती जरा घसरल्या असतात. नानाविध हिरव्यागार भाज्यांनी गाड्या/दुकाने सजली असतात. कोथिंबीरीच्या जुड्यांना पुडाच्या वडीचे वेध लागतात. गर्मीचा प्रभाव कमी झाल्यामुळे सगळीकडे एकदिवसीय सहलीचे कार्यक्रम आखले जातात आणि निसर्गाचा आनंद घेतला जातो. मार्गशीर्ष महिन्यात गुरुवारचे महत्त्व अधिक असते. तसेच श्री मल्हारी मार्तंड षडरात्र उत्सव, नागदिवाळी, दत्त सप्ताह याच महिन्यात असतो. कफ, वात प्रवृत्ती असणाऱ्यांनी मात्र स्वतःची काळजी घ्यावी तसेच प्रत्येकाने गरजू लोकांना गरम कपडे दान करून समाजाचे ऋण फेडावे.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

●● ●●

### नरेंद्र मोदी नावाचे गारूड

नुकतेच आम्ही सर्व कुटुंबीय गुजरातमध्ये सहलीसाठी गेलो होतो. अहमदाबादमधील सर्व प्रेक्षणीय स्थळे, अटल ब्रिज, तेथील जवळपास शंभराहून अधिक असलेल्या १९व्या शतकातील जुन्या कार्सचे प्रदर्शन, बारा ज्योतिर्लिंगांपैकी सर्वांत प्रथम असलेले श्री सोमनाथ मंदिर, तेथील उत्कृष्ट लाईट शो, गीरचे अभयारण्य, श्रीकृष्णाने अंतिम श्वास घेतला ते भालका तीर्थ, सरदार सरोवर, धरणाच्या बाजूला उभारलेला सरदार पटेल यांचा जगातील सर्वांत उंच असलेला प्रचंड मोठा पुतळा, जुनागडचा किल्ला, किल्ल्यावरून घेतलेले गिरनारचे दूरदर्शन अशा अनेक गोष्टींचा समावेश आहे. या सहलीमध्ये सर्वांत जास्त जाणवले ते नरेंद्र मोदी नावाचे गारूड ! सरदार सरोवर परिसरात तर पटेलांच्या पुतळ्यापेक्षाही, सर्वच बाबतीत, पंतप्रधान नरेंद्र मोदींची जास्त जाहिरात आणि प्रसिद्धी केली आहे. यात एका शब्दाचीही अतिशयोक्ती नाही. अर्थात जनताही मोदींना मनमोकळेपणाने मान देते हेही जाणवले. सरदार सरोवराजवळ असलेल्या प्राणी संग्रहालय दाखवण्यासाठी असलेल्या ई- रिक्षा फक्त महिलाच चालवतात. नरेंद्र मोदींनी आपल्या कारभारातून हा सन्मान मिळवला आहे हे वादातीत आहे. सगळीकडे प्रशस्त रस्ते, शिस्तबद्ध वाहतूक, उत्तम शहर बस व्यवस्था, सर्वच गोष्टींमध्ये असलेली स्वस्ताई, खाद्यपदार्थांची रेलचेल, सार्वजनिक स्वच्छता, मोठी पात्रे असलेल्या स्वच्छ आणि वाहत्या नद्या, भरपूर वनराई, स्वच्छ समुद्रकिनारे अशा अनेक गोष्टींनी आमची सहल अविस्मरणीय केली. मोदी नावाच्या जादूगाराचे हे गारूड गुजराती जनतेच्या मनातून जाण्याची कोणतीही शक्यता नाही आणि भारतभर ते पसरले यातही काहीही आश्चर्य नाही. ▮

**शिवराम वैद्य** /९८५०५१८०१८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस<br>
tbedit2016@gmail.com<br>
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-४७

बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५

### नौजवान सैनिका उचल पाउला

नौजवान सैनिका उचल पाउला<br>
पुढे चला पुढे चला ध्वनि निनादला ॥धृ.॥

मायदेश आपुला स्वतंत्र जाहला<br>
उच्च कीर्तिशिखरिं चढविण्यास त्याजला<br>
व्हा तयार! व्हा हुशार! घोष जाहला ॥१॥

शिवाजि शूर बाजि वीर बापू गोखले<br>
प्रताप थोर समरवीर अमर जाहले<br>
ती उदात्त भव्य दिव्य स्मर परंपरा ॥२॥

टिळक केशव नरेन्द्र थोर अग्रणी<br>
रंगले स्वदेशकार्यि स्वार्थ त्यागुनी<br>
त्यासमान देव मान देश आपुला ॥३॥

मार्ग तव तुला जरी भयाण वाटला<br>
विपत्तिचा गिरी जरी समोर ठाकला<br>
बेधडक तू दे धडक नि फोड त्याजला ॥४॥

महत्वाचे...



## मोहंम्मद अयाज यांचा राष्ट्रीय अचिव्हर्स पुरस्काराने सन्मान

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

सोलापूरचे गायक मोहम्मद अयाज यांना राष्ट्रीय अचिव्हर्स पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आला. हा पुरस्कार ऊर्जा मंत्री श्रीपाद नाईक व प्रख्यात निर्माता दिग्दर्शक मेहूल कुमार यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी उद्योगपती शाम सिंघानिया तसेच चित्रपट सृष्टीतील दिग्गज मान्यवर उपस्थित होते. स्वदेश फाऊंडेशन त्यांच्या कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय अचिव्हर्स पुरस्कार २०२५ हा मानाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आला. हा भव्य सोहळा रविवार दि. १६ नोव्हेंबर रोजी मुंबई येथील पंचतारांकित हॉटेल रेडिसन येथे पार पडला. यावेळी अभीनेत्री अंकीता रावल, नताशा फर्नांडिस, दिग्दर्शक टिनू वर्मा, स्वदेशचे संजीव कुमार, आदित्य देशमुख, वैभव शर्मा, युसुफ शाकीर उपस्थित होते.



## बाळासाहेब ठाकरे यांना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात अभिवादन

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक संतोष बुलबुले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक रजनी राऊळ, तरंगिणी कोंडा, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, नंदकुमार फुलारी,अविनाश शिंदे, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, ताहीर बिराजदार, भालचंद्र साखरे, नाशिर खान, सायली ढोले उपस्थित होते.



## डॉ. कोटणीस मेमोरियल रेल्वे हॉस्पिटलमध्ये बालदिन साजरा

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने बालकांच्या कल्याणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी वचनबद्धतेची पुष्टी करत डॉ. कोटनीस मेमोरियल रेल्वे हॉस्पिटलमध्ये बालदिन साजरा केला. ८ ते १२ वयोगटातील मुलांसाठी आयोजित क्विझ स्पर्धेत त्यांचे ज्ञान आणि टीमवर्कची चाचणी घेण्यात आली तर पिक अँड स्पीक स्पर्धेत सहभागींना त्यांचे संवाद कौशल्य दाखवता आले. ८ वर्षांखालील मुलांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धेने उत्सवात आकर्षण निर्माण केले. मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. मंजुनाथ आणि अतिरिक्त मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. कृष्णा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाचे प्रभारी डॉ. विनोद यांच्या समर्पित प्रयत्नांसह, मुख्य परिचारिका अधीक्षक राहुल गंबारे आणि मुख्य आरोग्य निरीक्षक सागर नळ यांच्या सहकार्याने कार्यक्षमतेने समन्वय साधण्यात आला. स्पर्धांचे मूल्यांकन डॉ. देवीलाल आणि डॉ. मेघना यांनी केले, त्यांनी मुलांच्या उत्साह आणि प्रतिभेचे कौतुक केले. प्रत्येक श्रेणीतील विजेत्यांना डॉ. मंजुनाथ आणि डॉ. रतन यांनी सन्मानित केले, त्यांनी सहभागींचे अभिनंदन केले.

## नतमस्तक या मराठी चित्रपटाची पोस्टर लाँचद्वारे घोषणा

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

नवनवीन विषयांवरील प्रयोगशील चित्रपटांची थोर परंपरा लाभलेल्या मराठी सिनेसृष्टीत आणखी एका अनोख्या विषयावर आधारलेला चित्रपट बनविण्यात येत आहे. समाजाभिमुख चित्रपटांना नेहमीच प्रेक्षकांचा कौल मिळाला आहे. त्यामुळेच समाजाला आरसा दाखविणाऱ्या चित्रपटांची निर्मिती होत असते. नुकतीच घोषणा करण्यात आलेला नतमस्तक हा मराठी चित्रपट याच वाटेवरील पुढचे पाऊल आहे. या चित्रपटात नेमके काय पाहायला मिळेल याची उत्सुकता वाढविण्याचे काम पोस्टर करीत आहे.निर्माते रमेश वामनराव शिंदे यांनी आर. एस. गोल्डन ग्रुप मुव्ही मेकर्सच्या बॅनरखाली नतमस्तक चित्रपटाची निर्मिती केली आहे. रमेश शिंदे यांची ही पहिलीच चित्रपट निर्मिती आहे. महेश रावसाहेब काळे याचे दिग्दर्शन करीत आहेत. दिग्दर्शक महेश काळे यांच्याबाबत सांगायचे तर त्यांनी दिग्दर्शित केलेल्या रुपया या लघुपटाने राष्ट्रीय पुरस्कारावर मोहोर उमटवली आहे. याखेरीज त्यांच्या घुमा चित्रपटाने महाराष्ट्र राज्य सरकारचा पुरस्कार पटकावला आहे. ललित प्रभाकर अभिनीत टर्री या टेरबाज मराठी चित्रपटानंतर काळे यांचा नतमस्तक हा एका वेगळ्या विषयावरील चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# झटपट प्रसिद्धीसाठी समाजमाध्यमांवर नवनवीन फंडे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -**

प्रसिद्धी मिळिवण्यासाठी रील बनवणे ते सोशल मीडिया, इन्स्टाग्राम, फेसबुक आदी माध्यमांवर अपलोड करण्याचा फंडा विशेषता तरुणांमध्ये लोकप्रिय होऊ लागला. यामध्ये जिवाशी खेळ खेळणारे, स्टंटबाजी करून दुसऱ्याला त्रास देणे आणि बदनामी करणाऱ्या गुन्हेगारी रिल्समुळे पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे. उरण परिसरातील स्टंटबाजी होत असली तरी याप्रकरणी अद्याप एकही गुन्हा दाखल झाला नसल्याचे पोलिसांकडून सांगितले जात आहे. दिवसेंदिवस हौशी रील स्टारची संख्या वाढत आहे.

रील्सला मोठ्या संख्येने लाईक्स, कमेन्ट मिळाव्यात, व्हिडिओ व्हायरल व्हावेत यासाठी काहीजण दररोज सोशल मीडियावर व्हिडीओ अपलोड करीत असतात. यापैकी बहुतांश रिल्स प्रसिद्धी मिळिवण्यासाठी तर काही गुन्हेगारी रील्स कुणाची तरी बदनामी करण्याच्या उद्देशाने सोशल मीडियावर टाकले जातात. रील्स करण्याच्या नादात सामाजिक प्रतिष्ठा पणाला लावण्याचे प्रकारही दिवसेंदिवस वाढत आहेत .

गुन्हेगारीची पार्श्वभूमी रीलसचे व्हिडिओ व्हायरल करण्यासाठी दिवसेंदिवस गुन्हेगारीने कळस गाठला आहे. सध्या रस्त्यावर, गल्लीत चौकात होणारी अनेक गुन्हेगारी स्वरूपाची कृत्य सोशल मीडियावर दिसून येऊ लागली आहेत. आक्रमक भाषणे, अफवांमुळे सामाजिक वातावरण गढूळ होण्याचे प्रकार वाढले आहेत. आता तर सोशल मीडिया, इन्स्टाग्रामच्या माध्यमातून तरुणांकडून खुलेआम गुन्हेगारीला प्रवृत्त करणारे रिल्स अपलोड केले जात आहेत.

रिल्सच्या दुनियेत चांगले व वाईटांची जाण नसल्याने भरकटणारा एक खूप मोठा वर्ग उदयास आला आहे. त्यामुळे सोशल मीडियावरील अपलोड होणाऱ्या रिल्सवर वचक कुणाचा, असा प्रश्न या निमित्ताने नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### नियमावली आवश्यक

कोणाच्या जिवाची पर्वा न करता रिल्स बनवताना दिसत आहे. सोशल मीडियावर रिल्स बनवून प्रसिद्ध होणाऱ्यांची संख्या फार आहे. काहीतरी स्टंट करायचा किंवा हुल्लडबाजी करुन प्रसिद्ध होण्याचं फॅड वाढत आहे. अनेकदा जिवाला धोका असूनही अनेक लोक प्रसिद्धीसाठी असे घातक असणारे रिल्स करतात. त्यांच्यावर ठोस कारवाईसाठी नियमावली आवश्यक असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. रील बनवणे आणि गुन्हेगारी कृत्ये या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. रील बनवण्याचे वेड हे गुन्हेगारी कृत्यांना प्रोत्साहन देऊ शकते. समाजात वाढते प्रकार चिंता वाढविणारे आहेत.



## दादाई व गुरूकृपा सामाजिक संस्थेतर्फे टकारी समाजातील सुपुत्रांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -**

टकारी समाजातील सुपुत्र दत्तात्रय गायकवाड यांची तहसीलदार पदी पदोन्नती होऊन धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालय येथे नेमणूक झाल्याने दादाई बहुउद्देशीय समाजसेवी संस्था व गुरूकृपा बहुउद्देशीय सेवा भावी संस्था मित्र परिवाराच्या वतीने गुरूकृपा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमेश जाधव यांच्या हस्ते मानाचा फेटा शाल पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

प्रशांत जाधव यांची देखील उपअधीक्षक सिटीसर्वे धाराशिव (उस्मानाबाद)येथे पदोन्नती मिळाल्याने त्यांचा सत्कार दादाई संस्थेचे संस्थापक अध्यक्ष युवराज जाधव यांच्या हस्ते मानाचा फेटा शाल पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी लाभलेले विभाग जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथील सहाय्यक महसूल गजानन गायकवाड यांचा सत्कार शिवाजी जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. कबड्डी महाराष्ट्र राज्य निवड समिती सदस्य पदी अंबादास मारुती गायकवाड यांची निवड झाल्याबद्दल छायाप्पा चव्हाण यांच्या हस्ते त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी अक्कलकोट तालुका जेऊर ग्रामपंचायत सदस्य व माजी सरपंच सुनील जाधव, बाबासाहेब शेख, रवींद्र गायकवाड, बालाजी जाधव, यल्लाप्पा जाधव, निलेश गायकवाड, विवेक जाधव, नागेश कलाल, शंकर लांडगे, ऋषिकेश जाधव, श्रेयस गायकवाड, सुजल गायकवाड, समर्थ जाधव, अनिकेत गायकवाड, पृथ्वी जाधव आदी उपस्थित होते.

## बहुजन शिक्षक महासंघाच्या स्नेह मेळाव्यात देवकर यांचा सन्मान

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाचा स्नेहमेळावा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर महानगरपालिकेच्या हिरवळीवर संपन्न झाला.

महासंघाचे सोलापूर जिल्हा सचिव आणि बहुजन शिक्षक व कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे खजिनदार रवी देवकर यांना पुणे येथे तिसरे अखिल भारतीय वडार बोली साहित्य संमेलन यांच्यावतीने राष्ट्रीयस्तरीय क्रांतिवीर वड्डे ओबाण्णा समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्यानिमित्त महासंघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर आणि राज्य सरचिटणीस प्राचार्य बोधीप्रकाश गायकवाड यांच्या हस्ते रवी देवकर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रवी देवकर यांच्या कार्यावर प्रदेशाध्यक्ष समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर, राज्य सरचिटणीस प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड, राज्य उपाध्यक्ष उपप्राचार्य प्रकाश शिंदे, निर्मला मौळे आदींनी प्रकाश टाकला. तसेच प्रा. अभिजीत भंडारे यांनी देवकर यांच्या कार्याची महती स्वरचित कवितेतून व्यक्त केली. प्रारंभी संविधान बचाव समिती यांच्यावतीने आयोजित दि. २६ नोव्हेंबर रोजीच्या मोर्चात उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष उपप्राचार्य प्रकाश शिंदे, जिल्हाध्यक्ष प्रा. युवराज भोसले, मोहोळ तालुकाध्यक्ष शिवाजी जगताप, उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष नितीन गायकवाड, प्रिया कदम, पृथ्वी शिंदे, रिजवाना बेलीफ, मेहबूब तांबोळी, एकोराम चौगुले, रवींद्र चौगुले, फरीदा बेलीफ, जयदीप गायकवाड, स्वप्नजा कसबे, इन्नुस बाळगी, नागेश सातपुते, भीमराव माने, संदीप निस्ताने, डॉ. श्रुतिका उडाणशिव, राजेंद्र सोरटे, महानंदा शिंदे, इरफान शेख उपस्थित होते. प्रास्ताविक इन्नुस बाळगी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. युवराज भोसले यांनी केले तर निर्मला मौळे यांनी आभार मानले.



## राजे गणपती सांस्कृतिक मंडळाच्या वतीने बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त राजे गणपती सांस्कृतिक मंडळाच्या वतीने बाळासाहबे ठाकरेंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेनेचे सोलापूर लोकसभा प्रमुख पुरुषोत्तम बरडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी शिवसेनेचे शहर संघटक सुरेश जगताप, लहु गायकवाड, तुषार आवताडे, महिला आघाडीच्या स्वाती रुपणर, वैशाली सातपुते, दत्ता खलाटे, दीपक दळवी, विभागप्रमुख आबा सावंत, संजय साळुंखे, महेश गवळी, सुभाष सातपुते, राहुल परदेशी, वैभव पाटील, मंगेश क्षीरसागर, तानाजी पाटील, राजेश पानकर, विशाल दंगेकर, बाळासाहेब बेंडकाळे, ज्ञानदेव वाघमोडे, ज्ञानदेव सुरवसे प्रशांत गुंड, विवेक रुपनर, मल्लू चौगुले, सुनील इसड, सुहास लोंढे उपस्थित होते. सूत्रसंचालन संजय साळुंखे यांनी केले तर आभार सुरेश जगताप यांनी मानले.



## अक्कलकोट रोड परिसरातील नगरांमध्ये अर्धवट विकास कामे

### महिलांनी केली सुविधा मिळण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -**

येथील अक्कलकोट रोड परिसरातील विविध नगरांमध्ये पाणी ड्रेनेज आणि रस्त्यांची वेगवेगळी विकास कामे महापालिका प्रशासनाने हाती घेतली आहेत. मात्र ही कामे अर्धवट स्वरूपात करण्यात आल्याने याचा नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

ही कामे तातडीने पूर्ण करण्यात येऊन यासह विविध सोयी सुविधा नगरातील नागरिकांना उपलब्ध करून द्यावीत अशी मागणी सोलापूर महापालिकेत मोर्चा स्वरूपात आलेल्या महिलांनी जनता दरबारात केली.

अक्कलकोट रस्त्यावरील तसेच एमआयडीसी परिसरातील अंबिका नगर, ईश्वर नगर, गंगा नगर, विश्वास नगर, तिरूपती नगर, कमलेश्वर नगर, हिमगिरी नगर भाग २-३, कामाक्षी नगर आदी नगरे असून या नगरांमधील नागरिक अनेक सुविधांपासून वंचित आहेत. या ठिकाणी सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी पाण्याची पाईपलाईन टाकण्याचे काम हाती घेण्यात आले. मात्र ही पाईपलाईन हिमगिरी नगरापर्यंतच येऊन काम अर्धवट राहिले आहे. अनेकवेळा महापालिकेत तक्रार करण्यात आली. नगरात नळ, ड्रेनेज व पोलची सुविधा करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आले. पण बजेट नसल्याचे सांगण्यात येते.

आजपर्यंत ट्रॅक्टरव्दारे पाणीपुरवठा केला जातो. असे किती दिवस चालणार अशी विचारणा करत महिलांनी जनता दरबारात महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांचे लक्ष वेधून घेतले. या भागातील विविध विकास कामे तातडीने करण्यात यावीत अन्यथा महापालिकेवर मोर्चा आणण्यात येईल असा इशाराही यावेळी देण्यात आला.

यावेळी विविध नगरांमधील अंबिका देवकर, सुवर्णा विटकर, रेखा पवार, कमलाबाई पवार, आसमा शेख, मुमताज सय्यद, सविता बंदपट्टे, अन्नपूर्णा देशमुख, कमळाबाई मंजुळकर, महादेवी जाधव, अंबाबाई पवार, यल्लमा अलकुंटे, सुनिता बटोने, सुशाबाई केंगरे, वनमाला बंदपट्टे, लक्ष्मी शिंदे, सुनिता चौगुले आणि चंदा शिंदे आदी महिला उपस्थित होत्या.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-24. तारीख: 18.11.2025. DRM(ST) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि इंडला अध्यक्षांच्या वतीने रेल्वेच्या ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/ठेकेदारांकडून ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहे:- कामाचे नाव त्याच्या परिसरासह: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात सर्ज प्रोटेक्शन डिव्हाइसेसची तरतूद आणि पृथ्वी कनेक्शनचे बंधन असलेल्या ST प्रतिष्ठानांमधील मातीचे अपग्रेडेशन आणि संवर्धन. कामाची अंदाजे किंमत: 4,65,94,816.74/-. निविदा किंमत फॉर्म: शून्य. जमा करावयाची बयाणा रक्कम रू. 3,83,000/-. काम पूर्ण होण्याचा कालावधी: 12 महिने. निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 10.12.2025 15.30 तासांनंतर. तपशील आयरेप्स वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्रक/दुरुस्ती जर काही असेल तर ते फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केले जातील, फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/ पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करण्याची आणि ते www.ireps.gov वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. ईमेस्ट मनी (EMD) च्या देयकात फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारले जाईल. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या

Akar/Sur-72 — DRM-ST शाखा CR, सोलापूर

तुमच्या प्राण्यांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-25. तारीख: 18.11.2025. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने DRM(ST) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर रॉलवेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-टेंडर आमंत्रित करत आहे:- त्याच्या परिसरासह कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील वाडी जंक्शन आणि सोलापूर स्टेशनवर MSDAC ची ड्युअल डिटेक्शन म्हणून तरतूद. कामाची अंदाजे किंमत: 15,62,85,667.11/-. निविदा फॉर्मची किंमत: शून्य. जमा करायची बयाणा रक्कम: 9,31,400/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 12.12.2025 15.30 तासानंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील, फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि www.ireps.gov वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. पेमेंट ऑफ अर्नेस्ट मनी (EMD) फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारले जाईल. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

Akar/Sur-71 — DRM-ST शाखा CR, सोलापूर

तुमच्या प्राण्यांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा.

**IDFC FIRST Bank Limited**

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 85664836 | मालमत्तेवर कर्ज | १. अमर दादासाहेब यादव<br>२. अनुजा अमर यादव | 30/10/2025 | रुपये 8,82,165.22/- |

**मालमत्तेचा पत्ता** : जीपी मिलकत क्रमांक ७३/१, त्याचा जुना नंबर ७३, परिसर ११७८ चौ. फूट, उपविभाग पंढरपूर, पुलुजवाडी, सोलापूर, महाराष्ट्र, आणि सदर मालमत्तेची सीमा पूर्व: मिलकत क्रमांक ७२, पश्चिम: रस्ता, उत्तर: रस्ता, दक्षिण: मिलकत क्रमांक ८० अशी आहे.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 120044940 | मालमत्तेवर कर्ज | १. श्रीराम पंडीत वाघमारे<br>२. पंडीत सोपान वाघमारे | 24/10/2025 | रुपये 7,91,675.82/- |

**मालमत्तेचा पत्ता** : दगड, विटा आणि कॉंक्रीटने बांधलेल्या निवासी घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, ज्याचे क्षेत्रफळ ९००.०० चौ.फूट आहे, एकूण बांधलेले क्षेत्रफळ ९००० चौ.फूट आहे, गोपाळपूर गावात स्थित आहे, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर आणि ग्रामपंचायत गोपाळपूरच्या रजिस्टरमध्ये मालमत्ता क्रमांक १७८/२ मध्ये नोंदणीकृत आहे, एकूण जमीन क्षेत्रफळ २००० चौ.फूट आहे आणि सीमा अशी आहे: - पूर्व: रस्ता, पश्चिम: आनंदा माने, उत्तर: रस्ता, दक्षिण: वासुदेव कोळी

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 125345746 | मालमत्तेवर कर्ज | १. उमेश बाळू गायकवाड<br>२. नंदाबाई बाळासाहेब गायकवाड | 30/10/2025 | रुपये 7,36,035.80/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत चाळेच्या रजिस्टरमध्ये मालमत्ता क्रमांक ५७० मध्ये नोंदणीकृत घर/मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण जमीन क्षेत्रफळ २००० चौरस फूट आणि दगड, विटा आणि कॉंक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ १२०० चौरस फूट आहे, एकूण बांधलेले क्षेत्रफळ = १२००.०० चौरस फूट, गाव: चाळे, उपविभाग: पंढरपूर, विभाग: सोलापूर, सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४ येथे स्थित आहे आणि पूर्व: किसन माने, पश्चिम: बालाजी वाघमारे, उत्तर: रस्ता, दक्षिण: अतुल बर्डे

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)

दिनांक : १९/११/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र

### जाहिर प्रसिध्दीकरण

पुढील नेमली ता. २२/१२/२०२५
क्रि. अर्ज नं. २७६/२०२१

**बार्शी येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात**

**कल्याण सोमनाथ शिंदे,** वय ४२ वर्षे,
धंदा-शेती, रा. तांदुळवाडी, ता. बार्शी,
जि. सोलापूर — **-- अर्जदार**

**विरुध्द**

**ग्रामपंचायत मौजे तांदुळवाडी, ता. बार्शी — -- सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार हा त्याचे आई बाई सोमनाथ शिंदे हिचेसह मौजे तांदुळवाडी, ता. बार्शी येथील घरी राहत होती. अर्जदाराची आई बाई सोमनाथ शिंदे या दि. २०/१०/२०१८ रोजी अर्जदाराचे मौजे तांदुळवाडी, ता. बार्शी येथील राहते घरी मयत झाली. अर्जदाराचे आईची देखभाल अर्जदार हाच करत होता व सदर बाई सोमनाथ शिंदे मयत झालेवर तिचे मृत्यूची नोंद रितसर सा.वाला तांदुळवाडी, ता. बार्शी ग्रामपंचायतीचे जन्म मृत्यू रजिष्टरला करावी. परंतु अर्जदार व त्याचे कुटूंबातील व्यक्तीचे अडाणीपणामुळे सदर मृत्यूची नोंद सा.वालाचे जन्म मृत्यूचे रजिष्टरला झाली नाही, अर्जदारानेहि आजपावेतो त्याबाबत चौकशी केली नाही परंतु हल्ली अर्जदारास त्याचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता आईचे मृत्यूचे दाखल्याची गरज भासलेने अर्जदाराने सा.वाला ग्रामपंचायतीकडे तशी मृत्यूचे दाखल्याची मागणी केली असता सदर तांदुळवाडी ग्रामपंचायतीने त्यांचेकडील उपलब्ध रजिष्टरचा शोध घेतला परंतु त्यांना बाई सोमनाथ शिंदे यांचे मृत्यूची नोंद केली गेलेचे दिसून आले नाही म्हणून त्यांनी दाखला/पत्र दिले. अशाप्रकारे अर्जदाराची आई बाई सोमनाथ शिंदे ही मौजे तांदुळवाडी, ता. बार्शी येथे राहते घरी ता. २०/१०/२०१८ रोजी मयत होवूनहि त्यांचे मृत्यूचा दाखला मिळत नाही त्यास्तव बाई सोमनाथ शिंदे यांचे मृत्यूची सा.वाला ग्रामपंचायतीचे जन्म मृत्यू रजिष्टरला करणेबाबत त्यांना मे. कोर्टाचे जरुर ते आदेश व्हावेत असे कथन करुन अर्जदारानी हल्लीचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराच्या अर्जातील मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचे कांही आक्षेप असतील तर संबंधीतानी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाले पासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमले तारीखेस मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा मुदतीनंतर में कोर्टाचे पुढील हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण, आमचे सहीनिशी व में कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे ता. १७/११/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बार्शी**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बार्शी**

### जाहिर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं. ११७/२०२५
पुढील नेमलेली दि. २०/१२/२०२५
निशाण नं. ५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ञ ज्यु. डि. सो. यांचे कोर्टात (४ थे कोर्ट)**
**(मा. आर.पी.बागडे सो)**

१) **समाधान बाबु उर्फ बाबुराव यादव,** वय-३७ वर्षे, धंदा- शेती, रा. कारी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **मंगल बाबुराव उर्फ बाबुशा यादव,** वय-५७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर
३) **निर्मला बाळु जगदाळे** वय-३९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर
४) **दैवशाला रमेश सारंग,** वय-४१ वर्षे, धंदा-घरकाम, रा. चौंडेश्वरी कराड, ता. कराड, जि. सातारा
५) **रेश्मा राजेंद्र काशीद,** वय-३४ वर्षे धंदा-घरकाम, रा. सदर
६) **सिमा किसन देशमुख,** वय-३६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. गायकवाड गल्ली मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर
७) **अर्चना समाधान देशमुख,** वय-३२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर

**-- अर्जदार**

**विरुध्द**

कोणीही नाही — **-- सा.वाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. २ यांचे पती व अर्जदार नं. १,३ ते ७ यांचे वडिल बाबु उर्फ बाबुराव ज्योती यादव हे दि. ३०/११/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. तसेच मयत बाबु उर्फ बाबुराव ज्योती यादव यांची आई अनुसया ज्योती यादव हे देखील दि. ०१/०८/२००७ रोजी मयत झालेली आहेत. व वडिल ज्योती मारुती यादव हे पूर्वीच मयत झालेले आहेत. यातील मयत बाबु उर्फ बाबुराव ज्योती यादव यांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस असून त्यांच्या शिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. यातील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता गेले असता त्यांना मयत बाबु उर्फ बाबुराव ज्योती यादव यांचे वारस प्रमाणपत्र आणण्यास सांगितले असता यातील अर्जदार यांनी वारसप्रमाणपत्र मिळण्यासाठी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्या अर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत बाबु उर्फ बाबुराव ज्योती यादव यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. २०/१२/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

हे जाहिर प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहि शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे दि. १२/११/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर बार्शी**

शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर**
**बार्शी**

# रणजी सामन्यात विदर्भाचा विजय निश्चित

## अतित सेठचे ५ • दर्शन नळकांडेचे ४ बळी • यश राठोडचे शतक हुकले

◆ नागपूर, १८ नोव्हेंबर

येथे सुरू असलेल्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत एलिट अ गटात बडोदाविरुद्धच्या सामन्यात तिसऱ्या दिवशी गोलंदाजांचे वर्चस्व राहिले. मंगळवारी दिवसभरात १२ फलंदाज बाद झाले. त्यात बडोद्याच्या अतित सेठने ५ आणि विदर्भाच्या दर्शन नळकांडेने ४ असे सर्वाधिक गडी बाद केले. तिसऱ्या दिवशी खेळ थांबला तेव्हा बडोदा संघाने ५ गडी गमावून ७३ धावा केल्या होत्या. त्यांना विजयासाठी २०३ धावांची गरज असून, सामन्यावर विदर्भचे वर्चस्व आहे. सामन्यात विदर्भ विजयाच्या समीप आहे. यश राठोडचे थोडक्यात शतक हुकले. त्याने ९१ धावा केल्या.

तिसऱ्या दिवशी विदर्भने यश राठोड १५ आणि रविकुमार समर्थ नाबाद ८ यांनी खेळ सुरू केला. काल विदर्भाची ३ बाद १२६ धावसंख्या होती. या दोघांनी शंभर धावांच्या वर भागीदारी केली. विदर्भाची धावसंख्या २३१ असताना रविकुमार समर्थला (४५) राज लिम्बानीने बाद केले. १२ धावांची भर पडताच त्याचा सहकारी यश राठोड ९१ धावांवर बाद झाला. त्याला भार्गव भटने बाद केले. त्यानंतर विदर्भचे खेळाडू ठराविक अंतराने बाद होत गेले. कर्णधार अक्षय वाडकर फार प्रभावी कामगिरी करू शकला नाही. तो १० धावा काढून अतित सेठचा बळी ठरला. ९ धावांची भर पडताच पार्थ रेखडे अतितच्या गोलंदाजीत बाद झाला. पार्थने १२ धावा केल्या. तोपर्यंत विदर्भाच्या ७ बाद २६६ धावा झाल्या होत्या. त्यानंतर याच धावसंख्येवर नचिकेत भुते आणि दर्शन नळकांडे बाद झाले. त्यामुळे विदर्भाचे मोठी धावसंख्या उभारण्याचे स्वप्न भंगले. प्रफुल्ल हिंगे ५ धावा काढून बाद झाला आणि विदर्भाचा डाव २७२ धावांवर संपला. गणेश भोसले शून्य धावांवर नाबाद होता. बडोदाकडून राज लिम्बानी, निनाद राथवा आणि महेश पिटीया यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. अतित सेठने ४७ धावांत ५ आणि भार्गव भटने ६५ धावांत २ गडी बाद केले.

विदर्भाच्या २७६ धावांचे लक्ष्य गाठताना बडोदा संघाची दमछाक झाली. विदर्भाच्या गोलंदाजांनी बडोद्याच्या फलंदाजांना रोखून ठेवले आणि त्यांचा अर्धा संघ ७३ धावांत गुंडाळला. बडोदाचे सलामीवीर ज्योत्सनील सिंग आणि शिवलिक शर्मा यांना दर्शन नळकांडेने आल्यापावली बाद केले. ज्योत्सनीलने १ आणि शिवलिक शर्मा शून्यवर बाद झाला. त्यानंतर आलेला सुकीर्त पांडे खेळपट्टीवर तग धरू शकला. तो ३५ धावांवर नाबाद होता.

शाश्वत रावत शून्य, विष्णू सोळंकी ४ धावांवर बाद झाले. त्यांनाही दर्शन नळकांडेने बाद केले. मितेश पटेलला पार्थ रेखडेने १६ धावांवर बाद केले. विदर्भाच्या गोलंदाजांसमोर बडोद्याच्या फलंदाजांनी शरणागती पत्करल्याचे दिसत होते. खेळ थांबला तेव्हा सुकीर्त पांडे ३५ आणि निनाद राथवा १० धावांवर नाबाद होते. विदर्भकडून दर्शन नळकांडेने ७ धावांत ४ आणि पार्थ रेखडेने १९ धावांत १ गडी बाद केला. उद्याचा सामन्याचा चौथा दिवस असून विदर्भ किती लवकर बडोद्याचे फलंदाज बाद करून सामना जिंकतो याकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागले आहे. (तभा वृत्तसेवा)



शंभर धावांची भागीदारी करून विदर्भाला मजबूत स्थितीत आणणारे यश राठोड आणि रविकुमार समर्थ

# सात्त्विक-चिराग दुसऱ्या फेरीत

### त्रिशा जॉली, गायत्री गोपीचंद पराभूत

### ऑस्ट्रेलियन ओपन सुपर बॅडमिंटन

◆ सिडनी, १८ नोव्हेंबर

ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश करण्यासाठी सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय पुरुष दुहेरीच्या स्टार जोडीने उत्कृष्ट कामगिरी केली. सात्त्विक-चिरागने पहिल्या फेरीत चायनीज तैपेईच्या चांग को-ची आणि पो ली-वेईवर सरळ गेममध्ये विजय मिळवला. जगातील तिसऱ्या क्रमांकाच्या भारतीय जोडीने को-ची आणि पो ली-वेई विरुद्धच्या ४८ मिनिटांच्या पहिल्या फेरीच्या सामन्यात २५-२३, २१-१६ असा विजय मिळवला.

सुरुवातीच्या सामन्यात एका टप्प्यावर सात्त्विक आणि चिरागची अव्वल मानांकित जोडी २-६ अशी पिछाडीवर होती. चुरशीची स्पर्धा झाली, परंतु चिनी तैपेई जोडीने १६-१४ पर्यंत कमी आघाडी कायम ठेवली. भारतीय जोडीने १९-१७ अशी आघाडी मिळवण्यासाठी परत झुंज दिली, परंतु नंतर सामना रोमांचक झाला. त्यानंतर दोन्ही संघांनी गेम पॉइंट्सची देवाणघेवाण केली, परंतु भारतीय जोडीने अखेर त्यांचा तिसरा गेम रूपांतरित केला. दुसऱ्या गेमच्या सुरुवातीला सात्त्विक आणि चिरागने ७-४ अशी आघाडी घेतली, परंतु तैवानच्या जोडीच्या दोन नेट चुका आणि एका शक्तिशाली स्मॅशमुळे त्यांना बरोबरी साधता आली. भारतीय जोडीने मध्यांतराला एका गुणाची आघाडी घेतली. त्यानंतर त्यांनी आपली आघाडी कायम ठेवली आणि सामना जिंकला.

महिला दुहेरीत, तथापि, त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांचा पहिला सामना इंडोनेशियन जोडी एफ. कुसुमा आणि एम. पुष्पितसारी यांच्याकडून १०-२१, १४-२१ असा पराभव झाला. भारतीय एकेरी खेळाडू लक्ष्य सेन, एच. एस. प्रणॉय, किदाम्बी श्रीकांत आणि आयुष शेट्टी बुधवारी त्यांच्या मोहिमेला सुरुवात करतील. (वृत्तसंस्था)

### लिट्ल फ्लावर स्कूलची कादंबरी पाटीलची महाराष्ट्र राज्य फुटबॉल संघात निवड

सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-



धिमपूर (नागालँड) येथे होणाऱ्या डॉ. तेलिमेरन एओ ज्युनिअर मुली राष्ट्रीय फुटबॉल चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी येथील लिट्ल फ्लावर स्कूलची कादंबरी संतोष पाटील हिची निवड झाली. तिचे सोलापूर शहर व जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनचे सेक्रेटरी प्रा.डॉ. किरण चौगुले सर, किरण(पप्पू) दुस्तकर, प्रशालेचे मुख्याध्यापिका सिस्टर सिलीन करावक, क्रीडाशिक्षक प्रसेनजीत सुर्यवंशी यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### सिद्धेश्वर कन्याच्या अंकिता रंगदळाला तलवारबाजी स्पर्धेत दुहेरी मुकुट

सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-



येथील सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या इयत्ता सहावीतील अंकिता रंगदळ हिने राज्य तलवारबाजी स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात प्रशालेतील कास्यपदक प्राप्त केले. तिला क्रीडा शिक्षक गुरुसिद्ध होर्तीकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, भीमाशंकरजी पटणे, गुरुराज माळगे, डॉ राजशेखर येळीकर, ॲड. रेवणसिद्ध पाटील, चनबसप्पा नाडगौडा, प्रभुराज मैंदर्गीकर, विलास कारभारी, पशुपतिनाथ माशाळ, समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापिका संगीता गोटे, पर्यवेक्षिका सुनिता वाले यांनी अभिनंदन केले.

### सोलापूरची आर्या उमाप २३ वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट संघात

सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-



बीसीसीआय अंतर्गत होणाऱ्या टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी २३ वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट संघात येथील आर्या उमापची निवड झाली.२४ नोव्हेंबरपासून विजयवाडा येथे होणाऱ्या स्पर्धेत ती भाग घेईल. तिचे सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप माने, चेअरमन रणजितसिंह मोहिते-पाटील, व्हा. चेअरमन श्रीकांत मोरे, उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, मुकुंद जाधव, नितीन देशमुख व संयुक्त सेक्रेटरी धैर्यशील मोहिते पाटील व चंद्रकांत रेंबर्सु, स्नेहल जाधव, किरण मणियार, सारिका कुलकर्णी, मानसी जाधव यांनी अभिनंदन केले.

### व्हॅलेंटाईन स्कूलची शरण्या मादासची सोलापूर जिल्हा कबड्डी संघात निवड

सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-



पुणे येथे झालेल्या किशोर किशोरी अजिंक्यपद स्पर्धेमध्ये व्हॅलेंटाईन सर्कल स्कूल व श्रीराम स्पोर्ट्स क्लबची शरण्या मादास हिची सोलापूर जिल्हा कबड्डी संघात निवड झाली. तिला क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील व मोनिका जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे, उपाध्यक्ष यमुना दिड्डी सचिव संतोष गड्डम, सहसचिव नागेश शेंडगे, मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा यांनी अभिनंदन केले.

### सोजर 'फार्मसी'च्या पवन सुरवसेला दुहेरी मुकुट

बार्शी, दि. १८ नोव्हेंबर-



डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे अंतर्गत विभागीय क्रीडा स्पर्धेत सोजर कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयातील तृतीय वर्षाचा विद्यार्थी पवन विलास सुरवसे याने १५०० मीटर धावणे व ५००० मीटर धावणे या स्पर्धेत भाग घेऊन या दोन्ही स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी शेळवे पंढरपूर येथे ही स्पर्धा झाली. त्यास क्रीडाशिक्षक प्रा. रणजीत शेळके यांचे मार्गदर्शन लाभले.त्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित करपे, संस्थेचे अध्यक्ष अरुणदादा बारबोले व सचिवा कल्पनाताई बारबोले यांनी अभिनंदन केले.



# मेहता शाळेत क्रीडा सप्ताहास सुरुवात

तभा वृत्तसेवा,

सोलापूर, दि.१८ नोव्हेंबर-

कै. वि. मो. मेहता शाळेत क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. याचे उद्घाटन पोतदार पॅथॉलॉजी लॅबचे संचालक, डॉ. नीलकंठ पोतदार यांच्या हस्ते झाले. सूत्रसंचालन विद्यार्थीनी स्नेहल महाजन यांनी केले. प्रास्ताविक व सत्कार मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांच्या हस्ते झाले. पाहुण्यांचा परिचय स्वामिनी पवार हिने केला. ज्योत व क्रीडा साहित्याचे पूजन करण्यात आले. क्रीडा प्रमुख अमित कोटीकर यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ढोल वाद्यांच्या व टाळ्यांच्या गजरात प्रमुख अतिथींचे स्वागत करण्यात आले. सृष्टी लिंगडे हिने निरनिराळ्या खेळांची उत्कृष्ट माहिती सांगितली. ध्रुव रोटे याने क्रीडा प्रतिज्ञा सर्व विद्यार्थ्यांकडून म्हणवून घेतली. कार्यक्रमाची सांगता सोहम पुजारी याच्या आभार प्रदर्शनाने झाली.

# डॉ. आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या बुद्धिबळ स्पर्धेस सुरुवात



तभा वृत्तसेवा,

सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेर यांच्या विद्यमाने आयोजित इंटर झोनल बुद्धिबळ स्पर्धेस येथील भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात सुरुवात झाली. यात सोलापूर जिल्ह्यातील २५ महाविद्यालयांनी भाग घेतला आहे. याचे उद्घाटन पोलिस अधिक्षक विजयलक्ष्मी कुरी यांच्या हस्ते झाले. यावेळी भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल के देशमाने, सोलापूर विद्यापीठ सिनेट सदस्य सचिन गायकवाड, झोनल स्पोर्ट्स अध्यक्ष सोलापूर प्रो. शिवशरण कोरे, आंतरराष्ट्रीय चेअरमन पंच सुमुख गायकवाड, जिमखाना चेअरमन प्रो. अमित वडवेराव, पंच उदय वगेरे, निवड समिती रोहित पवार आदी उपस्थित होते. विजेत्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी आणि प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल अध्यक्ष इंजीनियरिंग रवींद्र डी गायकवाड, सेक्रेटरी अनामिका रवींद्र गायकवाड, अभिनंदन केले.



## इरा स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सवास सुरुवात

तभा वृत्तसेवा,

जेऊर दि.१८ नोव्हेंबर-

जेऊर येथील इरा पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा सप्ताहास सुरवात झाली. जेऊरचे गावचे क्रीडा संघटक नितीन शेळके व इरा पब्लिक स्कूल चिकलठाणची धनुर्विद्या खेळाडू श्रद्धा उमेश बोराडे, रमेश बोराडे, संस्थेचे सचिव सुनिल अवसरे, श्री. पठाण यांच्या प्रमुख उपस्थितीत मैदानाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# बीडमध्ये राज्य खो-खोचा महासंग्राम रंगणार १८ ते २१ डिसेंबरला : डॉ. चंद्रजित जाधव

### राष्ट्रीय संघ निवडीसाठी खेळाडूंची उत्सुकता शिगेला

मुंबई, १८ नोव्हेंबर-



महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने आणि बीड अमेच्युअर खो-खो असोसिएशनच्या आयोजनाखाली ६१ वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा १८ ते २१ डिसेंबर दरम्यान बीडमध्ये रंगणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस व नवनिर्वाचित महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे सहयोगी उपाध्यक्ष डॉ. चंद्रजित जाधव यांनी दिली.

राज्यातील सर्वोत्तम खेळाडूंचा खो-खो कौशल्यदंगल श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, बीड येथे पार पडणार आहे. बीड येथे होणाऱ्या या महत्त्वाच्या राज्य स्पर्धेतून ५८ व्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा पुरुष व महिला संघ निवडला जाणार आहे. निवडलेला संघ हैद्राबाद, तेलंगणा येथे होणाऱ्या स्पर्धेत सहभागी होणार आहे.

खो-खो महासंघाकडे नोंदणी केलेले खेळाडूच या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. स्पर्धेसाठीचे प्रवेश अर्ज नमुना व गणवेश क्रमांकानुसार यादीचे नमुने १ डिसेंबर २०२५ पासून अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होतील. राज्य संघटनेकडून देण्यात आलेल्या निर्धारित फॉर्ममध्ये माहिती भरून १५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत . या मेलवर पाठवणे बंधनकारक आहे. हाताने लिहिलेल्या प्रवेशिका ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

या स्पर्धेमुळे बीडच्या क्रीडा संस्कृतीला नवा जोश आणि वेग मिळणार असून, राज्यभरातील अव्वल खेळाडूंमध्ये रोमांचक लढती पाहायला मिळणार असल्याचे सरचिटणीस डॉ. जाधव यांनी सांगितले.



# ज.रा. चंडकच्या लिगाडे बंधूची राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड

सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -

बाळे येथील ज.रा. चंडक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या संकेत व रितेश लिगाडे बंधूची शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड झाली. येथील मार्कंडेय तलावावर झालेल्या राज्य स्पर्धेतील कामगिरीवर त्यांची निवड झाली. यशस्वी खेळाडूंचा संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पा ठोकळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थिती मुख्याध्यापक मोहन घोडके, क्रीडा शिक्षक दशरथ गुरव, क्रीडा शिक्षिका शेख आदी उपस्थित होते.

राज्य कामगिरी : १७ वर्षाखालील : संकेत लिगाडे (१ व ३ मीटर स्प्रिंग बोर्ड प्रथम, हायबोर्ड तृतीय). १९ वर्षाखालील : रितेश लिगाडे ( हायबोर्ड द्वितीय, १ मीटर व ३ मीटर स्प्रिंग बोर्ड तृतीय)





# सिंहगड पब्लिक स्कूलचा वार्षिक क्रीडा दिन उत्साहात

तभा वृत्तसेवा,

सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड पब्लिक स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, केगाव, सोलापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षातील वार्षिक क्रीडा दिन उत्साहपूर्ण साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या नृत्य, योगा व ड्रिल सादरीकरणाने कार्यक्रमाला रंगत आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक महादेव राऊत तर अध्यक्ष म्हणून कॅम्पस डायरेक्टर संजय नवले उपस्थित होते. प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या सत्कारानंतर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन झाले.

ध्वजारोहण, राष्ट्रगीत आणि आकर्षक मार्च पास्टनंतर क्रीडा मशाल प्रज्वलन करून स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, योगासन, व्यायाम ड्रिल आणि पिरॅमिड सादरीकरणाला प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. ध्वजारोहण, राष्ट्रगीत आणि आकर्षक मार्च पास्टसह क्रीडा प्रतिज्ञा घेण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या दमदार पावलांनी मैदान दुमदुमून गेले. यानंतर पारंपरिक क्रीडा ज्योतीचे प्रज्वलन करण्यात आले. शिस्तबद्ध संचलनाने उपस्थित प्रेक्षकांना अभिमान वाटावा अशी क्रीडा परंपरा विद्यार्थ्यांनी उभारली.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयाची विविध क्रीडा स्पर्धेत कामगिरी





सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथील खेळाडूंनी विविध ठिकाणी झालेल्या आंतर महाविद्यालयीन विविध क्रीडा स्पर्धामध्ये कामगिरी केली आहे. त्यांना क्रीडा शिक्षक प्रा. संभाजी कोकाटे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थापक अध्यक्ष सुभाष देशमुख, अध्यक्ष रोहन देशमुख, सचिव डॉ. अनिता ढोबळे आणि



प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

कामगिरी : मैदानी : महांगडे (१०० व २०० मीटर धावणे सुवर्ण), पल्लवी भोसले (८०० मीटर धावणे, कांस्य). ४ बाय १०० मीटर रिले मुली तृतीय ( वैष्णवी जाधव, खुणे अंजली, कुर्डे सायली आणि भोसले पल्लवी). कुस्ती : सुरज जवळगे (६५ किलो, रौप्य), प्रतिक शिंदे (राज्य इंद्रधनुष्य स्पर्धेत महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संघाचे शास्त्रीय तबलावादन आणि लोकसंगीत तालवाद्य या प्रकारात प्रतिनिधित्व).

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### नूतन विद्यालयात भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वृक्षारोपन

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -**

आष्टी येथील नूतन विद्यालय येथे श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्ष प्रारंभानिमित्त वृक्षारोपण व स्वच्छता अभियानाने भाऊसाहेबांना अभिवादन करण्यात आले. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांचे सन २०२५ हे जन्म शताब्दी वर्ष. नूतन विद्यालयात दरवर्षी प्रमाणे प्रथम भाऊसाहेब गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन व ज्ञानज्योतीची समई लावून कार्यक्रमाची सुरुवात झाली. नंतर प्रशालेच्या प्रांगणात इयत्ता पाचवी ते दहावी च्या विद्यार्थी व वर्गशिक्षकांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. प्रत्येक वर्गाला एक वृक्ष दत्तक देऊन वृक्ष संवर्धनाची जबाबदारी देण्यात आली. तसेच प्रशालेच्या आवारात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी शेटफळ केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर माने, प्रशालेचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर वृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### सांगोल्यात अध्यक्षपदाचे ७ तर सदस्यपदाचे ७८ अर्ज अपात्र

**अध्यक्षपदाचे २४ तर सदस्यपदांचे २६१ अर्ज वैध**

**सांगोला, दि.१८ नोव्हेंबर -**

सांगोला नगरपरिषदेसाठी अध्यक्षपदासाठी ३१ व सदस्यपदासाठी प्राप्त ३३९ अर्जांची मंगळवार दि.१८ नोव्हेंबर छाननी झाली. त्यामध्ये अध्यक्षपदाचे ३१ पैकी ७ तर सदस्यपदाचे ३३९ पैकी ७८ अर्ज अपात्र ठरले. त्यामुळे अध्यक्षपदासाठी २४ तर सदस्यपदासाठी २६१ अर्ज पात्र झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सैपन नदाफ यांनी दिली. सदस्यपदासाठी प्रभाग क्र.१ अ मध्ये १० अर्जापैकी ७ पात्र तर ३ अपात्र, १ ब मध्ये १३ अर्जापैकी ११ पात्र तर २ अपात्र, प्रभाग क्र.२ अ मध्ये १४ अर्जापैकी ११ पात्र तर ३ अपात्र, २ ब मध्ये २० अर्जापैकी १४ पात्र तर ६ अपात्र, प्रभाग क्र.३ अ मध्ये ११ अर्जापैकी ११ पात्र, ३ ब मध्ये १८ अर्जापैकी १४ पात्र तर ४ अपात्र, प्रभाग क्र.४ अ १२ अर्जापैकी ९ पात्र तर ३ अपात्र, ४ ब मध्ये १६ अर्जापैकी १२ पात्र तर ४ अपात्र, प्रभाग क्र.५ अ मध्ये १५ अर्जापैकी १२ पात्र तर ३ अपात्र, ५ ब मध्ये १२ अर्जापैकी ९ पात्र तर ३ अपात्र, प्रभाग क्र.६ अ मध्ये ११ अर्जापैकी ६ पात्र तर ५ अपात्र, ६ ब मध्ये १४ अर्जापैकी ११ पात्र तर ३ अपात्र, प्रभाग क्र.७ अ मध्ये १८ अर्जापैकी १४ पात्र तर ४ अपात्र, ७ ब मध्ये १३ अर्जापैकी १० पात्र तर ३ अपात्र, प्रभाग क्र.८ अ मध्ये ११ अर्जापैकी ९ पात्र तर २ अपात्र, ८ ब मध्ये १६ अर्जापैकी १२ पात्र तर ४ अपात्र, प्रभाग क्र.९ अ मध्ये १७ अर्जापैकी १३ पात्र तर ४ अपात्र, ९ ब मध्ये १२ अर्जापैकी ११ पात्र तर १ अपात्र, प्रभाग क्र.१० अ मध्ये १९ अर्जापैकी १२ पात्र तर ७ अपात्र, १० ब मध्ये २६ अर्जापैकी २२ पात्र तर ४ अपात्र, प्रभाग क्र.११ अ मध्ये १० अर्जापैकी ७ पात्र तर ३ अपात्र, ११ ब मध्ये ९ अर्जापैकी ७ पात्र तर २ अपात्र, ११ क मध्ये २२ अर्जापैकी १७ पात्र तर ५ अपात्र असे एकूण ११ प्रभागातून दाखल झालेल्या ३३९ अर्जापैकी २६१ अर्ज पात्र झाले असून ७८ अर्ज अपात्र झाल्याची माहिती सहा.निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी दिली.

### अक्कलकोट नगराध्यक्षपदाचे ४ तर नगरसेवकपदाचे ६० अर्ज अवैध

**अक्कलकोट दि १८ नोव्हेबर-**

अक्कलकोटच्या नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केलेले चार जणांचे नामनिर्देशन पत्र अवैध झाले असून नगरसेवकपदासाठी एकूण ६० अर्ज अवैध ठरले आहेत.

येथे नगराध्यक्षपदासाठी एकूण ११ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. तर नगरसेवकपदासाठी १४३ उमेदवारानी अर्ज दाखल केले होते. या दाखल केलेल्या उमेदवारी अर्जांची छाननी अक्कलकोट नगर परिषद कार्यालयात मंगळवारी करण्यात आली. यावेळी नगराध्यक्षपदासाठी अकरा पैकी चार उमेदवारांचे अर्ज हे अवैध ठरले आहेत. तर नगरसेवक पदासाठी दाखल करण्यात १४३ उमेदवारी अर्जापैकी ६० जणांचे अर्ज हे अवैध ठरले आहेत. जोडपत्र एक व दोन सोबत जोडलेले नसल्याने, जोडपत्र दोन मध्ये पर्यायी उमेदवार म्हणून नमूद व पाच सूचक जोडलेले नाही, अर्धवट भरण्यात आलेले आहे शेवटी स्वाक्षरी करण्यात आलेली नाही, बँक खात्याचा तपशील जोडलेला नाही, शौचालयाचा दाखला प्रमाणपत्र जोडलेला नाही, नगरपरिषद ठेकेदार नसल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही , नगरपरिषद थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही, दुबार सुचक तसेच पक्षाच्या वतीने जोडपत्र एक व दोन सादर केलेले नाही असे उमेदवारी अर्ज हे अवैध ठरविण्यात आले आहेत.

**नगराध्यक्षपदासाठी अवैध ठरलेले अर्ज** : सुनील कटारे, एजाज बळोरगी, गौरी कल्याणशेट्टी ,महेश हिंडोळे.

**नगरसेवक पदासाठी अवैध ठरलेले अर्ज** : महानंदा स्वामी, राजेसाहेब शेळके, वर्षा चव्हाण, सिकंदर चाऊस, मानसी जाधव, सोनाली धनशेट्टी, कविता आळवीकर, शितल भांडेकर, सोनाली धनशेट्टी, स्वामीनाथ चौगुले, अंकुश चौगुले, अशोक जाधव, विजय आळवीकर ,कस्तुरा चौगुले , एजाज बळोरगी, रफिक बेपारी, शबाना शेख, कल्लाप्पा मोरे, दत्ता मडीखांबे, सुवर्णा घोडके, सखुबाई घोडके, पल्लवी कटारे, भागुबाई कुंभार, शैलेश राठोड, नवनीत राठोड, रमेश कापसे, मोहसीन मोकाशी, करीम शेख, ऐश्वर्या शिंदे, एजाज अरब, पल्लवी कटारे ,अनिरुद्ध धोंगडे, सुनिता आळगी, नुरद्दीन इस्माईल बागवान, मजहर मुजावर, मुजाहिद बागवान, गीताबाई शिंदे, युगंधरा हरवाळकर, मुमताज बागवान , सुनंदा भकरे, शकुंतला रोडगे, सुनंदा स्वामी, रामचंद्र समाने, श्रीशैल इचगे, राजेंद्र थंब, पुनम गायकवाड, छाया जाधव, वैशाली पाटील, चांदसाब खिस्तके, भाग्यश्री देविदास कवटगी, ज्योती जरीपटके, सोनाली मोरे, रामेश्वर पाटील, सिद्धाराम पाटील, राहुल बकरे, लक्ष्मण जमगे 'रविकांत मंगरूळे, महेश हिंदोळे केदार कवटगी

# अनगरमध्ये राष्ट्रवादीच्या उज्वला थिटे यांचा अर्ज छाननीत अवैध

**अर्जावर नाही सूचकाची सही; आता नगराध्यक्षाची दुरंगी लढत**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.१८ नोव्हेंबर-**

राज्यात गाजत असलेल्या अनगर नगरपंचायतीच्या पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीत राष्ट्रवादी (अप) पक्षाच्या उमेदवार उज्वला थिटे यांच्या उमेदवारी अर्जावर सूचकाची सही नसल्यामुळे तो अर्ज छाननीमध्ये बाद करण्यात आल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक यांनी सांगितले.

अनगर नगरपंचायतीची नगराध्यक्षपदाची लढत तिरंगी नाही तर दुरंगी होणार आहे. उद्या बुधवारी १९ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी नगराध्यक्षपद बिनविरोध होणार की दुरंगी सामना होणार हे स्पष्ट होणार आहे. उज्वला थिटे यांनी काल कमांडो आणि पोलीस संरक्षणात आपला उमेदवारी अर्ज अखेरच्या दिवशी दाखल केला होता. आज अनगर



नगरपंचापतीसाठी दाखल करण्यात आलेल्या सर्व अर्जांची निवडणूक निर्णय अधिकारी तथा मोहोळचे तहसीलदार मुळीक यांनी छाननी केली असता थिटे यांच्या अर्जावर सूचकाची सही नसल्यामुळे तो अर्ज बाद करण्यात आला. त्यामुळे नगराध्यक्षपदासाठीचा सामना दुरंगी होणार की उद्या अर्ज मागे घेतला जाणार हे चित्र स्पष्ट होणार आहे. नगराध्यक्षपदासाठी प्राजक्ता अजिंक्यराणा पाटील व सरस्वती शिंदे यांचे अर्ज वैध ठरले आहेत .अनगर नगरपंचायतीच्या निवडणूकीबाबत १७ प्रभागासाठी १८ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. प्रभाग ५ मध्ये सागर नरहरी गुंड यांनी भाजपाकडून अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला ,तर याच प्रभागामधून जयराम बोडके यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे. उर्वरीत १६ प्रभागा मधून १६ च उमेदवारी अर्ज आल्याने व त्यांची आज छाननी झाल्यानंतर १६ नगरसेवक बिनविरोध झाले आहेत.

मात्र प्रभाग ५ मधील दोन्ही उमेदवारांचे अर्ज छाननीमध्ये वैध झाले आहेत. उद्यापासून अर्ज माघारी घेण्यास सुरुवात होत असून प्रभाग ५ बिनविरोध होणार की निवडणूक लागणार हे मुदत संपल्यानंतर स्पष्ट होणार आहे.



## करकंब परिसरातील २५ स्कूल बसची तपासणी

**सहा बस पोलिस ठाण्यात; सव्वा लाखांचा दंड वसूल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -**

सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या विशेष पथकाने करकंब परिसरातील २५ स्कुल बसची तपासणी करण्यात येऊन कागदपत्रांची पूर्तता नसलेल्या ६ स्कुल बस पोलिस ठाण्यात अटकावून ठेवण्यात आल्या. यावेळी १ लाख २२ हजार रुपयांचा दंड वसुल करण्यात आला.

गेल्या आठवड्यामध्ये करकंब येथे एका स्कुल बसखाली सापडून शाळकरी मुलाचा मृत्यू झाला होता. या घटनेच्या पार्श्वभूमीवर सोलापूर प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांनी बेकायदेशीररीत्या विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या स्कुल बसवर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार सोमवारी करकंब परिसरातील विविध शाळांमध्ये विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या २५ स्कुल बसची तपासणी करण्यात आली. वाहन चालकाची अनुज्ञप्ती, वाहनाचा परवाना, योग्यता प्रमानपत्र, विमा प्रमाणपत्र, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र इत्यादी वैद्य कागदपत्रे नसलेल्या तसेच अवैध शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली. दोषी आढळून आलेल्या वाहनावर सुमारे १ लाख २२ हजार रुपये दंड आकारण्यात आला. दोषी आढळून आलेली ६ वाहने पोलिस स्टेशन करकंब येथे अटकावून ठेवण्यात आली आहेत.

ग्रामीण भागात विविध भागातून शालेय विद्यार्थी वाहतूक होत असते. विद्यार्थी वाहतुकीसाठी शालेय विद्यार्थी वाहतूक नियमावली २०११ नुसार पूर्तता असणे गरजेचे असते, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी नेरपगार यांनी सांगितले. सदर कारवाई मोटार वाहन निरीक्षक विशाल यादव, सहायक मोटार वाहन निरीक्षक बाळासाहेब सलगर, श्रीमती तेजस्विनी वायचळ यांनी पार पाडली.

## अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवूनी जाती

**करकंब येथे २३ वर्षानंतर वर्गमित्रांच्या भेटीगाठी; माजी विद्यार्थी स्नेहमेळावा**



**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.१८ नोव्हेंबर-**

करकंब (ता. पंढरपूर) येथील रामभाऊ जोशी हायस्कूलच्या २००१-०२ मधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी नजरेत मावलेली शालेय दुनिया अनुभवत व जुन्या आठवणींना उजाळा देत स्नेहमेळावा घेतला.

मेळाव्याची सुरूवात दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. यावेळी प्राचार्य हेमंत कदम, करळे, अभंगराव, घुले, पुजारी, शिंदे, मळेगावकर, गायकवाड, गव्हाणे, पी.एस.कुलकर्णी, शिक्षिका शिंदे हे सर्व मार्गदर्शक शिक्षक उपस्थित होते. स्वतःची ओळख सांगताना प्रत्येकाने मनातील भावना व्यक्त केली.

आपला वर्ग, आपली बाकं, आपली धम्माल याविषयी सर्वांनी मनमोकळा संवाद साधला. सर्वांच्या उपस्थितीमुळे प्रेम, मार्गदर्शन आणि शालेय जीवनातील आठवणी पुन्हा जिवंत झाल्या. शिक्षकेतर कर्मचारी कवीटकर, कांबळे, चौगुले, भंडारे हेही उपस्थित होते.

कविता, शाळेतील खोड्या सांगूत सगळ्यांना खळखळून हसवले,तर कोणी गाण्यांच्या ओळींनी त्या दिवसांची धडधड जागी केली. क्षणभर असे वाटले की घड्याळ मागे फिरले आहे.एकत्र बसून,एकत्र हसून, मैत्रीचे धागे पुन्हा घट्ट विणण्याचा संकल्प करत कार्यक्रमाच्या शेवटी आभारप्रदर्शन झाले. शालेय जीवन संपले असेल, पण मनातली मैत्री अजूनही तितकीच जिवंत राहिली.

हा सोहळा मनात कायमचा कोरला गेला.अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती या ओळी आठवत सर्वांनी एकमेकांचा साश्रू नयनांनी निरोप घेतला.

## पंढरपुरात नगराध्यक्षाचे आठ तर सदस्यपदाचे ३२१ अर्ज मंजूर

**निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ नोव्हेंबर-**

पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी ८ तर नगरसेवकपदासाठी ३६६ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. त्याची मंगळवार दि. १८ रोजी छाननी करण्यात आली. या छाननीत नगराध्यक्षपदासाठी ८ तर नगरसेवकपदासाठी ३६६ दाखल उमेदवारी अर्जापैकी ३२१ मंजूर तर ३९ अर्ज नामंजूर करण्यात आले. तसेच ६ अर्जांवर आक्षेप घेण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांनी दिली.

पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीसाठी सोमवारी शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांनी मोठी गर्दी केली होती. नगराध्यक्ष पदासाठी ८ तर नगरसेवक पदासाठी ३६६ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. दाखल झालेल्या या अर्जाची छाननी मंगळवार दि. १८ रोजी नगरपरिषद सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी दि.१९ ते २१ नोव्हेंबर हा कालावधी असेल. दि.२६ नोव्हेंबर रोजी निवडणूक चिन्ह वाटप व अंतीम उमेदवार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

## मोहोळमध्ये नगराध्यक्षाचे सहा तर सदस्यपदाचे ४५ अर्ज अवैध

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ,दि.१८ नोव्हेंबर-**

मोहोळ नगरपरिषद निवडणूक नगराध्यक्ष पदासाठी १८ पैकी ६ अर्ज अवैध तर १२ अर्ज वैध ठरले आहेत . तर २०नगरसेवक पदासाठी १७० पैकी ४५ अर्ज अवैध तर १२५ अर्ज वैध ठरले आहेत. उद्या पासून अर्ज माघारी घेण्यासाठी १९ , २० व २१ असे तीन दिवस आहेत .त्यानंतर खरे चित्र स्पष्ट होणार आहे .

अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी अतिशय घडामोडी घडल्या यात शिवसेना शिंदेचे राज्याचे ओबीसी प्रमुख आणि मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर यांच्या अर्जाला शिवरत्न दीपक गायकवाड यांनी हरकत घेतली होती . त्यामध्ये उमेदवारी अर्ज भरताना त्यांनी गुन्हे दाखल असल्याची माहिती लपवली अशी हरकत घेण्यात आली होती .तथापि ही हर करत फेटाळण्यात आली .आणि श्री बारसकर यांचा अर्ज वैध ठरला .तर दुसऱ्या प्रमुख हरकतीमध्ये शिवसेना उभाठाचे युवा सेना जिल्हाप्रमुख महेश देशमुख यांनी त्यांच्याच पक्षाचे शहर प्रमुख विक्रम पंडितराव देशमुख यांना दिलेला पक्षाचा एबी फॉर्म अवैध असल्याचे सांगत मलाच म्हणजे महेश देशमुख यांनाच पक्षाने एबी फॉर्म दिला आहे असा दावा केला त्यानंतर दोन्ही बाजूंच्या वकिलाने युक्तिवाद केल्यानंतर महेश देशमुख यांची हरकत योग्य आहे योग्य आहे असा निर्णय दिल्याने विक्रम देशमुख यांना दिलेलेमशाल चिन्ह त्यांच्याकडून गेले आणि ते महेश देशमुख यांना मिळाले.

### श्रीशैल बिराजदार यांचे निधन

**अक्कलकोट, दि.१८ नोव्हेंबर-**



हालहळ्ळी (अ) (ता. अक्कलकोट) येथील श्रीशैल भिमशा बिराजदार (वय-६२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, तीन भाऊ, तीन बहिणी, नातवंडे असा परिवार आहे.

बुधवारी (दि.१९ नोव्हेंबर) रोजी सकाळी अकरा वाजता हालहळ्ळी(अ) येथील राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार आहे.एमएसईबीचे निवृत्त अधिकारी विश्वनाथ बिराजदार यांचे ते लहान बंधू होत. पत्रकार रविकांत धनशेट्टी यांचे ते मामा होत.

## मंगळवेढ्यात हरकतीमुळे छाननी प्रक्रिया लांबली; निर्णय प्रलंबित

**अर्जाची छाननी निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाली**

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. १८ नोव्हेंबर-**

आज दि.१८ नोव्हेंबर रोजी सकाळी अकरा वाजल्यापासून छाननी सुरुवात झाली होती, यामध्ये प्रथम नगराध्यक्षपदासाठी अर्ज भरलेल्या उमेदवारांना बोलवून एकत्रितरित्या छाननी करण्यात आली. यावेळी दोन नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांनी एकमेकांविरुद्ध हरकती घेतल्या, या हरकतीची सुनवाणी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दुपारी तीन वाजता ठेवली होती.

दुपारी तीन वाजल्यापासून सायंकाळी सहा वाजेपर्यंत तब्बल ३ तास सुनावणी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासमोर घेण्यात आली. दोन्ही उमेदवारांनी सोलापूर येथील नामांकित वकिलांची फौज उभी केली होती.

निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दोन्ही बाजूने युक्तिवाद ऐकून घेतला, यावर निर्णय अद्याप दिलेला नाही, निर्णय देण्यासाठी विलंब होत असल्यामुळे शहरांमध्ये विविध चर्चेला उधाण आले असुन यावर अंतिम निर्णय निवडणूक निर्णय अधिकारी कधी देणार? निर्णय काय असणार? याकडे संपूर्ण शहरवासीयांचे लक्ष लागून राहिले आहे.

दरम्यान, १० प्रभागातील किती उमेदवारांचे अर्ज अपात्र झाले? किती उमेदवारांवर हरकती आल्या याबाबत ही माहिती मिळू शकली नाही. येथे नगराध्यक्षासाठी १९ तर सदस्यपदासाठी १७९ अर्ज दाखल झाले होते.



## युटोपियन शुगर्स येथे रस्ते सुरक्षा अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १८ नोव्हेंबर-**

कचरेवाडी (ता.मंगळवेढा) येथील युटोपियन शुगर्स लि. येथे प्रादेशिक परिवहन कार्यालय सोलापूर यांचे वायुवेग पथक मंगळवेढा यांच्यावतीने ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना रिफ्लेक्टर लावून रस्ता सुरक्षा अभियान संपन्न झाले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक, मंगळवेढा वायुवेग पथकाचे प्रमुख, मोटार वाहन निरिक्षक गणेश मोहनराव तपकीरे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक, मुख्य शेती अधिकारी धनंजय व्यवहारे, चिफ फायनान्सियल ऑफीसर दिनेश खांडेकर, ई.डी.पी मॅनेजर अभिजीत यादव, केनयार्ड सुपरवायझर श्रीकांत गणपाटील, सुरक्षा अधिकारी सिकंदर सय्यद, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक प्रियांका माने व पूनम चव्हाण उपस्थित होते. यावेळी श्री. परिचारक यांनी हे अभियान अपघात कमी करणे आणि वाहतुकीच्या नियमांविषयी जागरूकतेसाठी दरवर्षी राबवले जाणारे एक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय अभियान असल्याचे सांगितले. या अभियानांतर्गत वाहतूक पोलीस, प्रादेशिक परिवहन आणि कारखाना प्रशासन एकत्र काम करतात असेही त्यांनी सांगितले. मंगळवेढा वायुवेग पथकाचे प्रमुख मोटार वाहन निरिक्षक गणेश मोहनराव तपकीरे यांनी रस्ते अपघाताविषयी प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, सहाय्यक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे व असिफ मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली वायुवेग पथक स्थापन केल्याचे सांगितले. ओव्हरलोड वाहतूक करु नये, ऊसाने भरलेली वाहने पुढे नेण्यासाठी स्पर्धा करु नये. आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवू नये. चालकाकडे योग्य ते लायसन्स असणे गरजेचे आहे. भरलेल्या किंवा रिकाम्या वाहनाला दोनपेक्षा जास्त टेलर जोडू नये. शहरातील मुख्य रस्त्याचा वापर न करता बाह्यवळण रस्त्याचा वापर करावा. रात्रीचे वेळी पाठीमागील बाजुस लाल रंगाचा टेल लँप दिवा लावावा. टेलरला दोन्ही बाजूस

## मंगळवेढ्यातील बालविवाह पोलीसांनी रोखला

**बाल संरक्षण कक्षाची सतर्कता आला कामी**

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.१८ नोव्हेंबर-**

मंगळवेढा शहरात अल्पवयीन वधूचा होणारा बालविवाह सोलापूर बाल संरक्षण कक्ष व पोलीस प्रशासन यांच्या सतर्कते मुळे टळला आहे. दरम्यान व्हॉटसअप, फेसबुकच्या जमान्यातही बालविवाह होत असल्याने सुज्ञ नागरिकामधून चिंता व्यक्त केली जात आहे.

या घटनेची हकीकत अशी, सोलापूर येथील बाल संरक्षण कक्षचे मल्लीनाथ तमशेट्टी यांना मंगळवेढ्यातून एका अज्ञात व्यक्तीने ऑनलाईन तक्रार करुन येथे दि.१५ नोव्हेंबर रोजी १२.४० वाजता बालविवाह होणार असल्याचे कळविले होते. त्यानुसार तेथील अधिकारी मल्लीनाथ तमशेट्टी मंगळवेढा पोलीस स्टेशनला हजर झाले.

पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्याशी बालविवाह होणार असलेबाबत चर्चा केली. पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर,महिला पोलीस हवालदार वंदना अहिरे, सुरेश कांबळे, पोलीस अंमलदार श्रीकांत देवकते, बालविकास विभागाच्या अस्मिता पठाण यांचे पथक रजपूत मंगल कार्यालय येथे दाखल झाले. यावेळी या पथकाला मोहोळ येथील १५ वर्षीय १० महिन्याची वधू व कचरेवाडी येथील २३ वर्षीय वर यांची लगीनघाई सुरु असल्याचे निदर्शनास आले.

या पथकाने वधू व वरास ताब्यात घेवून मंगळवेढा पोलीस स्टेशनमध्ये हजर करुन त्यांचे समुपदेशन करुन वधूस आई-वडिलांच्या ताब्यात देण्यात आले.

सध्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पुर्ण होवून विज्ञानाकडे प्रगती करीत असताना व्हॉटसअप,फेसबुकच्या जमान्यातही मंगळवेढ्यात बालविवाह होत असल्याचे समजताच सुज्ञ नागरिकांमधून याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### 'ऑर्किड'च्या फॅन्सी ड्रेस स्पर्धेत अवतरला 'कांतारा'

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कुलच्या वतीने बालदिनानिमित्त नर्सरी ते दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात सहभागी विद्यार्थ्यांनी 'कांतारा'सह मँगो ट्री, ऑक्सिजन, पाणी, ट्रॅफिक पोलिस आदी वेशभुषा परिधान केले होते. छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांची व्यक्तीरेखा साकारली होती. अक्कनबळग संस्थेच्या अध्यक्षा प्रार्थना बिज्जरगी यांच्या हस्ते, संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा वर्षा विभुते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, स्कुलच्या मार्गदर्शिका मीना पारखे यांच्या प्रमुख उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. प्रार्थना बिज्जरगी, रुपाली घोंगडे, सुलोचना नसके, निर्मला कणगी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. काजल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.



### शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारी माने यांची मनपा उर्दू मुले कॅम्प शाळेला भेट

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांनी महानगरपालिका उर्दू मुले कॅम्प शाळेला भेट देऊन परिसराची पाहणी केली. त्या त्या वर्गावर जावून त्यांनी विद्यार्थ्यांशी संवादही साधला. यावेळी प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक भगवान मुंडे, मनपा उर्दू मुले कॅम्प शाळेच्या मुख्याध्यापिका माहेजबीन मुल्ला, मनपा उर्दू मुली कॅम्प शाळेच्या मुख्याध्यापिका नाजनीन कोरबू, मनपा उर्दू कॅम्प प्रशालेचे मुख्याध्यापक हारून बंदूकवाले, मनपा मराठी कॅम्प प्रशाला १ चे मुख्याध्यापक जगन्नाथ सज्जन, शिक्षण मंडळाचे डाटा एन्ट्री ऑपरेटरचे अमोल गायकवाड आदी उपस्थित होते.



### साबळे आणि वाघिरे कंपनीच्यावतीने रक्तदान शिबिर

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

साबळे आणि वाघिरे कंपनीच्या वतीने जनरल मॅनेजर बाळासाहेब जगदाळे यांच्या वाढदिवासनिमित्त झालेल्या रक्त दान शिबिरामध्ये एकूण ५१ रक्त दात्यानी रक्तदान केले.साबळे आणि वाघिरे कंपनीच्या वतीने दर वर्षी रक्तदान शिबिर घेतले जाते. या वर्षी दिवाळी दरम्यान सोलापूर शहरात रक्ताचा तुटवडा जाणवत होता. याची दाखल घेऊन मोठ्या प्रमाणावर शिबिर घेण्यात आले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी साबळे आणि वाघिरे कंपनीमधील अंकुश राठोड आणि मदन आपटे यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमासाठी डॉक्टर हेडगेवार ब्लड बँकेचे सहकारी लाभले.



### वालचंद महाविद्यालयात स्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयातस्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती मोठया उत्साहात साजरीकरण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ.संतोष कोटी यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली. बिरसा मुंडा हे एक आदिवासीस्वातंत्र्यसैनिक, युवकांचे प्रेरणास्थान होते. बिरसा मुंडा यांनीयुवकांना लढण्याची संघटित होण्याची आणि सामाजिक न्यायासाठी उभे राहण्याचीप्रेरणा दिली. त्यांच्या विचारांची आजच्या पिढीला नितांत गरज आहे असे प्रतिपादन प्रमुख वक्ते प्रा.डॉ.चंद्रकांत चव्हाण यांनी केले.'आदिवासी संस्कृती आणि बिरसा मुंडा यांचे योगदान या विषयावर त्यांनी बिरसा मुंडा यांच्या उलगुलान आंदोलनाची माहिती देत. जमीन हक्क, वनसंरक्षण आणि सामाजिक समानतेसाठी केलेल्या संघर्षावर प्रकाश टाकला.अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी केले.या कार्यक्रमप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री अनुपम्हेत्रे, डॉ.जीवराज कस्तुरे, प्रा.डॉ. निशा वाघमारे, प्रा.डॉ. विजया महाजन, हनुमंत मते, डॉ.गोविंद तोडकरी, प्रा.डॉ. संदिप जगदाळे, प्रा.डॉ.अभय जाधव, प्रा.डॉ.जितेंद्र गांधी तसेच ग्रंथालयातील कर्मचारी वविद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.नागनाथ धायगोडे तर सूत्रसंचालन डॉ. पद्मावती पाटील यांनी तर आभार डॉ.अमोल शिंदे यांनी मानले.

# सार्वजनिक नळांचे झोननिहाय सर्वेक्षण करून तातडीने अहवाल सादर करा

- मलनिस्सारण केंद्रात येणारे पाणी बायपास नसल्याची घ्यावी
- पालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे पाहणीदरम्यान आदेश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

ट्रंक लाईनच्या चेंबरची उंची वाढवण्याबाबत तात्काळ आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच मलनिस्सारण केंद्रात येणारे पाणी बायपास होणार नाही, याची काटेकोर दक्षता घ्यावी.

सार्वजनिक नळांचे झोननिहाय सर्वेक्षण करून सविस्तर अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत. महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज सोरेगाव परिसरातील महत्त्वाच्या मलनिस्सारण आणि पाणीपुरवठा संबंधित प्रकल्पांची सविस्तर पाहणी केली. या पाहणीत नियोजित सांडपाण्याचे पंप हाऊस, प्रतापनगर मलनिस्सारण केंद्र आणि प्रतापनगर तलाव परिसराचा समावेश होता. या वर्षी प्रतापनगर तलाव प्रथमच अतिवृष्टीमुळे पूर्ण क्षमतेने भरला असून तलावातील वाढलेल्या पाण्यामुळे मलनिस्सारण केंद्राकडे जाणाऱ्या मुख्य पाईपलाईनचे चेंबर संपूर्णपणे जलमग्न झाले आहे. यामुळे केंद्रात येणाऱ्या पाण्याचे प्रमाण अत्यंत वाढले असून प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण होत आहेत.पाहणी दरम्यान आयुक्तांनी भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ट्रंक लाईनच्या चेंबरची उंची वाढवण्याबाबत तात्काळ आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच मलनिस्सारण केंद्रात येणारे पाणी बायपास होणार नाही, याची काटेकोर दक्षता घेण्याचेही आदेश दिले.

याशिवाय, निर्मिती मंगल कार्यालयाजवळील नाला आणि मंगल कार्यालय समोरील तार-कंपाउंडसह अतिक्रमण तातडीने हटविण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच झोन क्रमांक ५ मधील कल्याण नगर भाग-३ येथील सार्वजनिक नळांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. सार्वजनिक नळांचे झोननिहाय सर्वेक्षण करून सविस्तर अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश आयुक्तांनी संबंधित विभागाला दिले.

या पाहणीदरम्यान सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चोबे, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, सहअभियंता रामचंद्र पेंटर, विभागीय अधिकारी तळीखेडे, राहुल शिंदे, लक्ष्मी इंजिनिअरिंगचे प्रतिनिधी अनिकेत जोशी, वेपकॉस कन्सल्टंटचे अनिल जाधव, शेफाली दिलपाक आदी उपस्थिती होते. महानगरपालिका प्रशासनाद्वारे शहरातील मलनिस्सारण व्यवस्था मजबूत आणि कार्यक्षम करण्यासाठी आवश्यक सर्व उपाययोजना वेगाने राबविण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी यावेळी सांगितले.



## कार्तिक त्रयोदशी, ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळ्यानिमित्त दीपोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

कार्तिक त्रयोदशीच्या मुहुर्तावर तसेच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी सोहळ्यानिमित्त भद्रावती पेठ येथील यलम्मा देवी मंदिरासमोर भव्य दिपोत्सव, भजन संगीत तसेच विष्णू सहस्त्रनाम स्तोत्रम्, ललिता सहस्त्रनाम स्तोत्रमासह महाराष्ट्रातील लोकप्रिय हास्य कलाकार व सोलापूरचे सुपुत्र अंबादास कनकट्टी यांचा हास्य विनोदाचा कार्यक्रम जनदर्पणच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला भाविकांची अलोट गर्दी होती.

प्रारंभी डॉ.सूर्यप्रकाश कोठे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रूग्णालयाचे व्हाईस चेअरमन रमेश विडप, पंडित वेणुगोपाल जिल्ला पंतुलू, पद्मशाली पद्मावती देवी ब्रम्होत्सव समितीचे अध्यक्ष अंबादास बिंगी, भाजपाचे ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, श्री मार्कंडेय रुग्णालयाचे संचालक लक्ष्मीनारायण कुचन, देविदास यंगलदास, नागराज रासकोंडा, श्रीनिवास जिल्ला, वज्रेश्वरी गाजूल, अविनाश महाराज आदींची उपस्थिती होती. बाळू मदनाल व त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध भक्तीगीते सादर केली. महाप्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमास एसव्हीसीएसचे शाळेचे प्रमुख तथा होटगी मठ संस्थानचे सचिव स्वामी, पोलिस उपनिरीक्षक ताटे, गोपीकृष्ण वड्डेपल्ली, आनंद बिर्रु, प्रा.नरेंद्र गुंडेली, दत्तात्रय आडम, किरण पामू, नागनाथ सोमा, शेखर इगे यांची उपस्थिती होती.



### ६४ वी महाराष्ट्र राज्य हौसी मराठी नाट्य स्पर्धा

**सोलापूर :** हुतात्मा स्मृती मंदिरात मंगळवारी सायंकाळी सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्यालय संचनालय महाराष्ट्र राज्य मुंबई आयोजित ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत राजश्री विश्वकल्याण मल्टीपर्पज सोसायटी जुळे सोलापूर आयोजित दोन अंकी ''राहिले दुर घर माझे'' नाटक सादरीकरण केले.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात 'रेलवन ॲप'ची जनजागृती मोहीम




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

सोलापूर शहरातील रेल्वे स्थानकात तिकीट घर येथे मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात ''रेलवन'' या अँप च्या संदर्भात मुख्य स्थानकांवर पोस्टर आणि प्रात्यक्षिके दाखवून प्रवाश्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. रेल्वे प्रशासनाने रेलवन हे अँप काही महिन्यांपूर्वी डेव्हलप करून रेल्वेच्या सेवा पूर्ततेसाठी वापरात आणण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

त्याचाच एक भाग म्हणून सोलापूर रेल्वे विभागातील सोलापूर, पंढरपूर, कलबुरगि, लातूर, कुर्डुवाडी या मुख्य स्थानकांवर या अँप च्या संदर्भात माहिती सांगण्यात येत आहे. तिकीट बुकिंग आणि आरक्षण या दोन्ही काउंटरवर या संदर्भात विस्तृत माहिती प्रकाशित करण्यात आली आहे. या अँप मधून आरक्षित तिकीट बुकिंग, आर-वॉलेट वापरून ३% सवलतीसह अनारक्षित यूटीएस तिकिटे, लाईव्ह ट्रेन ट्रॅकिंग आणि रिअल-टाइम चौकशी, ई-केटरिंगद्वारे फुड ऑर्डर, तक्रार निवारण प्रणाली, प्लॅटफॉर्म तिकिटे, तिकीट रद्द करणे, पीएनआर सेवा आदी सेवांचा फायदा रेल्वे प्रवासी घेऊ शकतात. सोलापूर विभागातून रेल्वेचा प्रवास करणारे आणि इतर सर्व रेल्वे उपभोक्त्यांनी रेल्वेच्या सेवांचा उपभोग घेण्यासाठी रेलवन सारख्या अँप डाउनलोड करून एकाच छताखाली असलेल्या सर्व प्रवासी सेवांचा पुरेपूर वापर करावा असे आवाहन सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य प्रबंधक श्री योगेश पाटील यांनी केले आहे. प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअरवरून रेलवन डाउनलोड करू शकता. शिवाय विद्यमान रेलकनेक्ट/यूटीएस क्रेडेन्शियल्स वापरून लॉगिन करा किंवा नवीन वापरकर्ता म्हणून नोंदणी करा. रेलवन या अँप ची सोलापूर रेल्वे विभागाच्या डीआरएम सोलापूर या अधिकृत ट्विटर, फेसबुक, इंस्टाग्राम, थ्रेड आणि यु ट्यूब या सोशल मीडिया हँडल वरून संपूर्ण माहिती देण्यात येत आहे.



## 'दक्षिण'मधील राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपाच्या कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री.महादेव बिराजदार रा. शिरवळ याचा सह तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपा कार्यकर्त्यांचा खासदार प्रणितीताई शिंदे, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा.सातलिंग शटगार, दक्षिण सोलापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष भीमाशंकर जमादार यांच्या उपस्थितीत जनवात्सल्य निवास सोलापूर येथे काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यामध्ये प्रवेशकर्ते- महादेव बिराजदार यांच्यासह चिदानंद शावळ, महादेव पुजारी, चंद्राम जनगोंडे, अजय बिराजदार, राहुल हिप्परगी, रविकांत बिराजदार, रविकांत डम्मे, सचिन करके, यल्लाप्पा हिप्परगे, नागेश तुळजापुरे, शाहीर निक्केवार आदींनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला खासदार प्रणितीताई शिंदे यांनी त्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत केले.

यावेळी महादेव बिराजदार म्हणाले आम्ही सर्व कार्यकर्ते आज देशाचे नेते राहुलजी गांधी, माजी केंद्रीय गृहमंत्री मा. सुशीलकुमार शिंदे साहेब, प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब, खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचे काम प्रामाणिकपणे करून काँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी काम करु असे म्हणाले.

यावेळी दक्षिण सोलापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष भीमाशंकर जमादार, जिल्हा उपाध्यक्ष मोतीराम चव्हाण, तालुका सेवादल यंग ब्रिगेडचे अध्यक्ष मौलवी शेख,अकबर शेख, लखन चव्हाण, शिवानंद बहेरमठ, जीवनकुमार वाघमारे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# हमीभावने सोयाबीनची खरेदी प्रकिया सुरु

- जिल्हा पणन अधिकारी मनोजकुमार वाजपेयी
- तांत्रिक बिघाडामुळे खरेदी प्रक्रियेस होतोय विलंब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन मंडळ आणि राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने एनसीसीएफद्वारे सोयाबीन आणि उडीद या पिकांच्या हमीभाव खरेदीला शासकीय मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार सोलापूर जिल्ह्यात कुर्डुवाडी, अक्कलकोट, बार्शी, करमाळा, मंगळवेढा, पंढरपूर, अकलूज आणि सोलापूर येथे हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. उत्तर आणि दक्षिण सोलापूर तालुक्यासाठी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुळ गोदामात हमीभाव खरेदी योजना २०२५-२६ या वर्षासाठी शेतकऱ्याची नोंदणी प्रक्रिया पार पाडण्यात येत आहे. दरम्यान, सोयाबीनचा हमीभाव रु. प्रति क्विंटल ५३२८ तर उडीद हमीभाव रु. प्रति क्विंटल ७,८०० रुपये असा शासनाने ठरवला आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना प्रथम ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये अद्यावत ७/१२ पिकाच्या नोंदणीसह व त्यावर असलेले पीक क्षेत्रफळ, आधार कार्ड व आधार कार्ड लिंक असलेले बँक खाते, नोंदणीकरिता मोबाईल व स्वतः शेतकरी यांनी बायोमेट्रिककरिता हजर रहावे लागणार आहे. शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार फक्त F..Q. दर्जाचे सोयाबीन खरेदी करण्यात येत आहे.

| उडीद केंद्र | नोंदणीकृत शेतकरी संख्या |
|---|---|
| कुर्डूवाडी | ३५ |
| अक्कलकोट | ७६ |
| बार्शी | ० |
| करमाळा | ७९ |
| मंगळवेढा | ३४ |
| पंढरपूर | ० |
| अकलूज | ० |
| एकूण | २२४ |


**हमीभाव खरेदी प्रक्रिया सुरू**

हमीभावाने सोयाबीनची खरेदी सुरू झालेली आहे. बार्शी तालुक्यात सर्वाधिक ५१२ शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. त्याची किंमत ८५,२४८ इतकी झालेली आहे. तांत्रिक बिघाडामुळे खरेदी प्रक्रिया उशिराने होत आहे. काही दिवसात ही प्रक्रिया सुरळीतपणे सुरू होईल.

**- मनोजकुमार वाजपेयी,**
जिल्हा पणन अधिकारी सोलापूर

| सोयाबीन केंद्र | नोंदणीकृत शेतकरी संख्या |
|---|---|
| कुर्डूवाडी | ४ |
| अक्कलकोट | १५३ |
| बार्शी | ५१२ |
| करमाळा | १ |
| मंगळवेढा | १ |
| पंढरपूर | ० |
| अकलूज | ० |
| एकूण | ६७१ |





## पीएनजीतर्फे प्रथा संग्रह सादर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

पीएनजी ज्वेलर्सने आपला खास असा विवाह संग्रह 'प्रथा' सादर केला आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि गोवा येथे या संग्रहाचा ग्राहकांना अनेक सवलतींसह लाभ घेता येणार आहे. हा संग्रह नव्या युगातील वधूसाठी परंपरेचा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम आहे.

'प्रथा' म्हणजेच 'परंपरा'. हा संग्रह भारतीय स्त्रीच्या सौंदर्य, भावना आणि कलात्मकतेचे प्रतिनिधित्व करतो. तसेच ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत. सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ३०% पर्यंत सूट आणि हिरे दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ७५% पर्यंत सूट. यासोबतच जुन्या सोन्याच्या एक्सचेंजवर ०% कपात, ज्यामुळे प्रेम आणि परंपरेचं प्रतीक असणारे दागिने खरेदी करण्याची ही उत्तम संधी ठरते.यावेळी डॉ.सौरभ गाडगीळ म्हणाले, प्रथा वेडिंग कलेक्शन म्हणजे वारशाची आणि भावनेची शाश्वत नाळ आहे.या मोहिमेद्वारे आम्ही केवळ दागिने नव्हे, तर प्रत्येक विवाहामागील भावना, बांधिलकी आणि एकतेचा सुंदर उत्सव साजरा करतो.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## वडिलांच्या खून प्रकरणी मुलास आजन्म कारावास



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील कोथळा येथील सागर अच्युत शिंदे (वय २१) याने बहिणींच्या लग्नासाठी वडिलांनी जमीन विकल्याच्या रागातून वडिलांचा निर्घृण खून केल्याप्रकरणी कळंब अतिरिक्त सत्र न्यायालयाने त्याला आजन्म कारावास व ५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.

दि.२८ मार्च २०२२ रोजी आरोपीने वडील अच्युत शिंदे यांना कुऱ्हाड, दगड आणि लोखंडी रॉडने मारहाण करून ठार केले होते.

प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक वैभव नेटके यांनी केला.

सरकार पक्षाने मांडलेल्या पुराव्यांवर आधारित न्यायाधीश आर. के. राजेभोसले यांनी दि. १८ नोव्हेंबर रोजी शिक्षा घोषित केली.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### काटगाव येथे लहुजी वस्ताद साळवे जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

**नळदुर्ग, दि.१८ नोव्हेंबर -**

काटगाव (ता. तुळजापुर) येथे क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण १०३ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजसेवेचा उत्तम आदर्श घालून दिला. लहुजी वस्ताद साळवे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे नियोजनबद्ध आयोजन कचरू सगट यांनी अत्यंत उत्कृष्टरीत्या केले. जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले असून गावकऱ्यांकडून त्याचे कौतुक करण्यात येत आहे. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. शिबिरात तब्बल १०३ रक्तदात्यांनी सहभाग घेतला.



### गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदेवे यांचा जिल्हाधिकाऱ्यांकडून सन्मान

**तुळजापूर, दि.१८ नोव्हेंबर -**

हरित धाराशिव अभियान २०२५ अंतर्गत मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणात सक्रिय सहभाग घेऊन पर्यावरण संवर्धनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याबद्दल तुळजापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदेवे यांचा जिल्हाधिकारी किर्तीकिरण पुजार यांनी विशेष सन्मान केला. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष व रोहयो विभागाचे उपजिल्हाधिकारी प्रवीण धरमकर उपस्थित होते. हरित धाराशिव अभियानांतर्गत १९ जुलै २०२५ रोजी धाराशिव जिल्ह्यातील २९३ ठिकाणी एकाच दिवशी १५ लाखांहून अधिक रोपे लावण्यात आली. या उपक्रमात १ लाखांहून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवला होता. या भव्य वृक्षारोपणामुळे धाराशिव जिल्ह्याने वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड आणि आशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये मानाचा दर्जा मिळवला. जिल्हा प्रशासनाच्या वतीने या ऐतिहासिक प्रयत्नांचे कौतुक म्हणून गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदेवे यांना प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

### हायस्कूल लोहारा प्रशालेत शासकीय रेखा कला परीक्षा संपन्न

**लोहारा, दि.१८ नोव्हेंबर -**

हायस्कूल लोहारा या प्रशालेत लोहारा तालुक्यातील विविध प्रशालेतील विद्यार्थ्यांनी एलिमेंट्री आणि इंटरमिजिएट या परीक्षा दिल्या. एलिमेंट्री परीक्षेत विविध शाळेतील २४५ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. तर इंटरमिजिएट साठी २२२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होताफ विद्यार्थ्यांना तणाव मुक्तीसाठी रंग आणि रेखाटन यातून एकाग्रता साध्य होते. यासाठी या परीक्षेचे नियोजन कला संचनालय मुंबई यांच्या वतीने करण्यात येते. शालांत परीक्षेत या चित्रकला परीक्षेच्या ग्रेडनुसार गुणांची भर पडत असते. यावर्षी अति पावसामुळे या परीक्षा सप्टेंबर रोजी नोव्हेंबर महिन्यात शासनाच्या वतीने घेण्यात आल्या यावेळी सर्वच विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद परीक्षा केंद्रावर दिसून आला. रेखाटन आणि रंग भरणे यामध्ये विद्यार्थ्यांची तल्लीनता दिसून आली. या परीक्षेसाठी विविध शाळेतील शिक्षक आणि केंद्रप्रमुख पोतदार डी.एम. यांनी काम पाहिले.



### मंगरुळ येथील दहा भाविक उमराह यात्रेसाठी रवाना

**मंगरूळ, दि.१८ नोव्हेंबर -**

इस्लाम धर्मात कलमा, नमाज, रोजा, जकात आणि हज ही पाच आद्य कर्तव्य मानली जातात. ईश्वर एकच असून मोहम्मद पैगंबर हे त्यांचे प्रेषित आहेत, अशी घोषणाच करणाऱ्या कलमापासून ते आयुष्यात किमान एकदा करावयाच्या हज यात्रेपर्यंत प्रत्येक कर्तव्याचे इस्लाम धर्मात विशेष महत्त्व आहे. याच पवित्र परंपरेनुसार तुळजापूर तालुक्यातील मौजे मंगरुळ येथील दहा भाविक उमराह यात्रेसाठी रविवार, १६ सप्टेंबर रोजी रवाना झाले. हे सर्व भाविक सुमारे वीस दिवस मक्का-मदिना येथील धार्मिक स्थळांमध्ये मुक्काम करून प्रार्थना व इबादत करणार आहेत. या यात्रेकरूंमध्ये सुलेमान मुर्षद फकीर, मोहम्मद तांबोळी, गुलाब मकानदार, सलीम मकानदार यांच्यासह पाच महिला आणि पंधरा वर्षीय एका बालिकेचा समावेश असून गावातून त्यांना उत्स्फूर्त शुभेच्छा देण्यात आल्या. यात्रेसाठी निघालेल्या या भाविकांचा सोलापूर रेल्वे स्थानकावर मुस्लीम युवकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# नेत्यांची प्रतिष्ठा पणाला : जिल्हाध्यक्षांचा ताण वाढला!

## ▶▶ आकांक्षित धाराशिव जिल्ह्यात राजकीय धुमशान पर्वास प्रारंभ : स्थानिक समीकरणे बदलली...

**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.१८ नोव्हेंबर -**



नगरपालिका आणि नगर पंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय समीकरणे जलदगतीने बदलू लागली आहेत.

पक्ष अंतर्गत व बाह्य समीकरणे झपाट्याने बदलत असून प्रत्येक शहरात ताणतणाव, हालचाली आणि नवे समीकरण दिसू लागले असून वाढत्या राजकीय हालचालींमुळे प्रमुख नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली असल्याने जिल्हाध्यक्षांचा ताण चांगलाच वाढल्याचे दिसत आहे. प्रत्येक पक्षात अंतर्गत स्पर्धा, उमेदवारीसाठी दावे प्रतिदावे आणि गटबाजीतील हालचाली यामुळे जिल्हाध्यक्षांवर समन्वय साधण्याचा मोठा ताण आला असुन काही प्रमुख नेत्यांमध्ये वाढत चाललेला नाराजीचा सूर, कार्यकर्त्यांमधील असंतोष आणि निवडणुकीतील समीकरणे राखण्याची जबाबदारी यांचा सर्वाधिक परिणाम जिल्हाध्यक्षांच्या भूमिकेवर होत आहे.

स्थानिक राजकीय भूमिका पाहता राज्यस्तरीय महायुती किंवा महाविकास आघाडीचे संयुक्तीक चित्र इथे पहायला मिळाले नाही. गेल्या काही दिवसांत जिल्हा पातळीवर सुरू असलेल्या बैठका, जिल्हाध्यक्ष व वरिष्ठ नेत्यांच्या आदेशानुसार पक्षाला एकत्र ठेवण्याचे प्रयत्न होताना दिसत आहेत. मात्र, स्थानिक नेतृत्वातील मतभेद आणि उमेदवारीवरून निर्माण झालेले तणाव अद्याप शमलेलला नाही.

नगरसेवकांसाठीचे तिकीट वाटप, पक्षाची रणनीती आणि स्थानिक परिस्थितीचा विचार करून घेतल्या जाणाऱ्या निर्णयांवर जिल्ह्याचे राजकीय वातावरण मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे. दरम्यान, जनतेतही या घडामोडींबाबत उत्सुकता वाढली असून पुढील काही दिवसांत धाराशिवमधील राजकीय तणाव आणखी चुरशीचा होण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. धाराशिव जिल्हा सध्या निवडणुकीच्या खऱ्या अर्थाने 'पूर्व संग्रामात प्रवेश करत आहे. नेत्यांची प्रतिष्ठा, जिल्हाध्यक्षांचा वाढता ताण, बदलणारी समीकरणे आणि मतदारांचा बदलता मूड यामुळे संपूर्ण जिल्हा नवीन राजकीय टप्प्यात प्रवेश करत आहे. जिल्ह्यातील सर्व शहरांची बकाल अवस्था, शहरी मतदारसंघातील दयनीय स्थिती,खूप वर्षानंतर निवडणूक होत असल्यामुळे यंदा तरुण मतदार सक्रिय झाले आहेत,रोजगार,पाणी,रस्ते आणि पायाभूत सुविधा हे प्रमुख मुद्दे असणार आहेत. या सर्व घडामोडींचा विचार करता, धाराशिव जिल्ह्यातील नगरपालिका आणि नगर पंचायत निवडणूक अत्यंत चुरशीची अनपेक्षित वळणांनी भरलेली असून पायाभूत मुद्द्यांवर आधारित अशी होण्याची शक्यता आहे. आपला प्रभाग सुरक्षित करण्यासाठी दिवसरात्र एक करून मतदारराजाला आणि पक्ष नेतृत्वाला आपणच सक्षम उमेदवार असल्याचे गणितं मांडताना दिसून येत आहेत. १८ नोव्हेंबरच्या छाननीनंतर जिल्ह्यातील राजकीय चित्र स्पष्ट होईल तसेच २१ नोव्हेंबर रोजी कोणत्या प्रभागात कोणत्या उमेदवाराची कोणासोबत थेट लढत होणार आहे हे अंतिम चित्र जनतेसमोर येणार आहे.

महायुतीसह महाविकास आघाडीची घडी विस्कटल्याचे चित्र पहावयास मिळत असून महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये युतीबाबत संभ्रम कायम आहे. कोण कोणाच्या विरोधात आणि कोण कोणाला सोबत घेऊन लढणार हे चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही.प्रत्येक नगरपालिका क्षेत्रातील राजकीय बलाबल पाहता स्थानिक मतभेद आणि स्वप्राबल्य राखण्यासाठीच धाराशिव जिल्हा सध्या राजकीय संक्रमणाच्या निर्णायक टप्प्यावर असून प्रमुख नेत्यांवरील ताण, कार्यकर्त्यांची धावपळ, मतदारांचा बदलता मूड आणि बदलत्या समीकरणांमुळे प्रत्येक पक्षासाठी ही निवडणूक 'प्रतिष्ठेची लढाई' ठरणार आहे हे मात्र निश्चित.

## भाजपतर्फे रामचंद्र रोचकरी यांचा प्रभाग ११ मधून उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ नोव्हेंबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी मातेच्या तुळजाई नगरीत नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आखाडा सज्ज झाला असून भाजपतर्फे रामचंद्र सुखदेव रोचकरी यांनी नगरसेवक पदासाठी प्रभाग ११ मधून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. याप्रसंगी बंधू निलेश रोचकरी सोबत होते.

तुळजापूर नगराध्यक्ष पदासाठी १६ उमेदवारांनी एकूण २४ उमेदवारी अर्ज दाखल केले असून यामध्ये विनोद गंगणे (भाजप), अमर मगर (काँग्रेस), अमोल कुतवळ (काँग्रेस), देवानंद रोचकरी (शिवसेना), कृष्णा रोचकरी (समाजवादी पक्ष), उत्तम अमृतराव (शेतकरी कामगार पक्ष), दत्तात्रय कदम (रिपाई आ.) सचिन रोचकरी, सज्जन सांळुके, महंत तुकोजी बुवा, महंत इच्छागीरी, किरण कुलकर्णी, अविनाश पवार, बालाराम कोमटी, संदिप सिरसट आदिंनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

भाजपतर्फे प्रभाग ११ मधून माजी नगरसेविका अश्विनी विशाल रोचकरी यांच्यासह प्रथमच प्रिया मनोज गवळी आणि रामचंद्र सुखदेव रोचकरी नगरसेवक पदासाठी आपले नशीब अजमावणार आहेत.रामचंद्र रोचकरी यांनी मागील अनेक वर्षापासुन जनसेवा करत स्वअस्तित्व निर्माण केले असून केलेल्या कामाच्या बळावर या सार्वत्रिक निवडणुकीला सामोरे जाणार आहेत.

## मुरुम न.प. निवडणुकीत ७ अध्यक्षपद व ७० नगरसेवक उमेदवारी अर्ज वैध

### भाजपचे बापूराव पाटील रिंगणात, जुन्या गटाचे अर्ज बाद

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१८ नोव्हेंबर -**




मुरूम नगर परिषद निवडणुकीसाठी मंगळवारी (दि.१८) पालिका सभागृहात उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया पार पडली. छाननीत अध्यक्षपदासाठी ७ अर्ज तर नगरसेवक पदासाठी एकूण ७० अर्ज वैध ठरले.

विशेषतः भाजपमध्ये मोठी खळबळ माजवणारी घटना म्हणजे-भाजप जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील यांनी स्वतः नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी दाखल केली असून त्यांचा अर्ज वैध ठरला आहे, तर भाजपच्या जुन्या गटातील श्रीकांत मिनियार व त्यांच्या गटातील सर्व नगरसेवक पदाचे अर्ज एबी फॉर्म नसल्यामुळे बाद झाले आहेत.

अध्यक्षपदासाठी वैध उमेदवार बापुराव पाटील (भाजप), चंद्रशेखर मुदकना (शिंदे गट - शिवसेना), रफिक पटेल (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट), प्रशांत पाटील (अपक्ष), सिद्धलिंग हिरेमठ (अपक्ष), लखन भोंडवे (अपक्ष), अजित चौधरी (उ. बा. ठा.) (अपक्ष). मुरूम नगर परिषदेत नगराध्यक्षपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी असल्याने या पदावर चुरस वाढली आहे.

अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर असून चिन्ह वाटप : बुधवार, दि.२६ होणार आहेत.

नगरपालिका निवडणुकीत महायुती व महाविकास आघाडीचे अंतिम चित्र अद्याप स्पष्ट झाले नसल्याने राजकीय उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

## खेड (लोहारा) येथील शेतकरी काकासाहेब पाटील यांचा तुरी पिकातील अभिनव प्रयोग; एकरी १० ते १२ क्विंटल उत्पादन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१८ नोव्हेंबर -**



लोहारा तालुक्यातील खेड येथील शेतकरी काकासाहेब अण्णाराव पाटील यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या ०.५० आर शेतात तुरीच्या पिकावर अनोखा व नियोजनबद्ध प्रयोग राबवला आहे. सध्या हे पीक जोमात असून एकरी १० ते १२ क्विंटल उत्पादन मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पाटील यांच्या या प्रयोगाची माहिती आसपासच्या परिसरात पोहोचल्याने अनेक शेतकरी त्यांच्या शेताला भेट देत आहेत.

काकासाहेब पाटील यांनी त्यांच्या शेतात गोदावरी २०१३-४१ या कंपनीच्या 'पांढरे' जातीची तूर ५ जून रोजी स्वतःच्या बैलावरील तिफणीने पेरली. पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करण्यात आली. तुरीसाठी आतापर्यंत दोन वेळा फवारणी केली. एक वेळेस पाटाने पाणी देण्यात आले. दोन ओळीतील अंतर ६ ते ७ फुट ठेवण्यात आले. तुरीच्या शेंगांमध्ये सरासरी चार दाणे असून शेंगा मोठ्या व भरगच्च लागल्या आहेत. त्यामुळे अपेक्षित उत्पादनात वाढ होण्याची शक्यता अधिक आहे. काकासाहेब पाटील यांना या प्रयोगासाठी सहाय्यक कृषी अधिकारी नीलकंठ पाटील यांनी प्रोत्साहन व तांत्रिक मार्गदर्शन दिले. तसेच मंडळ कृषी अधिकारी माळकुंजे यांनी प्लॉटची पाहणी करून समाधान व्यक्त केले. कृषी विभागाच्या योग्य मार्गदर्शनाखाली केलेल्या नियोजनामुळेच हे पीक उत्कृष्ट बहरले असल्याचे शेतकरी काकासाहेब पाटील सांगतात. त्यांच्या या यशस्वी प्रयोगानंतर शेतकऱ्यांत तुरीच्या बियाण्यांची मागणी वाढत असून पुढील प्लॉट पाहण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी वर्दळ दिसत आहे.

## नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीत छाननी पूर्ण; १४२ उमेदवारी अर्ज कायम

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ नोव्हेंबर -**




नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी दि.१८ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या उमेदवारी अर्ज छाननीनंतर एकूण १४२ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. यामध्ये नगराध्यक्ष पदासाठी ७ तर नगरसेवक पदासाठी १३५ अर्ज अंतिमतः शिल्लक राहिले आहेत.

दि.१७ नोव्हेंबरपर्यंत या निवडणुकीसाठी एकूण १८९ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी १६ अर्ज नगराध्यक्ष पदासाठी १७३ अर्ज नगरसेवक पदासाठी दाखल झाले होते.

छाननीदरम्यान ४७ अर्ज बाद झाले असून यामध्ये नगराध्यक्ष पदाचे ९ अर्ज, नगरसेवक पदाचे ३८ अर्ज समाविष्ट आहेत. छाननीदरम्यान कोणत्याही उमेदवाराने इतरांवर आक्षेप घेतले नाहीत. बहुतांश बाद झालेले अर्ज हे एका उमेदवाराने अनेक अर्ज भरल्यामुळे किंवा आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे अपात्र ठरले. यामध्ये काही राजकीय पक्षांच्या उमेदवारांचाही समावेश असल्याचे समजते. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २१ नोव्हेंबर आहे. त्यानंतरच निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक दि.२ डिसेंबर रोजी होणार आहे.

## नळदुर्ग नगराध्यक्ष निवडणुकीत '२,९०० लाडक्या बहिणी' ठरणार निर्णायक; कोणाच्या बाजूला झुकणार महिला मतदान?

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१८ नोव्हेंबर -**




नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीत शहरातील २ हजार ९०० 'लाडक्या बहिणी'चा पाठिंबा कोणाला मिळणार - हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. नगराध्यक्षपदाचे भवितव्य मोठ्या प्रमाणात महिला मतदारांच्या या प्रभावी गटावर अवलंबून आहे.

महाराष्ट्र सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना मध्यप्रदेशच्या धर्तीवर सुरू केली होती. पात्र महिलांना दरमहा १५०० रूपये थेट खात्यात जमा करण्याची सोय केल्यामुळे या योजनेचा निवडणुकीत महायुतीला मोठा फायदा झाल्याचे स्पष्ट दिसून आले. ही योजना आजही विनाअडथळा सुरु असून नळदुर्ग शहरात तिचा लाभ घेणाऱ्या बहिणींची संख्या २,९०० इतकी आहे.

तसेच, नुकत्याच झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत बिहार सरकारने प्रत्येक महिलेच्या खात्यावर १०,००० हजार रूपये जमा करणारी योजना अवलंबली. ही योजना निवडणुकीच्या केवळ काही दिवस आधी सुरू झाली असली तरी तिचा मोठा राजकीय परिणाम दिसून आला. एनडीएला प्रचंड लाभ मिळाला, तर महाआघाडीचा सुफडा साफ झाला.

सध्या राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर महिला मतदार - विशेषतः लाडकी बहीण योजना लाभार्थी - कोणत्या पक्षाच्या बाजूने मतदान करतील, हा निर्णायक मुद्दा ठरत आहे.

नळदुर्ग शहरातच २,९०० महिला लाभार्थी असल्याने त्यांच्या मतदानाचा कल थेट नगराध्यक्ष निवडीवर परिणाम करणार हे स्पष्ट आहे. अलीकडे महिलांचे मतदान प्रमाण झपाट्याने वाढले असून त्याचा एकत्रित परिणाम मतदानाच्या एकूण टक्केवारीवरही दिसत आहे.

३ डिसेंबर रोजी मतमोजणी होईल, तेव्हा कोणत्या पक्षाने 'लाडक्या बहिणी'चा विश्वास जिंकला ते स्पष्ट होईल. नळदुर्गच्या राजकारणातील हा सर्वात महत्वाचा आणि निर्णायक क्षण ठरणार आहे.

## राजकीय पक्ष नोंदणीबाबत जाहीर सुचना

मी अर्जदार **श्री. सुबोधसिंह मानसिंह ठाकूर** या जाहीर सुचनेद्वारे असे घोषित करतो की, **जनस्वाभीमान विकास आघाडी** या नावाने राजकीय पक्ष नोंदणीसाठी राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडे आम्ही अर्ज केला आहे.

या पक्षाचे मुख्य कार्यालय ठाकूर कॉम्प्लेक्स, शिवाजी चौक, परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव पिन ४१३५०२ या ठिकाणी असेल.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २०२५ या आदेशानुसार पक्षाच्या नोंदणीसाठी अर्ज केला आहे. या राजकीय पक्षाचे महाराष्ट्र राज्यातील पदाधिकारी खालीलप्रमाणे आहेत.

**अध्यक्ष :- श्री. सुभाषसिंह चंदनसिंह सद्दीवाल**
**सचिव/सरचिटणीस :- श्री. सुबोधसिंह मानसिंह ठाकूर**
**कोषाध्यक्ष/खजिनदार :- सौ. प्रज्ञा रामचंद्र कुलकर्णी**

जर कोणाला जनस्वाभीमान विकास आघाडी या राजकीय पक्षाच्या नोंदणीबाबत आक्षेप असल्यास तो १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात '**सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२**' यांच्याकडे परस्पर नोंदवावा. त्यात आपला संपर्काचा अचुक पत्ता, दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमुद करणे आवश्यक आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# तूर व कापूस फवारताना दोन शेतकऱ्यांचा विषबाधेमुळे मृत्यू

**त.भा. वृत्तसेवा,**
**चाकूर, १८ नोव्हेंबर :** चाकूर तालुक्यातील अजनसोंडा बु. येथे शेतात तुर व कापूस पीक फवारणी करताना दोन शेतकऱ्यांचा विषबाधेमुळे मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडल्याचे समोर आले असून त्यांच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

चाकूर तालुक्यातील अजनसोंडा बु .येथील शेजारी शेतकरी लिंबाजी निवृत्ती गवळे वय ५४ आणि अंगद ज्ञानोबा भालेराव वय ५८ हे दोघेही स्वतःच्या शेतात तुर व कापूस पिकांवर तणनाशक फवारणी केली. परंतु फवारणीदरम्यान विषबाधा होवून काही वेळात त्यांची प्रकृती




बिघडली.

उलट्या झाल्या असताना त्यातील भालेराव यांना हाळी तर गवळे यांना चाकूरात खाजगी हॉस्पिटलमध्ये प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी लातूरला खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. परंतु उपचारादरम्यान त्यातच दोघांचाही मृत्यू झाला आहे. या घटनेने अजनसोंडा आणि परिसरात शोककळा पसरली असून त्यांच्या मृत्यूने शेतकरी, गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

शेतकरी लिंबाजी गवळे वय ५४ आणि अंगद ज्ञानोबा भालेराव वय ५८ हे दो-घेही अल्पभूधारक शेतकरी असून त्यांचा सर्व उदरनिर्वाह शेतीवरच अवलंबून होता. शेतीबरोबरच ते रोजंदारीवर काम करीत होते. अचानक झालेल्या या घटनेने त्यांच्या कुटुंबाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान आणि त्यांच्या जीवनाचा दुर्दैवी अंत झाला आहे.

दोन्ही शेतकऱ्यांवर शनिवारी १५ नोव्हेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या शवविच्छेदनाचा अहवाल आला नसून तो अहवाल आल्यावर त्यांच्या मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे.

गवळे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी आणि दोन मुले तर भालेराव यांच्या पश्चात आई, पत्नी, तीन मुलं, दोन मुली असा परिवार आहे. शासनाने त्यांच्या कुटुंबाना मदत करावी अशी मागणी होत आहे.





# नगराध्यक्षपदासाठी हलगरकर, शेख, रेशमे निवडणूक रिंगणात

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, १८ नोव्हेंबर :** निलंगा नगर परिषद निवडणुकीसाठी नगराध्यक्ष पदासाठी १२ जण निवडणूकीच्या रिंगणात असल्याचे चित्र छाननी नंतर स्पष्ट झाले असून नगराध्यक्ष पदाच्या लढतीत भाजपाकडून उद्योगपती संजय हलगरकर, काँग्रेसकडून माजी नगराध्यक्ष हमीद शेख, शिवसेना उबाठा गटाकडून समाजसेवक लिंबन महाराज रेशमे या प्रमुख उमेदवाराचा समावेश आहे.

नगरपरिषद निवडणुकीत एक नगराध्यक्ष व २३ नगरसेवक पदासाठी निवडणूक होत आहे. नगराध्यक्ष पदासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करावयाच्या शेवटच्या दिवसापर्यंत एकूण २९ जणांनी अर्ज दाखल केले होते. सतरा जणांचे अर्ज अवैध झाले असून बारा जणांचे अर्ज वैध झाले आहेत. यात नगराध्यक्ष पदासाठी भाजप तर्फे संजय हलगरकर, काँग्रेसकडून हमीद शेख, शिवसेना उबाठा गटाचे नेते लिंबन महाराज रेशमे यांच्यासह बारा जणांचे अर्ज वैध झाले आहेत.

नगरसेवक पदासाठी प्रभाग एक मधून काँग्रेस तर्फे मनीषा सुनील नाईकवाडे, अजित भरत नाईकवाडे तर भाजपतर्फे आशा रवी फुलारी, किशोर लंगोटे, प्रभाग दोनमध्ये काँग्रेस तर्फे गंगुबाई राजकुमार सलघंटे, अश-ोक मन्मथप्पा शेटकार तर भाजप तर्फे लक्ष्मीबाई मारुती ना-गदे, ॲड विरभद्र स्वामी, प्रभाग तीनमध्ये काँग्रेस तर्फे संगीता लक्ष्मीकांत म्हेत्रे, भवानीप्रसाद संतोष नाईकवाडे तर भाजप तर्फे पूजा दत्ता मोहोळकर, ईश्वर पाटील, प्रभाग चारमध्ये काँग्रेस तर्फे ओमप्रकाश सुभाषराव शिंदे, अनुसया तानाजी सावरे तर भाजप तर्फे रमेश कुमार कांबळे, सोना-ली हाडोळे, प्रभाग पाचमध्ये काँग्रेसतर्फे विजया गंगाधर वांजरवाडे, हमीद इस्माईल शेख तर भाजप तर्फे शोभा पोतदार, खदीर मासूलदार, प्रभाग सहामध्ये काँग्रेस तर्फे वंदना विजयकुमार सोमवंशी, सिराज अहेमदपाशा शेख तर भाजप तर्फे सुधा वाघमारे, रुकसाना इस्माईल शेख, प्रभाग सातमध्ये काँग्रेस तर्फे इस्माईल जाफरसाब मणियार, सरोजा महेश भोसले तर भाजप तर्फे मनोज कोळ्ळे, मोबीनसाबी पाशामिया अत्तार, प्रभाग आठ मध्ये काँग्रेस तर्फे नागनाथ बसवराज फुलारी, सविता विजयकुमार पाटील तर भाजप तर्फे धर्मप्रकाश निंबाळकर मीनाक्षी शरदराव निलंगेकर, प्रभाग नऊ मध्ये काँग्रेस तर्फे अजगर मैफूजमिया अन्सारी, शिवगंगा गणेश पेठकर तर भाजप तर्फे निळकंठ व्यंकट पेठकर, तबसुम मुस्तफा शेख, प्रभाग दहा मध्ये काँग्रेस तर्फे गिरीश व्यंकट पात्रे, कौशल्या दिलीप कांबळे तर भाजप तर्फे सचिन गायकवाड, रंजना कांबळे, प्रभाग ११ मध्ये काँग्रेस तर्फे स्वाती बालाजी सूर्यवंशी, राधिका मल्हारी पेठकर, इलाही इस्माईल चौधरी तर भाजप तर्फे अश्विनी बालाजी सूर्यवंशी, रेशमा गोविंद माडिबोणे, नय्युम मंजूर शेख, हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

# नारदा संगम शाळेत प्रतिभा कारंजे कार्यक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**
**वलांडी, १८ नोव्हेंबर :** सीमावर्ती भागातील भालकी तालुक्यातील मेहकर ग्राम पंचायत अंतर्गत येणाऱ्या नारदा संगम येथील सरकारी उच्च प्राथमिक शाळेमध्ये सोमवार दि. १७ नोव्हेंबर रोजी प्रतिभा कारंजे कार्यक्रम संपन्न झाला.

भालकी तालुक्याचे शिक्षणाधिकारी सीजी हळद यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रतिभा कारंजे कार्यक्रमाचे उद्घाटन सरस्वती माता प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सरपंच सौ. शितल सत्यवान कांबळे, मल्लिकार्जुन कनाळे, संतोष मुदाळे, रणजीत सिंग ठाकूर, सुभाष मुलगे, चन्नप्पा तलवाडे, एसडीएमसीचे अध्यक्ष राजकुमार बिरादार, उपाध्यक्ष जयश्री माणिक बिरादार, ज्ञानोबा पाटील, ग्रामपंचायत सदस्या सौ. पूजा प्रभाकर बिराद-ार, काशिनाथ बिरादार, शिवा बिरादार, शाळेचे मुख्याध्यापक वैजनाथ पाटील, अशोक स्वामी, उल्हास कांबळे, उमाकांत बिडवे, मिलिंद कांबळे, दिगंबर तेलंग, श्रीमंतराव गणेशवाडे, दत्तू राम कणसे, बसवर-ाज बिरादार, वीरशट्टी कटाळे,



वसंतराव हलसे, व्यंकटराव कारभारी, मारुती रायपळे आदी उपस्थित होते. शाळेच्या वतीने या प्रमुख मान्यवरांचा शाल-पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पहिली ते आठवीच्या कन्नड व मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी आपली प्रतिभा, भावगीत, भक्तीगीत, चित्रकला, रांगोळी, डान्स, नाटक अशा अनेक कला करून दाखविले व प्रथम द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सौ. वर्षा मोहिते, सौ. सुरेखा तडोळगे, सौ. मंगलाबाई कान्होजी, सौ. प्रभावती बरद-ापुरे, सौ. सावित्रा बिडवे, अरविंद बिरादार, सूर्यभान ददापुरे, विकास माकणे, ओम बिरादार, प्रशांत बिरादार, श्रीनिवास हा-लसे, परमेश्वर ददापुरे, प्रशांत हालसे, सौ. कविता बिरादार, सौ. संगीता हालसे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# औसा नगरपालिका निवडणुकीच्या छाननीत ५२ अर्ज अवैध

**त.भा. वृत्तसेवा,**
**औसा, १८ नोव्हेंबर :** औसा नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी अखेरच्या दिवशी रणधुमाळीत दाखल केलेल्या उमेदवारीमुळे नगराध्यक्ष पदाच्या १ जागेसाठी

**१०२ उमेदवार आखाड्यात; नगराध्यक्ष पदासाठी ११ तर नगरसेवकपदासाठी ८७**

१५ तर नगरसेवक पदाच्या २३ जागेसाठी १३९ उमेदवारांनी उमेदवारी दाखल केली. आज मंगळवार दि, १८ रोजी झालेल्या छाननीत ४८ नगरसेवक व ४ नगराध्यक्ष पदाचे अर्ज अवैध ठरले आहेत.

औसा नगरपालिकेच्या होवू घातलेल्या निवडणुकीसाठी १५४ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरले होते. यामध्ये १३९ नगरसेवक पदासाठी तर १५ नगराध्यक्ष पदासाठी दाखल केले होते.

आज निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार घनशाम अडसुळ, सहाय्यक निवडणुक अधिकारी तथा मुख्याधिकारी मंगेश शिंदे यांच्या



मार्गदर्शनाखाली झालेल्या छाननीत ४८ नगरसेवकांचे तर ४ नगराध्यक्ष पदाचे एकुण ५२ अर्ज अवैध झाले आहेत.

यामुळे या निवडणुकीच्या आखाड्यातील उमेदवारांची संख्या कमी झाली असली तरी दि. २१ रोजी उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

यामध्ये भाजपाचे सर्वाधिक १६, राष्ट्रवादी काँग्रेसचे १५ , आम आदमी पार्टी १ , राष्ट्रीय समाज पक्ष १ ,काँग्रेस पक्षाचा १ अशा चार पक्षातून ३४ व अपक्ष व इतर उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले आहेत. नगराध्यक्ष पदासाठी भाजपाच्या डॉ. ज्योती बनसुडे यांचा १, राष्ट्रवादी काँग्रेसच्या परवीन नवाबोद्दीन शेख यांचे ३, उध्दव ठाकरे सेनेच्या मंजुषा रुपेश माडजे १, सानिया फतिमा शेख १, वंदाबाई धोंडिराम पुंड १इनामदार सय्यद मदिहा मुजफर अली १, अमृता अविनाश खुरपे १ अपक्ष व बहुजन समाज पार्टीच्या खाजाबी महेमुद लोणे १ यांनी नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी दाखल केली आहे.

# देवणी तालुक्यातून दारूबंदी अधिकारी झाला फरार!

**अवैध दारूची विक्री होते दारोदार!!**

## महिला दारूबंदीसाठी ग्रामसभा घेतात वारंवार; पोलीस प्रशासन म्हणते हम क्या करेंगे यार

**त.भा. वृत्तसेवा/ कोयले प्रताप**
**देवणी, १८ नोव्हेंबर :** तालुक्यातील अवैध दारू विकृत्याचे दारूबंदी अधिकारी यांना घरपोच हप्ते जात असल्याने देवणी तालुक्याकडे संबंधित दारूबंदी अधिकाऱ्यांनी देवणीकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष केल्याने सदर अधिकारी एकवर्षापासून एकही अवैध दारू विक्रत्यावर कारवाई केली नाही. अवैध दारू विक्री देवणी शहरासह देवणी तालुक्यात घरारातून होत आहे.

तालुक्यात अनेक गावातील महिलांनी ग्राम सभा घेऊन ग्राम सभेत दारूबंदी करण्याचा ठराव घेऊनही दारूबंदी अधिकारी व पोलीस प्रशासन यांच्यात आर्थिक संगनमत असल्याने कोणत्याच गावची अवैध दारु विक्री बंद झाली नसल्याने अनेक लोकांची घरे देशोधडीला लागले आहेत. संबंधित दारूबंदी अधिकाऱ्यावर




> दिं ०१ जुलै २०२४ रोजी बोरोळ ग्राम पंचायतीने महिला ग्राम सभा बोलावून दारू बंधी साठी ठराव घेण्यात आला. बोरोळ गावातील गल्ली बोळात अवैध दारू दुकाने कायमची बंद करण्यात यावे अशी प्रचंड मागणी महिला ग्राम सभेत केली होती. याकडे संबंधित अधिकारी काय करणार आणि ग्राम पंचायत पुढाकार घेऊन संबंधित अधिका-यापर्यंत दारू बंदीचा ठराव लवकरात लवकर पोंहचवणार का? नाहीतर बोरोळ गावातील महिलांचा मोठ्या प्रमाणावर मोर्चा दारू बंदीच्या विरोधात काढण्यात येईल असा पण ईशारा देण्यात आला होता. परंतु बोरोळ गावातील खुले आम देशी दारू विक्री बंद न होता दिवस रात्र चालु आहे. महिला ठराव घेऊन उपयोग होत नाही. कारण दारू विक्री करणा-यांना अभय संबंधित अधिकारी यांचा असल्याचे बोले जात आहे.

कारवाई करण्याची मागणी महिला व जनतेतून होत आहे .दारू विक्री करणाऱ्या अधिकृत दुकानदारांना काही नियम घालून दिले आहेत. त्या नियमाचे उल्लंघन करून सर्रास सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत वेळेची मर्यादा न ठेवता सर्व नियम धाब्यावर बसवून सकाळी चार ते संध्याकाळी एक दोन पर्यत देशी दारू दुकान व शहरातील बार चालू आहेत यांच्याकडून वेळो वेळी चिरीमिरी घेऊन अर्थपूर्ण व्यवहार केले जात आहे. दारू बंदी अधिकारी कोठे आहेत कळवा हजार रुपये मिळवा असे लोकांना म्हणावे लागत आहेत. दारूबंदी अधिकारी यांचे नेमके अधिकार व काम काय आ-हेत हे येथील नागरिकांना पडला आहे.

दारू बंदी अधिकाऱ्यांनी अनधिकृत दारू विकणार्यावर कारवाई केली आहे.

याचा लेखा जोख देवणी तालुक्यातील जनतेला दारूबंदी अधिकारी यांना द्यावा लागणार आहे. म्हणून देवणी तालुक्यातून दारूबंदी अधिकारी एक वर्षापासून फरार, अवैध दारू विक्री होते दारोदार, दारू बंदीसाठी महिला ग्रामसभा घेतात अनेक बार पोलिस प्रशासन म्हणते हम क्या करेंगे यार आणि दारू बंदी अधिकारी हप्ते घेतो वारंवार अनेकांचे संवसार बरबाद अशी अवस्था देवणी तालुक्यातील झालेली आहे.

# बावगे व सोन्नर महाराज 'राऊ' जीवनगौरवाने सन्मानित

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, १८ नोव्हेंबर :** तालुक्यातील औराद शहाजनी येथे सन्मान कर्तृत्वाचा सामाजिक कार्याचा या उपक्रमाच्या अंतर्गत सामाजिक कार्यकर्ते माधव बावगे व शामसुंदर सोन्नर महाराज यांना 'राऊ' जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बसवराज वलांडे, सचिव रमेशराव बगदुरे, उपाध्यक्ष राजाप्पा वलांडे, उपसचिव पंकज बियाणी, संचालक शिवाजीराव जाधव, मडीवळय्या मठपती, अनिल डोईजोडे, शिवाजीराव जाधव, दगडू गिरिबने आदी मंचावर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते

सुप्रसिद्ध व्याख्याते, कीर्तनकार, पत्रकार, संविधान समता दिंडीचे संचालक शामसुंदर महाराज सोन्नर, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक माधव बावगे यांना 'राऊ'




जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप दहा हजार रुपये, शाल, संतत्वाच्या पाऊलखुणा हा सौ. शांताबाई गिरबने लिखित ग्रंथ देऊन यथोचित गौरव करण्यात आला. गावातील हिंदू समशानभूमी सुशोभीकरण समिती, बौद्ध समशानभूमी सुशोभीकरण समिती, हरित औरादकर समिती आदींचा 'राऊ' समाज गौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

> श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील नेमका फरक समजून घेऊन, प्रत्येक नागरिकांनी विवेकवादी व बुद्धिवादी बनले पाहिजे. अंधश्रद्धेचे निर्मूलन ही आमची तुमची गरज असून प्रत्येकाने त्याच्यामध्ये सहभाग नोंदवला पाहिजे. ही सत्याची व विवेकाची चळवळ प्रत्येकाने समजून घ्यावी.
> **-समाजसेवक, माधव बावगे** (अध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती)

संविधान जाणीव जागृती या संदर्भामध्ये आपले मनोगत व्यक्त करताना शामसुंदर महाराज म्हणाले भारतीय संविधान हे जगातील सर्वश्रेष्ठ संविधान आहे. या दे-शातील साधुसंत व महापुरुषांचे समतावादी विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संविधानात मांडले. वारकरी संप्रदायांनी सर्व जाती धर्मातल्या माणसांना आपल्या हृदयामध्ये सामावून घेतले. म्हणून हा संप्रदाय महान आहे. आज दे-शात एकमेकांमध्ये विष कालवून माणसाला माणसापासून दूर केले जात आहे. अशा परिस्थितीमध्ये साधुसंताचा समतेचा विच-ारच देशाला समृद्ध करू शकतो.

> अमेरिकेसारख्या अनेक राष्ट्रांमध्ये तेथील स्त्री अजूनही राष्ट्राध्यक्ष बनू शकली नाही. आपल्या देशात एक स्त्री इंदिरा गांधीच्या रूपाने पंतप्रधान बनली. दुसऱ्या दोन स्त्रिया प्रतिभाताई पाटील व द्रोपदी मुर्म या राष्ट्रपती बनल्या. आपले संविधान हे जगातील श्रेष्ठ संविधान आहे.
> **-कीर्तनकार, शामसुंदर सोन्नर महाराज** (संचालक, संविधान समता दिंडी, मुंबई)

पुरस्काराला उत्तर देताना माधव बावगे म्हणाले देशांमधल्या अंधश्रद्धा संपल्या पाहिजेत. प्रत्येकाने वैज्ञानिक व विवेकवादी दृष्टिकोन जोपासला पाहिजे. जात ही माणसाने निर्माण केली आहे. माणूसच त्याचे निर्मूलन करू शकतो. मी स्वतः शहीद नरेंद्र दाभोळकर यांच्या चळवळीमध्ये वाढलो. त्यांचे विचार घेऊन पुढे जातो आहे. मी शेकडो आंतरजातीय विवाह लावले. त्यांचे संसार अत्यंत सुखाने चालू आहेत. आमची चळवळ ही सत्याची असून ती बुद्धी प्रामाण्यवादावर अवलंबून आहे. खऱ्याला खरे व खोट्याला खोटे म्हणण्याची चिकित्सा ही चळवळ करते. ही चळवळ समाजातील अज्ञान दूर करून प्रकाश देण्याचे काम करत आहे, व्यंकट अनिगुंटे आणि दगडू गिरबने यांनी आपली आजी राऊ यांच्या स्मृती प्रित्यर्थ हा पुरस्कार ठेवला होता.

सूत्रसंचालन व पुरस्कार वाचन सतीश हानेगावे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमाला कृषिरत्न सुभाष मुळे, माजी मुख्याध्यापक शिवाजीराव जाधव, माजी चेअरमन पांडुरंग भंडारे, डॉ. ज्ञानेश्वर कदम, बालाजी जाधव उजेड, विकासाधिकारी चंद्रकांत गस्तगार, एन.आर. जाधव, दिलीप धुमाळ, शे-षराव हलगरकर, गोपाळराव शिंदे, डी.बी. बरमदे, एम. एम. जाधव, माजी सरपंच प्रकाश स्वामी, संगमनाथ उडबळे, संस्थेचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी, माजी मुख्याध्यापक, शिक्षक, पंचक्रोशीतील महिला भगिनींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# १ लाख २० हजारांचा ऐवज चोरट्यांकडून लंपास

**त.भा. वृत्तसेवा,**
**देवणी, १८ नोव्हेंबर :** देवणी तालुक्यातील अजनी येथील एक कुटुंब आपल्या घराला कुलूप लावून गावात चालू असलेल्या भजनाला गेले असता अज्ञात चोरटयांनी घराचे कुलूप तोडून १ लाख २० हजारांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. अजनीचे रहिवासी कोंडीबा रानबा फुलवाड हे गावात चालू असलेल्या भजनाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. त्यावेळी अज्ञात चोरटयांनी घरातील कपाटातील सोने चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख २० हजार रुपयांचा ऐवज चोरला. या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# स्वातंत्रसैनिक बळीराम पाटील यांचे निधन

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, १८ नोव्हेंबर :** निलंगा शहरातील हैदराबाद मुक्तिसंग्राम लढ्यातील ज्येष्ठ स्वातंत्र सैनिक, आर्य समाजाचे कट्टर उपासक,



सत्यप्रकाश शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बळीराम भिवाजीराव पाटील निलंगेकर यांचे वयाच्या १०१ व्या वर्षी मंगळवार दि. १८ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवार दि. १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता अशोक नगर शेजारील त्यांच्या शेतामध्ये अंत्यविधी करण्यात येणार आहे.

मयत बळीरामजी पाटील यांच्या पश्चात पत्नी शांताबाई, अजित व संतोष असे दोन मुले, चार विवाहित मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. निलंगा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव संतोष पाटील यांचे ते वडील होत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





# द्वारकाधीश मित्र मंडळ आयोजित

बीड शहरामध्ये छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथे द्वारकाधीश मित्र मंडळाकडून आयोजित केलेल्या आनंद नगरीचा शहरातील नागरिक आनंद घेत आहेत. (छाया-कृष्णा शिंदे)

# गिताभाभी बाळराजे पवार यांचा भाजपाकडून उमेदवारी अर्ज दाखल

## राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना ठाकरे गट व वंचित यांची युती तर शिंदे सेना व काँग्रेसचे स्वतंत्र उमेदवार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१८ नोव्हेंबर**

आगामी नगरपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सोमवार दि.१७ हिशेवटची तारीख होती. त्यामुळे काल अनेकांनी आपले उदेवारी अर्ज दाखल केले असून गेवराई नगरपरिषद निवडणुकीत भाजपच्या उमेदवार म्हणून सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांनी साध्या पद्धतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना ठाकरे गट व वंचित यांनी युती करत आपला उमेदवार दिला असून शिवसेना शिंदे गट व काँग्रेसने आपले स्वतंत्र उमेदवारी अर्ज भरले असले तरी प्रमुख लढत ही भाजप व राष्ट्रवादी यांच्यातच होणार आहे, तरी इतर पक्षांनी आपली ताकद दाखवण्यासाठी स्वतंत्र उमेदवार या निवडणुकीच्या मैदानात उतरवले असल्याचे दिसत आहे.

गेवराई नगरपरिषद निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले असून या ठिकाणी भाजप व राष्ट्रवादी अशी सरळ लढत होणार असल्याचे दिसत असून इतर पक्षांनी आपली ताकद दाखवण्यासाठी उमेदवार उभे केले आहे. यामध्ये राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना ठाकरे गट व वंचित यांनी एकत्र येऊन आपला उमेदवार उभा केला आहे. शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रीय काँग्रेस यांनी आपले स्वतंत्र उमेदवार दिले असून या निवडणुकीत आपली ताकद दाखवण्यासाठी ते मैदानात उतरले आहेत. दरम्यान गेवराई नगरपरिषदेत भाजपच्या सौ. गीताभाभी बाळराजे पवार व राष्ट्रवादीच्या सौ. शितल महेश दाभाडे यांच्यातच प्रमुख लढत होणार असल्याचे दिसत आहे.



### कार्तिकी एकादशी आणि ज्ञानोबारायांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त

# घरपोच 'ज्ञानेश्वरी ग्रंथ स्नेहभेट' उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ नोव्हेंबर**

येथील अंबिका चौक, पांगरी रोड, आदर्श नगर येथे शरद डहाळे यांच्या निवासस्थानी कार्तिकी वद्य एकादशी आणि माऊली ज्ञानोबारायांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'घरोघरी ज्ञानेश्वरी स्नेहभेट' या विशेष उपक्रमांतर्गत काल कार्तिक एकादशी निमित्त मोठ्या श्रद्धा व भवभक्तिने सदरील कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाला परिसरातील शेकडो भाविकांनी उपस्थित राहून अध्यात्मिक उत्सवाची शोभा वाढवली.

सुंदर सजावटीत पार पडलेल्या ज्ञानेश्वरी स्वागत सोहळ्याने भाविक मंत्रमुग्ध या उपक्रमासाठी घरासमोर खास शुभ्र रांगोळी, आकर्षक फुलांची उभारणी आणि दिव्यांची लखलखती आरास करण्यात आली होती. ज्ञानदेव तुकाराम गजरात माऊली ज्ञानोबारायांच्या प्रतिमेचे आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे दिमाखदार स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात सौ. राखीताई शरद डहाळे यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या औक्षणाने झाली. गंध, अक्षता व फुले अर्पण करून ग्रंथाची मिरवणूक काढण्यात आली.ज्ञानेश्वरीतील सर्व अध्यायांचे सार अगदी सोप्या भाषेत रसपूर्ण विवेचन करून ह.भ.प. माधव महाराज डाके यांनी ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान अत्यंत सोप्या भाषेत मांडले.महाराज म्हणाले,ज्ञानेश्वरी हा आपल्या जीवन मंदिरातला नंदादीप आहे. तो दिवा मनातला अंधार दूर करून आपले जीवन उजळवतो. ज्ञानेश्वरीच्या सतत वाचनाने मनातील अहंकार नाहीसा होऊन मन प्रसन्न राहते. आणि जीवनात आनंदाच्या लहरी निर्माण होतात.

प्रवचनादरम्यान महाराजांनी ज्ञानेश्वरीतील अनेक अध्यायांतील सैद्धांतिक व दृष्टांताच्या ओव्या, संदर्भ, आणि तत्त्वज्ञान श्रोत्यांसमोर मांडले. जीवनातील व्यवहार, मनाची शुद्धी, भक्तीमार्गाचे रहस्य, आणि अहंकाराची धोकादायक बाजू यावर सुंदर भाष्य केले. याबरोबरच ज्ञानोबारायांच्या संत साहित्यातील अमृतानुभव,चांगदेव पासष्टी, हरिपाठ यांचा विस्तृत आढावा घेतला.महाराजांनी माऊलींच्या संत साहित्याबद्दल बोलताना चांगदेव पासष्टी या प्रसंगावर विशेष प्रकाश टाकला.चांगदेवाचा गर्वहरण करण्यासाठी ज्ञानदेवांनी निवृत्ती, सोपान आणि मुक्ताबाई यांच्यासह जड भिंत चालवली, तसेच चांगदेव वाघावर स्वार होऊन आल्यावर,त्यांच्या अहंकाराला माऊलींच्या अध्यात्म शक्तीने आळंदीतील जडभिंत चालवून नमवले-याचे जिवंत चित्रण त्यांनी सादर केले.

भाविक या अनुभवाने मंत्रमुग्ध झाले. माऊलींच्या ओव्या आणि नित्यपाठाचा आध्यात्मिक महापूर आपल्या प्रवचनात पुढे माधव महाराज यांनी ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या, नित्यपाठ, तसेच भक्तीचा गाभा यावर मनमोहक विवेचन केले. संतसाहित्याचे मोल, माऊलींचे जीवनकार्य आणि आध्यात्मिक साधनेचा प्रभाव यामुळे डहाळे परिवार व उपस्थित श्रोते भारावून गेले होते. ऊत्साहाने सहभागी झालेला डहाळे परिवार या संपूर्ण उपक्रमात परिवाराने अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे राखीताई शरद डहाळे, सौ. उषा भिवराज डहाळे, मंगेश डहाळे, सुरेश डहाळे, अथर्व डहाळे यांनी उत्तम नियोजन केले होते. या ग्रंथ भेट कार्यक्रमास ह.भ.प. मुकुंद भुतपल्ले (माजी शाखाधिकारी, कॅनरा बँक) - योगगुरु ह.भ.प. उबाळे, डॉक्टर विक्रम सिंह कपूर, बाबा पंडित, अनिता पंडित,वृंदावनी साळुंके, यांच्यासह आदर्श नगर परिसरातील असंख्य श्रद्धावान भक्त उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या आयोजनात ह.भ.प. महादेव नाना साळुंके यांनी मोलाचे परिश्रम घेतले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट कार्यक्रमाने आमच्या परिवारात आनंदाचा महापुर ओसंडून वाहिला.संपूर्ण परिवार आनंदी झाला. ज्ञानेश्वरी ग्रंथ हा आमच्यासाठी सदैव प्रेरणा देत राहील अशी भावना डहाळे परिवाराचे सदस्य शरद डहाळे यांनी व्यक्त केली



## पदवीधर नोंदणीसाठी १० डिसेंबरपर्यंत मुदतवाढ; मतदारांनी नोंदणी करून घ्यावी - ॲड.मनोज संकाये

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१८ नोव्हेंबर**

पदवीधर मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीसाठी ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांच्या आधारे प्रारूप मतदारयादी तयार करण्यात येणार होती. मात्र, पदवीधर मतदारांना अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी निवडणूक आयोगाने नोंदणीची अंतिम मुदत १० डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविली आहे.

निवडणूक आयोगाच्या नियमानुसार १० डिसेंबरपर्यंत प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांचे परीक्षण करून पात्र मतदारांचा समावेश ३० डिसेंबर २०२५ रोजी जाहीर होणाऱ्या अंतिम मतदारयादीत करण्यात येणार आहे.

मराठवाडा विभागातील रहिवासी असलेल्या पदवीधरांनी, विशेषतः औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) विभाग पदवीधर मतदारसंघातील मतदार नोंदणी राहिली असल्यास, जबाबदार नागरिक म्हणून तात्काळ अर्ज सादर करून आपले नाव मतदारयादीत नक्की समाविष्ट करून घ्यावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते ड. मनोज संकाये यांनी केले आहे.

पदवीधर मतदारसंघातील मतदानाचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी आणि लोकशाही प्रक्रियेत प्रभावी सहभाग नोंदवण्यासाठी ही नोंदणी अत्यंत महत्त्वाची असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# दोन दिवशीय मोंगर्लिंग खंडोबा यात्रा महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ नोव्हेंबर**

माजलगाव तालुक्यातील मोगरा जागृत देवस्थान मोंगर्लिंग खंडोबा यात्रेचे दि २६ व २७ नोव्हेंबर रोजी दोन दिवशीय मात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन या दोन दिवसीय यात्रा महोत्सवामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असुन दि २७ नोव्हेंबर रोजी जंगी कुस्त्यांचा समना होणार असून या दोन दिवशीय यात्रा महोत्सवास भावीक- भक्तांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मोंगर्लिंग खांडोबा जागृत देवस्थानचे विश्वस्त शिवराज महाराज भरडे यांनी केले आहे.

माजलगाव तालुक्यातील मोगरा येथील जागृत देवस्थान मोंगर्लिंग खंडोबा यात्रेचे दि २६ नोव्हेंबर व दि २७ नोव्हेंबर रोजी दोन दिवशीय यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन दि १८ नोव्हेंबर मंगळवार रोजी देवाची घटस्थापना होणार असून दि २५ नोव्हेंबर रोजी नागदिवे तर दि २६ नोव्हेंबर रोजी यात्रा प्रारंभ होणार असून यामध्ये सकाळी ११:०० वाजता गाड्या ओढणे, त्यानंतर देवाचा विवाह सोहळा होणार असुन दुपारी १२:१० वाजण्याच्या सुमारास देवाचा पालखी सोहळा व सबिना निघेल आणी त्यानंतर डोहातील झारी व भंडारा काढण्याचा कार्यक्रम होईल,त्यानंतर महाप्रसाद होईल तर दि २७ नोव्हेंबर सकाळी ११:०० वाजता वारु व नांगर तोडण्याचा कार्यक्रम होणार असुन या दोन दिवशीय यात्रा महोत्सवाचा जंगी कुस्त्यांनी सांगता होईल तरी मोगरा,शुक्ल तिर्थ लिमगाव,डाकेप्रिंपी,आनंदगाव, निपाणी टाकळी,खरात आडगाव तालुक्यातील सर्व भाविक भक्तांनी या दोन दिवशीय यात्रा महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मोंगर्लिंग खंडोबा जागृत देवस्थानचे विश्वस्त शिवराज महाराज भरडे यांनी केले आहे.



एक भारतीय आदिवासी, स्वातंत्र सेनानी आणि आदिवासी जनजातीचे लोक नायक कांतिवीर बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती पिंगळे नगर बीड येथे साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड .सुनिल बळवंते तर प्रमुख पाहुणे म्हणून आदिवासी समाजाचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते मधुकर घाणे उपस्थित होते .

# प्रदेश सचिवपदी धनंजय कुलकर्णी व मराठवाडा सचिव पदी चंद्रकांत पाटील यांच्या निवडीबद्दल केजमध्ये सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१८ नोव्हेंबर**

भारतीय जनता मजूर संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शांताप्रकाशजी जाटाव भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रशिक्षण प्रभारी अनुसूचित जाती व जनजातीचे प्रमुख यांच्या आदेशानुसार भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके यांनी प्रदेश सचिव पदी धनंजय कुलकर्णी यांची नियुक्ती केली तर मराठवाडा विभागीय सचिव पदी चंद्रकांत पाटील यांची नियुक्ती जाहीर होताच केजमध्ये श्रीनिवास केजकर,शिवराज मुथळे,संदीप भूतडा,श्रीधर खोतनाना यांनी सत्कार त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

भारतीय जनता मजदूर संघ हा भाजपा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघच्या माध्यमातून काम करणारी संघटना असून या संघटनाच्या सर्व प्रकारच्या माध्यमातील काम करणाऱ्या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत आहेत औदयोगिक विभागत,सामाजिक विभागात, पत्रकारिता, सिनेमा,हॉटेल,जिनीग कामगार,ऑइल मिल कामगार,

साखर कारखाने कामगार,शालेय कामगार,सहकार क्षेत्रातील व खाजगी क्षेत्रातील असंघटीत क्षेत्रातील कामगार सर्व कामगार अश्या सर्व विभागातील कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच बांधकाम मजुरांना ज्या सुविधा सध्या मिळत आहेत त्या सर्व सुविधा इतर कामगारांना पन मिळायला हव्यात यासाठी काम करायचे आहे यासाठी गाव पातळीपासून ते देश पातळीपर्यंत सांघिक बांधणी करत सामाजिक विकास साध्य करायचा आहे व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सबका साथ सबका विकास या संकल्पनेला सार्थ ठरवण्यासाठी काम करायचे असल्याचे सांगितले. प्रदेश सचिव धनंजय कुलकर्णी व चंद्रकात पाटील यांचा केजमध्ये श्रीनिवास केजकर,शिवराज मुथळे,संदीप भूतडा,श्रीधर खोतनाना यांनी सत्कार त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मिनी मार्केट सिग्नल जवळील खड्डे बुजविण्याचे मागणी

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १८ नोव्हेंबर :** लातूर शहरातील मिनी मार्केटच्या कोपऱ्यावरील सिग्नल जवळचे खड्डे तात्काळ बुजविण्यात यावेत,अशी मागणी त्रस्त वाहनधारकातून केली जात आहे. लातूरच्या गांधी चौकाकडून मनपा कार्यालयाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर , कामदार पेट्रोल पंपालगतच्या सिग्नलजवळ मिनी मार्केटकडे जाणाऱ्या रस्त्यावर छोटे छोटे अनेक खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे वाहनधारकांना, विशेषतः दुचाकीस्वारांना वाहन चालवताना अक्षरशः कसरत करावी लागत आहे. छोट्या खड्ड्यांमुळे वाहन घसरण्याची शक्यताही खूप आहे. त्यातच नुकत्याच संपलेल्या पावसाळ्यात या ठिकाणी अनेक वाहनधारक अपघात होता होता थोडक्यात बचावल्याची अनेक उदाहरणे आहेत. गांधी चौकाकडून मिनी मार्केटकडे वेगाने जाणाऱ्या वाहनधारकांना तर अक्षरशः आपला जीव मुठीत धरून जावे लागते. वेगावर नियंत्रण नसल्यास निश्चितच या ठिकाणी भीषण अपघात होवू शकतो. प्रसंगी जीवघेणा ठरणारे हे छोटे खड्डे तात्काळ बुजविण्यात यावेत, अशी मागणी वाढीस लागली आहे. स्थानिक प्रशासनाने नागरिकांच्या या मागणीकडे त्वरित लक्ष द्यावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.



# सार्वत्रिक निवडणुका, नाराजी आणि पक्षांतर जणू ठरलेले समिकरणच..!

**त.भा. वृत्तसेवा / श्रीधर स्वामी**
**लातूर, १८ नोव्हेंबर :** कोणतीही सार्वत्रिक निवडणूक म्हटले की, नेते - कार्यकर्त्यांची नाराजी कमी-अधिक प्रमाणात उफाळून येतेच. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यातील रणधुमाळीला सुरुवात होताच ठिकठिकाणी हे नाराजी नाट्य सुरु झाल्याचे दृष्टीपथास येत आहे. राज्याच्या बहुतांश भागात अशीच परिस्थिती पाहावयास मिळते. त्यामुळे निवडणुका म्हटल्या की, नेते- कार्यकर्त्यांची नाराजी आणि शेवटी पक्षांतर असे वर्षानुवर्षे चालणाऱ्या जुन्या समिकरणाची प्रचिती आतापासूनच येताना दिसत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जर महायुती-महाविकास आघाडी म्हणून लढवल्या गेल्या तर ही नाराजी निश्चित वाढल्याशिवाय राहणार नाही, असा कयास राजकीय वर्तुळात लावला जात होता. सद्यस्थितीत नेमके तसेच घडत आहे. त्यामुळे एका पक्षातून उमेदवारी डावलली जाणार असे संकेत मिळताच नाराज कार्यकर्त्यांच्या या पक्षातून त्या पक्षात जाण्याच्या प्रक्रियेलाहीगती येताना दिसत आहे. राज्यातील अन्य




नगर परिषदा-नगर पंचायतांप्रमाणेलातूर जिल्ह्यातही स्थानिकच्या पहिल्या टप्प्यात चार नगर परिषदा आणि दोन नगर पंचायतच्या निवडणुका होत आहेत. जिल्हा परिषद-पंचायत समिती आणि महानगरपालिका निवडणुकीला आणखी काहीसा अवधी आहे. या निवडणुकांचीसर्वचप्रमुख राजकीय पक्षांचे पदाधिकारी-कार्यकर्ते आवर्जून प्रतिक्षा करत होते. अनेक अडथळ्यांची शर्यत पार पाडून आता एकदाची या निवडणुकांना सुरुवात तर झाली आहे.

आता दुसऱ्या टप्प्यातील निवडणुका निर्धारित वेळेत होतील किंवा त्यात थोडाफार बदल होईल, पण त्या पार पडणार एवढे निश्चित, असा विश्वास कार्यकर्त्यांना आला आहे. पहिल्या टप्प्यात जरी लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नाराजी-पक्षांतर पाहायला नाही मिळाले तरी तिसऱ्या टप्प्यात होणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीदरम्यान मात्र ती मोठ्या प्रमाणावर उफाळून येण्याचे संकेत मिळत आहेत. मुळात या निवडणुका महायुती-महाविकास आघाडी म्हणून लढवल्याच जाऊ नयेत, अशी सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांची मानसिकता आहे.

असे झाले तर जागा विभागल्या जाऊन अनेक इच्छुकांच्या इच्छा दाबल्या जाणार आहेत. दोन-तीन किंवा त्यापेक्षाही अधिक पक्ष एकत्रित येऊन या निवडणुका लढवणार असतील तर कोणत्याही एका पक्षाच्या कार्यकर्त्यांचे समाधान होणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. संबंधित पक्षांच्या नेत्यांनाही त्याची पूर्वकल्पना आहेच, नाही असे नाही. त्यामुळेच या निवडणुका एकत्रित लढविण्यात येतील, असे जरी सांगण्यात येत असले तरी परिस्थितीनुरुप निर्णय घेण्याचे अधिकार त्या त्या भागातील जाणकार नेत्यांना सोपविण्यात आले आहेत. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी वेगवेगळे लढणारे काही राजकीय पक्ष काही ठिकाणी एकत्रित लढताना आढळून आल्यास आश्चर्य वाटायला नको.

विधानसभा-लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान नाराज नेत्यांकडून पक्षांतर केले जाते. अगदी तसाच प्रकार स्थानिकच्या या निवडणुकांच्या माध्यमातूनही घडताना पाहायला मिळणार आहे. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी आतापर्यंत अमुक पक्षाचा चेहरा म्हणून ओळखला जाणारा उमेदवार दुसऱ्या पक्षाच्या चिन्हावर निवडणुकीच्या मैदानात दिसल्यास ते फार अप्रूप वा नवल वाटण्याजोगे असणार नाही. लातूर जिल्ह्यात तूर्तास नाही मात्र, लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये ते चित्र दिसणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांपेक्षा शहरात नेत्यांच्या कार्यकौशल्याची खरी परीक्षा पाहायला मिळणार आहे.




# मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र

### गांधी चौक पोलिसांकडून तातडीची कार्यवाही

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १८ नोव्हेंबर :** अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीविरुद्ध लातूरच्या गांधी चौक पोलिसांनी तक्रार दखल होताच अवघ्या २० तासात गुन्ह्याचा तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपत्र दाखल केला आहे. पोलिसांच्या या तातडीच्या कार्यवाहीबद्दल सामान्यांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

या संदर्भात पोलीस सूत्रांकडून मिळाली अधिक माहिति अशी की, एका अल्पवयीन मुलीचा आरोपी इसराईल कलीम पठाण ( वय २७ ) रा. गौसपुरा, लातूर याने सोमवार, दि. १७ नोव्हेंबर रोजी अनधिकृतपणे तिच्या घरात घुसून जबरदस्तीने तिचा हात पकडून विनयभंग केल्याची घटना घडली होती. आरोपीने यापूर्वीही सदरील अल्पवयीन मुलीचा नेहमी पाठ;आग करून तिला त्रास देण्याचे काम केले आहे. तसेच त्याने मुलीच्या कुटुंबियांना जीवे मारण्याची धमकीही दिली होती. आरोपीकडून होणाऱ्या सततच्या मानसिक त्रासाला कंटाळून या प्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली होती.

या प्रकरणाचा गुन्हा दाखल झाल्याबरोबर पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी या घटनेचा आढावा घेऊन त्वरित कठोर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड यांनी दोन स्वतंत्र शोध पथकांना आरोपीचा तात्काळ शोध घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक गणेश चित्ते यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनखाली अवघ्या वीस तासात या प्रकरणाचा तापास पूर्ण करून आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

याकामी महिला पोउपनि. श्रीमती पवार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र टेकाळे, प्रकाश भोसले, रवीसन जाधव, राहुल दरोडे, सचिन चंद्रपाटले, योगेश चिंचोलीकर, रवी कानगुले, सचिन जाधव, शिवानंद गिरबोने, संध्या कांबळे, सुमन कोरे, लता बनसोडे, राखी गायकवाड या पोलीस कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# घनकचरा व्यवस्थापन कामाची आयुक्तांकडून पाहणी



**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १८ नोव्हेंबर :** शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी यांनी स्वच्छता विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेऊन वरवंटी कचरा डेपो येथील कचरा प्रक्रिया केंद्रास भेट दिली. कामकाजाची पाहणी केली.

वरवंटी कचरा डेपो येथे सुरू असलेल्या ओला कचरा प्रक्रिया, सुका कचरा प्रक्रिया, बायोगॅस व इतर कामाची पाहणी करुन त्यांनी समाधान व्यक्त केले. पाहणी दरम्यान ओल्या कचऱ्या पासून बायोगॅसद्वारे तयार होणाऱ्या विजेचा वापर व त्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना केल्या. दैनंदिन जमा होणाऱ्या ओला व सुका कचऱ्यावर प्रक्रिया होऊन त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावावी व त्याचा सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या.

सदरील पाहणी दरम्यान उपायुक्त वसुधा फड, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, कनिष्ठ अभियंता गणेश देवणीकर, वरवंटी कचरा डेपो प्रमुख आशिष साठे, शहर समन्वयक रोहित पांचाळ व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# २७ नोव्हेंबला यशवंत-वेणू सन्मान गौरव पुरस्कार वितरण सोहळा

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर/पुणे, १८ नोव्हेंबर :** पुणे येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी कृषी, शैक्षणिक, सहकार, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील महान व्यक्तिमत्त्वांना त्यांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल पुरस्कार दिले जातात. यामध्ये आतापर्यंत राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, सामाजिक कार्यकर्ते मोहन धारिया, दिलीप वळसे पाटील, डॉ.पी.डी.पाटील, यशवंतराव गडाख, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, पोपटराव पवार, ज्येष्ठ साहित्यिक रामदास फुटाणे, ना.धो.महानोर, विठ्ठल वाघ, रावसाहेब शिंदे, बाळासाहेब विखे पाटील, चंद्रकांत दळवी,



श्रीनिवास पाटील, उल्हासदादा पवार अशा महान व्यक्तिंना देण्यात आलेले आहेत.

त्याच धर्तीवर यंदाही या ऐतिहासिक पुरस्काराची घोषणा यंशवतराव प्रतिष्ठानचे अध्यक्ष पुरुषोत्तम सदाफुले यांनी केली असून यावर्षीचा यशवंत-वेणू राज्यस्तरीय सन्मान गौरव पुरस्कार भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर यांना जाहीर करण्यात आला असून या पुरस्काराचे वितरण २७ नोव्हेंबर २०२५ रोजी गुरूवारी दुपारी ०३.३० वा मुंबई पुणे रस्ता, पिंपरी चिंचवड, पुणे-१९ येथील सायन्स पार्क समोरील ऑटो क्लस्टर सभागृहामध्ये करण्यात येणार आहे.

यशवंत-वेणू पुरस्कार वितरण सोहळा अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबणीस यांच्या शुभहस्ते पार पडणार आहे. या कार्यक्रमाला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे माजी कुलगुरू डॉ.पंडित विद्यासागर, मराठवाडा मित्रमंडळाचे अध्यक्ष अरुण पवार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पिंपरी चिंचवड विभागाचे अध्यक्ष पुरूषोत्तम सदाफुले पाटील, उपाध्यक्ष अरून गराडे, कार्यकारी अध्यक्ष रंगनाथ गोडगे पाटील, निमंत्रक कैलास आवटे, सचिव जयवंत भोसले, प्रसिध्द प्रमुख हणुमंत देशमुख, संपर्क प्रमुख बाजीराव सातपुते आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

त्यामुळे या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आलेले आहे.

# दामिनी पथकाच्या तत्परतेने मुलीवरील अतिप्रसंग टळला

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १८ नोव्हेंबर :** लातूर शहर पोलीस दलातील दामिनी पथकाच्या तत्परतेमुळे एका महाविद्यालयीन मुलीवरील अतिप्रसंग टळला आहे. हा प्रकार लातूर शहरात मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळच्या सुमारास घडला. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, दि.१८ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास दामिनी पथक शहरात पेट्रोलींग करीत असताना एका सतर्क नागरीकाने फोन करून एक महाविद्यालयीन मुलगी रडत असून एक मुलगा तिला चाकुने हात कापतो व तुझे नाव घेतो असे म्हणत त्या मुलीला एका हॉटेलमध्ये नेले असल्याची माहिती दिली. घटनेचे गांभिर्य ओळखून सदरची माहीती प्राप्त होताच अवघ्या ७ ते ८ मिनिटांमध्ये दामीनी पथकाने सदर ठिकाणी जावून पिडीत मुलगी व आरोपी मुलास ताब्यात घेऊन शिवाजी नगर पोलीस ठाण्यात हजर केले. पिडीतिने सांगितले की, आरोपी विशाल बाळासाहेब केकान, हा व्हॉटसअप व फोनद्वारे कॉल व मॅसेज करून त्रास देतो. आजही त्याने माझा जीव देतो असे म्हणून भावनिक ब्लॅकमेल करून अक्षय स्विमींगपुल जवळ, अंबाजोगाई रोडवर बोलावून घेतले. माझे तुझ्यावर प्रेम आहे, मी रूम बुक केली आहे, असे म्हणून तिच्या हाताला धरून तु माझे सोबत चल नाही तर मी हात कापतो व तुझे नाव घेतो असे म्हणून तिला हॉटेलमध्ये घेवून जात होता असे सांगितले. आरोपी विरुद्ध शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सपोनि सुप्रिया केंद्रे या करीत आहेत.

# पळशी येथे श्री खंडोबा देवस्थानतर्फे सप्ताहाचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १८ नोव्हेंबर :** रेणापूर तालुक्यातील पळशी येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी श्री खंडोबा देवस्थानाच्यावतीने १९ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर या कालावधीत सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे.



यामध्ये १९ नोव्हेंबर रोजी बुधवारी श्री खंडोबा मंदिरामध्ये घटस्थापना करण्यात येणार आहे. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री खंडोबा देवस्थान सप्ताहनिमित्त सकाळी ०९ ते १२.३० या ग्रंथ मिरवणूक व दुपारी १२.३० ते ४.३० या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. २६ नोव्हेंबर रोजी वाघ्या मुरळी यांच्या भक्तीगितांचा कार्यक्रम व चंपाषष्टीनिमित्त लंगर तोडण्याचा कार्यक्रम होणार आहे व शेवटी तळी भंडार कार्यक्रमाने सप्ताहाची सांगता होणार आहे. सप्ताहाच्या कालावधीत दररोज सायंकाळी ०७.०० वा श्री मल्हार महात्म्ये या ग्रंथाचे पारायण घेण्यात येईल व दररोज सायं ०७.ते ९.०० या वेळेत श्री खंडोबा देवस्थानचा जागरण गोंधळाचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

यामुळे १९ ते २६ नोव्हेंबर २०२५ या सप्ताहाच्या कालावधीत पळशी गाव व परिसरातील भावीभक्त व सर्व गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन श्री खंडोबा देवस्थान, पळशी यांच्यावतीने करण्यात आलेले आहे.

## लातुरात भाज्यांचे दर भिडले गगनाला

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १८ नोव्हेंबर :** मागच्या काही दिवसात लातूरच्या भाजी मार्केटमध्ये भाज्यांचे दर अक्षरशः गगनाला भिडल्याचेपाहायला मिळत आहे.लातुरात सध्या कोणतीही भाजी किमान ३० रुपये पावकिलो दराने विकली जत आहे. पालेभाज्यांमध्ये मेथी, कांदापेंडी, शेपू सध्याला २० रुपयात मिळत आहे. गाजर, काकडी सुद्धा चक्क ३० रुपये पाव या दरात विकली जात आहे. भाज्यांच्या या वाढत्या दराने गृहिणींचे स्वयंपाक घरातील आर्थिक गणित पुरते विस्कळीत झाल्याचे दिसत आहे. टोमॅटोच्या दरातही वाढ झाली आहे.

# बाल दिनानिमित्त यशवंत विद्यालयात मार्गदर्शन

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १८ नोव्हेंबर :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या समान कार्यक्रमानुसार लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर जिल्हा न्यायालय व कलापंढरी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली यशवंत विद्यालय येथे शुक्रवारी बाल दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी बाल दिन का साजरा केला जातो, कायद्यानुसार बालकाची व्याख्या काय, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणच्या २०२४




मधील योजनेनुसार मुलांसाठी अनुकूल विधी सेवा योजनेबाबत, तसेच बालकांचे कायदेशीर हक्क व अधिकार याबाबत मुलांना मार्गदर्शन केले.

यावेळी यशवंत विद्यालयातील मुख्याध्यापिका डॉ. सुवर्णा जाधव, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. माधवराव गादेकर, कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी.पी. सूर्यवंशी, वकील सुनैना बायस व विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. बाल दिनानिमित्त यशवंत विद्यालयात चित्रकला, रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. बालकांच्या संरक्षण, अधिकार व हक्कासाठी असलेले किशोर न्याय काळजी व संरक्षण कायदा २०१५, लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२, बालविवाह प्रतिबंध कायदा २००६, बाल मजुरी प्रतिबंध कायदा १९८६ व बाल हक्क संरक्षण आयोग कायदा २००५ या कायद्यांबाबत गिरवलकर यांनी माहिती दिली.